(मराठामित्र मासिक पुस्तकाची प्रथमवर्षाची भेट)

अनङ्गमोहिनी.

आर्या—दुःख परांसि न द्यावें, सत्य वदावें, क्षमा न सोडावी
जोडावी कीर्ति जनीं कुलमर्यादा कदां न मोडावी
(मोरोपंत).

लेखक—" कृष्णानुज "

प्रकाशक—गोपाळ दाजिबा दळवी.

संपादक—मराठामित्र, मुंबई. पो. नं. ११.

मार्च सन १९१० इ.

किंमत १२ आणे.

मुंबई.

इंदुप्रकाश स्टीम प्रेसमध्यें छापिली.

प्रास्ताविक शब्द.

तद्दिव्यमव्ययं धाम सारस्वतमुपास्महे ।
यत्प्रसादात्प्रलीयन्ते मोहान्धतमसच्छटाः ॥ १ ॥

प्रसिद्ध बंग कादंबरीकार श्रीयुत बाबू ननिलाल बंदोपाध्याय यांच्या "वसन्तेर राणी" या पुस्तकाच्या आधारानें प्रस्तुत पुस्तक लिहिलें आहे. मूळ पुस्तक बरेंच मोठें असल्यामुळें कथानकांत बराच फेरफार करून हें लिहिलें आहे.

मराठामित्राची ही प्रथम वर्षाची भेट १०० पृष्ठांची असणार म्हणून प्रथम जाहिरातींत लिहिलें होतें, परंतु पुढें पृष्ठें बरींच वाढलीं. ही कादंबरी लिहीत असतां लेखकावर अशीं आकस्मिक संकटें आलीं कीं, कादंबरी पूर्ण होते कीं नाहीं याची आह्मांस धास्ती वाटली होती. परंतु परमेश्वराच्या कृपेनें विघ्नें दूर होऊन किंचित् उशीरानें तरी कादंबरी पूर्ण झाली याचें आह्मांस समाधान वाटतें. जाहिरातींत लिहिलेल्या मुदतीनंतर पुस्तक तयार होण्यास जो कालावधि लागला तो केवळ अपरिहार्य कारणांनीं लागल्यामुळें रसिकजन त्याबद्दल अ[illegible]उ क्षमा करतील अशी आशा आहे.

जगच्चालक परमेश्वराजवळ इतकेंच मागणें आहे कीं, आपल्या प्रिय मातृभाषेची सेवा करण्यास त्यानें आह्मांला उत्तरोत्तर अधिकाधिक सामर्थ्य द्यावें व आमची अल्प सेवा रसिकांस मान्य होत जावी.

भायखळा—ता. १—३—१[illegible] } गोपाळ दाजिबा दळवी.
संपादक मराठामित्र.

अनुक्रमणिका.

सर्ग पहिला.

सर्ग दुसरा.

सर्ग तिसरा.

अर्पणपत्रिका.

ही

प्रस्तुत लेखकाचीं प्रथम कृति

माझे तीर्थरूप

कै० वा० गणपतराव देवराव कालेकर

यांच्या पदीं

नम्रतापूर्वक अर्पण असा.

श्लोक—(शा. वि.)

विद्याभ्यास वनीं तरूस पहिलें जें पुष्प हें पातलें
स्वर्गस्थ प्रिय पूज्य पितृपदिं तें सप्रेम मी अर्पिलें;
हंसक्षीर–विवेक–रीति म्हणुनी अल्पाकृती सज्जना
होतां किंचित मान्य तृप्ति बहु या 'कृष्णानुजा'च्या मना ॥ १ ॥

सज्जनांचा कृपाभिलाषी,

'कृष्णानुज'

अनङ्ग मोहिनी.

प्रकरण १ लें.

वियोग.

(दिंडी) रूप जैसें मन दिव्य दिसे तैसें। कसा प्रणयें वदनेंदु तो विकासे।

....

सत्य भाषण आचरण सत्सतीचें। मुखीं झळके प्रेमही मानसींचें ॥

....

(वि. मो. महाजनी).

वंगदेशांतील सुप्रसिद्ध कलकत्ता शहरापासून बरेंच दूर अशोकपूर नामक एक नगर होतें. त्याच्या पश्चिमभागीं त्रिस्रोता नदी वहात होती. शुक्लपक्षांतील दशमीचा दिवस होता; चंद्राचा नुकताच अस्त झाला होता व आकाशस्थ तारकागण चंद्रांच्या पुनरागमनाची जणों आतुरतेनें वाट पहात अद्यापि लकाकत राहिला होता. पहांटेचा थंडगार वारा वाहूं लागला होता.

यासमयीं त्रिस्रोता नदींत किनाऱ्याजवळ एक नौका तरंगत होती. ती नौका नांगर टाकून स्थिर केली असल्यामुळेंच हा वेळपर्यंत एकाच जाग्यावर होती. तसें जर केलें नसतें तर त्रिस्रोतेच्या वेगवान् प्रवाहांत ती केव्हांच कुठल्याकुठें वाहून गेली असती. ह्या अफाट जगत्सागरावरहि कित्येक आयुष्य—नौका योग्य नांगरानें स्थिर न केल्यामुळें भडकून आतात व अखेरीस विच्छिन्न होऊन त्याच्या तळीं जातात!

नदी किनाऱ्याजवळ एक अल्पवयी तरुणी एका तरुणाच्या स्कंधावर प्रेमानें हात ठेवून हळूहळू त्याजबरोबर चालत होती. त्या रमणीचे कुरळ केश त्रिस्रोतेवर उडणाऱ्या लाटांनीं शीत झालेल्या वसंत वायूमुळें तिच्या प्रशस्त ललाटावर इतस्ततः उडत होते. तिनें एकवार समोरील नदीप्रवाहाकडे नजर फेंकली व त्या तरुणास उद्देशून म्हणाली, "तर मग मी असून नसून सारखींच म्हणायची!"

तरुण किंचित् हास्य करून म्हणाला, " छे, छे, तूं तर माझी परम प्रिय गृहिणी आहेस. माझ्या जीवनाची सहचारिणी आहेस!"

रमणी म्हणाली, " तर मग बरोबर येण्यास इकडची परवानगी मला कां बरं मिळूं नये?"

तरुण म्हणाला, " मी तुला किती वेळां बरें सांगितलें कीं, आठ महिने थांब; फक्त आठच महिन्यांचा अवधि, कीं मग तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व घडेल! अझून आठ महिने मला पराधीन रहावें लागणार आहे, हें तूं विसरूं नकोस."

" आपण होऊन जर पराधीन राहण्याची इच्छा करायची तर तिथें दुसरे काय करणार? आपण कांहीं आतां एखादें लहान बाळ नाहीं कीं गोवर्धन घोषालानें आपल्यावर हवा तसा ताबा चालवावा! समजा, मी जर आतां आपल्या बरोबर कलकत्त्याला आलें तर ते काय करणार आहेत? आपण एकटेंच कलकत्त्यास जावें व मी एकटीनेंच येथें रहावें, असाच जर गोवर्धन याचा हट्ट असेल तर मात्र मला फार दुःख होईल!"

" वेडी रे वेडी! तुला मी काय म्हणतों हें अद्याप चांगलेंसें समजलेंच नाहीं! सध्यां गोवर्धन घोषालांच्या आज्ञेंत राहून ते सांगतील त्याप्रमाणें आचरण ठेवणें हेंच माझें, धर्म या नात्यानें व लोकदृष्टीनें, कर्तव्य कर्म आहे. बाबांनीं ज्यां वेळीं मृत्युपत्र केलें त्यावेळीच त्यांत त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, माझ्या वयाला वीस

वर्षे लोटेपर्यंत मी गोवर्धनाच्याच ताब्यांत रहावें; आणि त्याप्रमाणें मी जर वागलों नाहीं तर एक तर पित्राज्ञा उल्लंघिल्याचें पातक माथीं लागेल व दुसरेहि अनेक तोटे होतील ! "

" पण त्यांनीं त्यांत थोडेंच असें लिहिलें होतें कीं, आपण कलकत्त्यास जावें व मी आपणास सोडून एकटीनेंच दूर रहावें !"

तरुणानें तिचा कोमल हस्त आपल्या हातांत धरला व म्हणाला, " तसें कांहीं बाबांनीं त्यांत लिहिलें नव्हतें गोष्ट खरी, परंतु आजपर्यंतच्या गोवर्धनांच्या वागणुकीवरून पाहातां, ते बोलल्याप्रमाणें करण्यास चुकणार नाहींत, ही गोष्ट अगदीं उघड आहे. म्हणून माझें म्हणणें असें कीं त्यांच्या मनाविरुद्ध वागून थोड्याकरितां कशाला उगीच वांकडेपणा घ्या ! आतां फक्त आठच महिन्यांनीं माझ्या वयाला वीस वर्षे पूर्ण होतील, मग पुढें आपण स्वतंत्र होऊंच !"

" आठ महिने म्हणजे इकडे कांहींच वाटत नाहीं, परंतु मला मात्र ते आठ वर्षांप्रमाणें वाटतील, हें आहे का ठाऊक ? त्याचेंहि कांहीं विशेष नाहीं म्हणा, आठ वर्षे सुद्धां मी तशी राहीन; परंतु इकडे लवकर येणं होईल हें तरी कशावरून ? आणि फक्त आठच महिने जर तिकडे राहायचं आहे, तर मग आतांच इतकी घाई करून तें जाण्याची काय जरूर आहे ? "

" अजूनहि तुला माझा विश्वास पटत नाहींच ना ? बाबांच्या मृत्युपत्रांत लिहिल्याप्रमाणें मला बीस वर्षेपर्यंत गोवर्धनांच्या आज्ञेंत राहिलें पाहिजे, आणि त्यांच्या विरुद्ध जर मी आचरण केलें तर तो अधर्म नाहीं का होणार ? तूं समजूतदार आहेसच, तुला मी अधिक सांगितलें पाहिजे असें नाहीं. "

यावर रमणी भ्रुकुटी वक्र करून किंचित् रोषानें म्हणाली, "हो ! मी समजूतदार आहेच, तर ! बरं, आतां एक नक्की सांगायचं आहे; मी बरोबर येऊं कीं नको ?"

" असें काय बरें करतेस ? यावेळीं तूं माझें ऐक, मी सध्यां एकटाच जातों; मध्यें दोन महिन्यांनीं तुला भेटण्याकरितां मुद्दाम एकदां येऊन जाईन, म्हणजे तर झालें ? "

हें ऐकतांच रमणी क्रुद्ध झाली व तरुणानें धरिलेला आपला हात सोडवून रागानें, " बरें आहे, खुशाल जावें ! " इतकें बोलून तेथून एकदम निघून गेली. तेथून थोडयाच अंतरावर तिची एक परिचारिका उभी होती. तिनें तिला कांहीं प्रश्न केला पण तिजपाशीं एक शब्दहि न बोलतां रमणीनें पुढें असलेल्या वाड्यांत प्रवेश केला !

तरुण विरमून जाऊन रमणीकडे पहातच राहिला. त्याला मनांतून फार वाईट वाटलें. ती त्या वाड्यांत गेल्यावर कांहीं वेळानें तो एक दीर्घ निःश्वास टाकून नदीतीरीं असलेल्या नौकेकडे हळूहळू चालूं लागला.

वरील युवकयुवती ज्या ठिकाणीं बोलत उभीं होतीं, तेथून जवळच किनाऱ्यावर एक विष्णुमंदिर होतें. त्यावेळीं तेथें एक वृद्ध बसला होता; परस्परांचें संभाषण सुरू होतांच तो त्या मंदिरांतून बाहेर आला व त्याच्या चौथऱ्याला टेंकून तें लक्षपूर्वक ऐकूं लागला. त्या दोघांपैकीं एकाचेंहि त्याजकडे लक्ष्य गेलें नाहीं. त्या वृद्धानें मात्र त्यांचें अथपासून इतिपर्यंत सर्व संभाषण ऐकलें व नंतर तो उठून आंत गेला.

प्रकरण २ रें.

गमन.

अशोकपूरचे माजी जमीदार बाबू घनश्याम बोस, हे तीन वर्षांपूर्वीच इहलोकाचा परित्याग करून गेले होते. त्यांच्या मरणापूर्वी कांहीं दिवस अगोदरच त्यानां पत्नीवियोग झाला होता. त्यांच्यामागें त्यांचे दोन पुत्र होते; पैकीं ज्येष्ठ पुत्र नीलांबर याचा व तुमचा

नुकताच परिचय झालेला आहे. कनिष्ठ पुत्र विनोदलाल याचें वय दहा वर्षांचें होतें. तो अशोकपूर येथें आपल्या पित्यानें स्थापिलेल्या पाठशाळेंत इंग्रजी व संस्कृतचा अभ्यास करीत होता. नीलांबर हा कलकत्ता येथील संस्कृत कॉलेजांत अभ्यास पुरा करून व विश्वविद्यालयाची पदवी मिळवून नुक्ताच अशोकपुरीं घरीं आलेला होता. बाबू घनश्याम बोस यांनीं केलेल्या मृत्युपत्रांत, ज्येष्ठ पुत्राला वीस वर्षें पूर्ण होत तोंपर्यंत त्यांच्या सर्व मालमिळकतीचा व इष्टेटीचा व्यवस्थापक व दोन्ही पुत्रांचा प्रतिपालक त्यांचा जुना कारभारी गोवर्धन घोषाल हा असावा असें होतें. आतां फक्त आणखी आठच महिन्यांनीं ती मुदत संपूर्ण होत होती. अशोकपुरास आल्यावर नीलांबराच्या ऐकण्यांत असें आलें होतें कीं, गोवर्धन याच्या मनांतून राहिलेले आठ महिने आपण येथें न राहतां कलकत्त्यास रहावें असें होतें. ही गोष्ट त्याच्या कानीं येतांच तो अगदीं विस्मित झाला, व इतक्या दिवसानंतर घरीं येऊनहि पुनः आपणास लवकरच परत जावें लागणार हें जाणून त्यास मनांतून फार वाईटहि वाटलें, परंतु त्यानें गोवर्धन यास आपली मनोवृत्ति दिसूं दिली नाहीं. त्याच्या पित्यानें आपल्या पश्चात् ज्याला विश्वासानें आपल्या संततीचा व संपत्तिचा प्रतिपालक व व्यवस्थापक नेमिलें होतें त्याची कोणत्याहि कारणास्तव आज्ञा उल्लंघन करणें ह्मणजे आपल्या पित्याचीच आज्ञा मोडण्यासारखें आहे असें नीलांबर समजत होता. पुढें सुमारें दोन आठवडेपर्यंत तो तेथें राहिला व नंतर त्यानें कलकत्त्यास जाण्याची तयारी केली.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें नीलांबराची भार्या अनङ्गमोहिनी हिनें वाड्यांत गेल्यावर आपल्या परिचारिकेला गोवर्धनाकडे पाठवून आपल्या पतीबरोबर कलकत्त्यास जाण्याची परवानगी मागितली. परंतु यावेळीं, काय कारणानें कोणास ठाऊक, त्यानें तिच्या

जाण्याबद्दल असंमति दर्शविली. नीलांबरानें तिची पुष्कळप्रकारें समजूत केली व तो कलकत्त्यास जाण्यास सिद्ध झाला. त्याच्याकरितां नदींत घाटांवर नौका तयार होतीच. नौकेजवळ येतांच तीवरील एका नावाड्यास त्यानें विचारलें, "कांरे, नायब महाशय कुठें आहेत ? मी जाण्यापूर्वी या ठिकाणीं येऊन भेटेन असें ते ह्मणाले होते. अजून कां आले नाहींत ?"

नावाड्यानें उत्तर दिलें, "आह्मीं त्यांनां पाहिलें त्यावेळेस ते ध्यानस्थ बसले होते."

नीलांबर ह्मणाला, "तर मग आतां त्यांची समाधि उतरली असेल, नाहीं ? तूं आतां तेथें जाऊन त्यानां माझा असा निरोप कळव कीं, माझी नौका निघण्यास सिद्ध झाली आहे, आणि मी फक्त आपल्या भेटीची अपेक्षा करीत खोळंबून आहें."

इतक्यांत थोड्याच वेळांत प्रत्यक्ष गोवर्धन घोषालच त्या ठिकाणीं येऊन हजर झाले. ती वेळ पहाटेची असून नुकतेंच झुंजुमुंजु दिसूं लागलें होतें, परंतु गोवर्धन महाशयांच्या ललाटभागीं असलेल्या तीन उभ्या शुभ्र चंद्रनरेषा स्पष्ट दिसत होत्या. त्यांच्या टाळूवर टक्कल पडलें होतें, परंतु डोक्याच्या मागच्या बाजूस थोडीशी शेंडी होती तिलाच त्यांनीं एक बारीकशी गांठ मारली होती. त्यांच्या काखेंत विष्णुसहस्र नामावलीची एक चोपडी होती. शिवाय त्यांच्या दंतविहीन मुखांतूनहि रामनामाचा एक सारखा उच्चार होत होता. या सर्व गोष्टींवरून त्यांची परमेश्वरभक्ती सहज व्यक्त होत होती. यावेळेस त्यांचे बारीक व गुंजे सारखे लाल डोळे अश्रूंनीं भरून आलेले दिसत होते.

गोवर्धन जवळ येतांच नीलांबरानें त्यास नमस्कार केला व ह्मणाला, "महाशय, मला आतां जाण्याला परवानगी असावी, सर्व सिद्धता झाली आहे."

गोवर्धन साश्रुनयनांनीं म्हणाला, " चिरंजीव भव, वत्स; बऱ्याच दिवसांनीं तूं आतां आपल्या घरीं परत आला होतास, असें असूनहि पुन्हां तुला ताबडतोब इतक्या दूर मला पाठवावें लागत आहे, यामुळें माझें अंतःकरण किती व्याकूळ होत आहे तें सांगतां येत नाहीं! परंतु–माया! माया! हे श्रीकृष्ण भगवन्, तुझा महिमा अगाध आहे! आला नाहींस तोंच तुला माझ्या आज्ञेवरून परत कलकत्त्यास जावें लागत आहे ह्मणून मनामध्यें कदाचित् तूं माझ्यावर फार रागावला असशील, परंतु त्याचें कारण तुला समजल्यावर मी केलें तें तुझ्या हितासाठींच केलें, हें तुझ्या ध्यानांत येईल. "

यावर नीलांबरानें उत्तर केलें, " छे, छे; महाशय, आपण तसें मनामध्यें बिलकूल वाटून घेऊं नका. आपण जें कराल तें माझ्या चांगल्यांचेंच कराल अशी माझी पूर्ण खात्री आहे. "

गोवर्धन हांसून ह्मणाला, "तुझ्यासारख्या विद्वान् व सुशील तरुणाला शोभेल असेंच तुझें वर्तन आहे, हें पाहून मला फार आनंद होतो. तुमच्या स्वर्गवासी पित्यानें मरणसमयीं तुह्मां दोघांनांहि माझ्या हवालीं केलें व तुमची एवढी अफाट–अतुल संपत्तीहि मजसारख्या सामान्य जनाच्या हातीं दिली, यावरूनच त्यांचा मजवर केवढा विश्वास होता हें सहज व्यक्त होत आहे! आजपर्यंत मी त्या संपत्तीचा कशा रीतीनें विनियोग केला व तुह्मांला कशा रीतीनें वागविलें हें उघड दिसत आहे. आजपर्यंत माझा ज्यांच्या ज्यांच्यांशीं ह्मणून परिचय झाला, ते मी कोणत्या प्रकारचा मनुष्य आहे, हें सांगूं शकतील. मी संसार परित्यागी, वैरागी आहे. तुमच्या पित्यानें मृत्युसमयीं मागील सर्व भार माझ्यावर टाकला, ह्मणूनच केवळ मी आजपर्यंत ह्या संसाराला चिकटून राहिलों; परंतु आतां कांहीं फार दिवस उरले नाहींत. फक्त आठच महिन्यांनीं ती मुदत संपूर्ण होत आहे. पुढें तुझ्या ह्या अतुल संपत्तीची व्यवस्था तुलाच

लाविली पाहिजे. ती तुझ्या हातीं दिली ह्मणजे मी संसार परित्याग करीन आणि अवशिष्ट आयुष्य हरिनामामृत-पान करण्यांत कोठें तरी पवित्र ठिकाणीं घालवीन; ह्मणून तूं आतां राहिलेले आठ महिने कलकत्त्यास जा व तेथें जमीदारीसंबंधीं योग्य ती सर्व माहिती करून घे."

"आपली आज्ञा मला शिरसामान्य आहे. आपण जसें सांगतां तसेंच मी करीन."

गोवर्धन पुढें ह्मणाला, "आणखी एकच गोष्ट सांगावयाची आहे. तूं विद्वान् आहेस, बुद्धिमान् आहेस. तुला मी अधिक सांगावें असें नाहीं. माझ्या मतें विद्याशिक्षेप्रमाणें धर्मनीतिशिक्षा हीहि इहलोकीं सुखानें कालक्रमणा करण्यास व परलोक साधण्यास अत्यंत आवश्यक आहे. त्याकरितां मी असें निश्चित केलें आहे कीं, तूं कलकत्त्यास गेल्यावर माझे इष्ट गुरु प्रेतोद्धार परमहंस यांचे शिक्षेखालीं रहावें. ते सर्वदा तुझ्याजवळ राहतील आणि तुला संसाराचे असारतेविषयीं व परब्रह्माविषयीं योग्य तो बोध करितील. हे कृष्ण! तूंच सर्वसार परात्पर आहेस; वत्सा, प्रभात झाला, आतां विलंब करूं नकोस. माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे. श्रीगोपालकृष्ण तुला सदोदित सुखांत ठेऊन विजयी करो."

इतकें बोलणें झाल्यावर नीलांबर जाऊन नौकेंत बसला. नौका बंधमुक्त होत्साती प्रवाहावर उठणाऱ्या जलतरंगाबरोबर नृत्य करीत अतिशय सुखकर अशा त्या प्रातःकालीं वसंतवायूमुळें डुलत डुलत चालली.

प्रकरण ३ रें.

योगिवर गोवर्धन घोषाल.

श्लोकः—केला तयावरि जरी उपकार साचा
तो दुष्टधी सकलही विसरावयाचा ।
दुग्धें अहर्निश जरी अहिला भजावें
तेणें कसें प्रखर तें विष हो त्यजावें ! ॥ १ ॥
(वि. मो. महाजनी).

गोवर्धन घोषाल पुनरपि विष्णुमंदिरांत जाऊन एकटाच विषण्ण-मनानें कांहीं विचार करीत बसला. कांहीं वेळानें त्याच्या मनांत कांहींएक विचार आला व त्याबरोबर त्याचा चेहरा एकाएकीं प्रफुल्ल झाला. तो बसल्या जागेवरून उठला व मंदिरांतल्या मंदिरांत इकडून तिकडे येरझारा घालूं लागला. त्याच्या मनांतील विचार आपोआप बाहेर पडूं लागले. " हां, असें झालें हेंच ठीक झालें ! ' परस्परं समर्पयामि ! ' आतां पुढील घाट मात्र यथास्थित जुळला पाहिजे." कांहीं वेळानें त्यानें मोठ्यानें हांक मारून ह्मटलें, " कोण आहे रे बाहेर ?" त्याबरोबर आठ दहा नोकर धांवत आंत आले व हात जोडून समोर उभे राहिले. गोवर्धन त्यांपैकीं एकास उद्देशून ह्मणाला, " किसनसिंह, तूं आतांचे आतां रायमहाशय यांचेकडे जा, व त्यांना ताबडतोब इकडे घेऊन ये. त्यांना ह्मणावें तुमच्या-जवळ तसेंच कांहीं विशेष प्रयोजन आहे."

" आज्ञा " असें ह्मणून किसनसिंह तात्काळ तिकडे निघून गेला. गोवर्धनानें इतर सेवकांस आपआपल्या कामास जाण्यास सांगितलें. सर्व सेवक बाहेर गेले; गोवर्धन पूर्ववत येरझारा घालूं लागला व आपणालाच उद्देशून बोलूं लागला, " गोवर्धन, तूं पूर्वी होतास कोण व आतां आहेस कोण ? वीस वर्षांपूर्वी तूं रस्त्यावर बोरें

विकीत होतास व घनश्याम् बोस याच्या बागेतील फळें चोरून नेऊन विकून आपलें पोट भरीत होतास, आणि त्याच तुझा आज एखाद्या राजाप्रमाणें बडेजाव आहे! दहा वर्षांपूर्वी तुला पेरूचोर ह्मणून तिरस्कारानें जे लोक ह्मणत होते, तेच आज 'हां' ह्मणतांक्षणीं तुजपुढें हात जोडून उभे राहताहेत! तुझ्यापाशीं आतां नुसतें बोलण्याचें देखील साहस त्यांना करवत नाहीं! हा सर्व लाभ तुला आपल्या प्रखर बुद्धीमुळेंच झाला!"

"काय? हा तुझा एवढा मानमरातब, एवढी संपत्ति, हीं सर्व आणखी थोड्याच काळांत—आठ महिन्यांत—तूं दुसऱ्याच्या हातीं जाऊं देणार? हें सर्व राखण्याचें सामर्थ्य तुझ्या अंगांत नाहीं? छे! छे! असें कधींहि होणार नाहीं. ज्या तीक्ष्ण बुद्धीच्या जोरावर वीस वर्षांपूर्वीचा 'पेरू चोर' व 'बोरें विक्या', आज एवढ्या अफाट संपत्तीचा जवळ जवळ मालक व नायब महाशय बनला आहे, त्याच बुद्धीच्या जोरावर तो पुढेंहि आपला मानमरातब कायम ठेवूं शकेल."

इतक्यांत बाहेरून कोणी येत आहे असें पाहून गोवर्धनानें "यावें, यावें, दुर्लभभाई, या बसा" असें म्हटलें. स्थूल शरीराचे, काळ्या सांवळ्या रंगाचे व अर्धवट पांढऱ्या झालेल्या मिशांचे भले मोठे झुबके तोंडावर असलेले दुर्लभभाई आंत आले. त्यांचें नांव दुर्लभचंद्रराय असें होतें. हे दिनाजपूर येथें वकिली करीत असत. अशोकपुरीं त्यांच्या चुलत्याचें घर असून, केव्हां केव्हां अवकाश मिळेल त्याप्रमाणें अथवा विशेष कामानुसार ते अशोकपूर येथें येत असत.

गोवर्धनानें एकदां चोहोंकडे पाहिलें, मंदिराचे सर्व दरवाजे बंद करून घेतले व आदरपूर्वक दुर्लभचंद्रास म्हटलें, "दुर्लभभाई, आजकाल तुमचें नुसतें दर्शनही दुर्लभ झालें आहे. असे इकडे बसा; आज तुमच्यापाशीं कांहीं एक विशेष काम आहे आणि म्हणू-

नेच तुम्हांला मी बोलावणें पाठविलें." दुर्लभचंद्र कांहीं एक न बोलतां गोवर्धनाच्या समोर गालीचावर बसला. त्यानें किंचित् हास्य करून गोवर्धनाकडे एकवार पाहिलें. गोवर्धन पुन्हां म्हणाला, "भाईसाहेब, आज तुम्हांला कोणत्या विशेष प्रयोजनार्थ बोलाविलें हें तुम्हीं समजलां असालच."

दुर्लभचंद्रानें मान हालवून गंभीरतेनें म्हटलें, "छे, मुळींच नाहीं."

"मी नीलांबराला नुकतेंच घरीं आल्याबरोबर कलकत्यास ताबडतोब परत पाठविलें, हें तर तुम्हांला ठाऊक असेलच; परंतु आतां पुढें आणखी आठ महिन्यांनीं माझी दशा काय होईल? हल्लीं मला मिळणारा मानमरातब व हें वैभव आठ महिन्यांनंतर नाहींसें होणार, हें सर्व मनांत आल्यापासून माझें मन अगदीं व्यग्र झालें आहे!"

"समजलों; आठ महिन्यानंतर नीलांबर स्वतंत्र होईल त्याबद्दलच तुम्ही बोलत आहां ना? मला तर त्यांत कांहीं विशेष चिंता वाटून घेण्याचें कारण दिसत नाहीं!"

"काय म्हणतां? चिंता करण्याचें कारण नाहीं! आज मी घनश्याम बोसांच्या ह्या अतुल संपत्तीचा जवळ जवळ मालकच असल्यामुळें मला जे हजारों लोक हल्लीं नमून वागत आहेत, ते तसे पुढें वागतील का? हल्लीं मला जो मानमरातब चोहोंकडे मिळत आहे त्याच्या एक चतुर्थांशानें तरी मग मिळेल का? एवढ्या मोठ्या ह्या जमीदारीचा मला पुढें राजासारखा उपभोग घेतां येईल का?"

दुर्लभचंद्र ह्मणाला, "अहो, पण तसें झालें नाहीं म्हणून आपणाला त्याची काय क्षिति आहे? गेल्या तीन वर्षांत तुह्मी जी संपत्ति मिळविली आहे, तीच 'ताटावरून पाटावर' अशा स्थितींत एखाद्या राजाप्रमाणें दिवस काढण्यास तुह्माला पुरी आहे. तुमचें

वय साठ वर्षांचें झालें; चौथें लग्न करून बरेच दिवस झाले तरी अद्यापि संतान झालें नाहीं आणि पुढेंहि होण्याची आशा नाहीं. मग या उतारवयांत आतां संपत्तीसाठीं खटाटोप कोणाकरितां करायचा ? "

हें ऐकतांच गोवर्धनाचें मुख निस्तेज झालें ! त्यानें एक दीर्घ निश्वास टाकून ह्मटलें, "ही मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं, तुमच्या तोंडून असें बोलणें यावें ! याच्यापूर्वी कधींहि नाहीं आणि आजच तुह्मीं मरणाची गोष्ट कां बरें काढिलीत ? माझें वय साठ वर्षांचें झालें असलें, तथापि मी साठच वर्षें वांचेन किंवा अधिक वांचणार नाहीं, हें तुम्हीं कशावरून ह्मणतां ? साठांपेक्षां अधीक वर्षें मनुष्यें वांचत नाहींत कीं काय ? "

दुर्लभचंद्र किंचित् हास्य करून ह्मणाला, "मी तशा अर्थी ह्मणत नाही, माझी तर उलट तुम्ही चिरंजीव व्हावें अशीच इच्छा आहे. माझें ह्मणणें एवढेंच कीं, मृत्युपत्रान्वयें नीलांबर बाबू आणखी आठ महिन्यांनीं स्वतंत्र होतील ही गोष्ट सर्वांना ठाऊक आहेच, आणि ती गोष्ट आतां अन्यथा होणें बहुतांशीं शक्य नाहीं. "

गोवर्धनानें उत्तर केलें, " भाई, आपण जर थोडीशी बुद्धि खर्च केली तर याला उपाय मिळेलच ! एकंदरींत स्थिती किती वाईट आलेली आहे याचा तुह्मीं आपल्या मनाशीं विचार करा ! पहा, आणखी आठ महिन्यांनीं नीलांबर स्वतंत्र झाल्यावर पुढें माझी काय स्थिती होईल ? आणि तुह्मालाहि दरवर्षी मिळणारे पांच हजार रुपये बंद होतील ! असें झालें ह्मणजे आपल्या आजपर्यंत खर्च केलेल्या बुद्धीचें सार्थक काय झालें ? "

" तर मग कोणता उपाय योजावा असें तुमचें म्हणणें आहे ? सांगा—"

नायब महाशयांचे बारीक डोळे बरेच आकुंचन पावले. ते ह्मणाले, "वीस वर्षांचें वय होतांच मृत्युपत्रान्वयें नीलांबर स्वतंत्र होईल ही गोष्ट खरी, परंतु त्यामध्यें एक शर्त आहे, ती तुह्मांला आहे कां ठाऊक? आठवण नसल्यास मी सांगतों. मृत्युपत्रांत असें लिहिलें आहे, 'नीलांबराच्या वयास वीस वर्षें पूर्ण होण्याच्या अगोदरच जर त्याचा काल झाला, तर त्याच्या मागें माझा कनिष्ठ पुत्र विनोदलाल हा माझ्या सर्व विषयसंपत्तीचा उत्तराधिकारी व्हावा. परंतु त्याच्या वयालाही वीस वर्षें संपूर्ण होत तोंपर्यंत सर्व संपत्तीचे व्यवस्थापक व त्याचे पालक श्रीयुत घोषालच रहातील.' कां? आतां तर कांहीं संदेह उरला नाहीं? हल्लीं घनश्याम बोस यांच्या कनिष्ठ पुत्राचें—ह्मणजे विनोदलालाचें—वय पाहिलें, तर आहे सारें बारा वर्षांचें. तेव्हां ह्या आठ महिन्यांच्या आंत जर नीलांबर पृथ्वीवरून नाहींसा होईल तर अनायासेंच विनोदलाल वीस वर्षांचा होईपर्यंत कोणतीही अडचण न येतां मृत्यूपत्रान्वयें मला आणखी आठ वर्षेंपर्यंत ह्या अफाट संपत्तीचा सहज उपभोग घेतां येईल, आणि तुमचेहि वर्षाचे पांच हजार कायमचे कायमच!"

गोवर्धनाच्या विचारांची ही दिशा पाहून अकस्मात् दुर्लभचंद्राच्या शरीरावर रोमांच उभे राहिले. तो किंचित्काल स्तब्ध राहून नंतर म्हणाला, "तुह्मीं ह्मणतां तें सर्व मला समजतें, परंतु—"

"परंतु—काय? स्पष्ट बोला; ज्या अर्थी आपण परस्परांस अगदीं जीवश्चकंठश्च स्नेही समजतों, त्या अर्थी तुम्ही कोणतीहि गोष्ट मजपासून लपवून ठेवूं नये. सांगा, जें कांहीं सांगायचें असेल तें स्पष्ट सांगा."

"मी तर यांपुढें असा निश्चय कायम केला आहे कीं, या वयांत पुढें परदेशीं राहून वकिली करण्याचें सोडून द्यावयाचें

आणि येथेंच आमच्या काकांच्या घरीं राहून विश्रांति घ्यायची. परंतु, वर्षाचे पांचहजार—"

गोवर्धन हांसून ह्मणाला, " भाई, आपलें कार्य सिद्ध झाल्यावर तुह्मांला पांच हजाराच्या ठिकाणीं सात हजार मिळतील; मग तर झालें कीं नाहीं?" यावर दुर्लभचंद्रानें कांहींएक उत्तर न देतां गंभीरतेनें नकारार्थी मान हालविली.

नायब महाशय ह्मणाले, " नाहीं? तर मग आठ हजार?"

याहिवेळीं रायमहाशयांनीं मस्तक हालविलें. गोवर्धन किंचित् रुष्ट स्वरानें म्हणाला, " दहा हजार केले, मग तर ठीक होईल? " दुर्लभचंद्रानें यावर कांहीं उत्तर केलें नाहीं. यावेळीं पूर्वीप्रमाणें त्यानें मानहि हालविली नाहीं. गोवर्धनानें त्याच्या मनांतील भाव जाणला व म्हणाला, "याबद्दल लेखी करण्याची तर कांहीं जरूर नाहीं ना?"

दुर्लभचंद्र म्हणाला, " आपणाला काय, तोंडीं बोलणें हेंच बस्स आहे. मात्र पूर्वीप्रमाणें मृत्यूपत्र मजजवळच असावें म्हणजे झालें."

" हो, अवश्य. तर मग आतां हें सर्व कशाप्रकारें घडवून आणावें त्याबद्दल कांहीं तरी युक्ति काढणें जरूर आहे. मी मनामध्यें एक युक्ति योजून ठेविली आहे, परंतु तिची शक्याशक्यता पाहून ती अमलांत आणणें हें तुमच्या हातीं आहे. तें सर्व मी तुम्हांला एक आठवड्यानंतर सांगेन. तुम्हीं त्या गोष्टीविषयीं योग्य तो विचार करालच. "

इतकें बोलणें झाल्यावर दुर्लभचंद्र गालिचावरून उठला. त्यानें आपली शाल खांद्यावर टाकिली, करकर वाजणारे जोडे पायांत घातले व हळूहळू चालूं लागला, इतक्यांत गोवर्धनहि उठला. त्यानेंहि आपल्या खडावा पायांत घातल्या, विष्णु सहस्रनामावली हातांत घेतली, व उच्च स्वरानें हरिनाम मुखावाटे उच्चारीत मंदिराचे दरवाजे उघडले. नंतर दोघेहि जण आपआपल्या ठिकाणीं निघून गेले.

प्रकरण ४ थें.

योगिवरांचें सत्यस्वरूप.

मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदि हालाहलम् विषम् ॥

सुभाषित.

बाबू घनश्याम बोस यांच्या ऐश्वर्यपूर्ण व अति विस्तृत अशा वाड्याच्या जवळ थोड्याच अंतरावर एक मोठी चिरेबंदी इमारत होती. तिच्या एका भागांत कांहीं वर्षांपूर्वी श्री विष्णु व लक्ष्मीची पाषाण-मूर्ति स्थापिली असल्या कारणानें तिलाच 'विष्णुमंदिर' असें नांव प्राप्त झालें होतें. नायब गोवर्धन घोषाल हा याच दुमजली इमारतीच्या दुसऱ्या भागांत सपरिवार रहात असे. सर्व चाकर नोकर बहुतकरून इकडेच त्याच्या सेवेसाठीं असत. घनश्याम बोसांच्या वाड्यांत अगदींच थोड्या दासदासी असत. त्या विष्णुमंदिराच्या मागील बाजूस दक्षिणें अंगाला एकीकडे एक खासगी खोली होती. तेथें गोवर्धन घोषाल रात्रीं पुष्कळ उशीरपर्यंत दिवा लावून एकटाच योगसाधन करीत असे. त्या खोलींत जाण्यास कोणासच परवानगी नसे. अशोकपुरांतील सर्व आबालवृद्ध जनांचा गोवर्धनाविषयीं असा समज होता कीं, तो परम विष्णुभक्त असून केवळ भक्तचूडामणी, इतकेंच नव्हे तर, एक महायोगी सिद्ध पुरुष आहे! याच एकीकडच्या खोलीमध्यें दुर्लभराय व गोवर्धन घोषाल यांजमध्यें झालेलें खासगी संभाषण वाचकांनीं नुकतेंच ऐकिलें आहे. आज दोन आठवड्यांनंतर पुन्हां ते त्याच ठिकाणीं काय करीत आहेत हें आपण पाहूं.

राय महाशय ह्मणाले, "तर मग, असें पहा, तुमच्या स्वतःच्या हस्ताक्षराचें पत्र गेलें तर काय हरकत आहे? तसें झालें ह्मणजे

नीलांबर बाबूनां संशय येण्याचें कारण राहणार नाहीं. दुसऱ्याचें हस्ताक्षर असल्यास त्यांना संशय येण्याचा पुष्कळ संभव आहे."

"काय करावें भाई! कोणतेंही कार्य करण्याचे अगोदर त्याच्या शक्याशक्यतेविषयीं विचार करणें जरूर आहे. माझ्या हस्ताक्षरानें लिहिलेलें पत्र असलें आणि यदाकदाचित् तें उघडकीस आलें तर सर्व नाश होईल! तुह्माला निरनिराळीं हस्ताक्षरें काढतां येतात, तेव्हां तुम्हींच जर तें लिहिलेंत, तर धरले जाण्याची बिलकूल भीती बाळगावयास नको!"

"ती गोष्ट खरी, परंतु मीं असें ह्मणतों, इतका हा ब्रह्मघोंटाळा करण्याऐवजीं प्रत्यक्ष कलकत्त्यासच जर त्या गोष्टीचा निकाल केला तर काय हरकत आहे?"

"हरकत कशाची आली आहे; मीहि पहिल्या प्रथम तसाच विचार केला होता, परंतु त्यामध्यें मागाहून बऱ्याच अडचणी दिसून आल्या. एक तर कलकत्ता शहरामध्यें चोहोंकडे 'डिटेक्टिव्ह्' पोलिसांचा सुळसुळाट फार! एवढ्या मोठ्या जमीदाराचा खून झाल्यास तेथें फारच चळवळ उडून जाईल व एकंदरींत पाहतां तसें करणें कांहीं आपणाला शक्य नाहीं. आमचे गुरुदेव प्रेतोद्धार परमहंस हे नीलांबराला रात्रंदिवस संसाराच्या असारतेविषयीं व सन्यासधर्माच्या उच्चपणाविषयीं उपदेश करीत असतातच. त्याला मी म्हणतों असें पत्र गेल्यास त्याच्या मनांत फार विरक्ती उत्पन्न होईल व संसारपरित्याग करून सन्यास धर्माची दिक्षा घेण्यास तो तयार होईल यांत संदेह नाहीं. गुरुदेव त्याच्या मनांत इतकें औदासिन्य उत्पन्न करतील, कीं, आपला धाकटा बंधू विनोदलाल याच्यासाठींहि एकवार घरीं यावें असें त्यास वाटूं नये. एकदां तो लोकांची वस्ती सोडून सन्यासधर्म स्वीकारून जंगलांत अथवा पहाडांत निघून गेला, म्हणजे मग आपलें कार्य सुगम

झालेंच ! यदाकदाचित् तसें न होतां, त्याच्या मनांत कांहीं संदेह आलाच, आणि तो कलकत्याहून येथें आला तर मात्र आपला कार्यभाग फिसकटेल. मग आपल्याला दुसऱ्याच कांहीं उपायाचें अवलंबन करावें लागेल. पण तशी गोष्ट झाल्यास आपण हें कोणातरी दुष्टाचें काम असेल असें त्याला सांगून टाकूं-म्हणजे झालें !"

दुर्लभराय म्हणाला, " ती चिठ्ठी कुठें आहे ? पाहूं काय लिहिलें आहे तें ? "

" ही पहा " असें म्हणून गोवर्धनानें विष्णुसहस्रनामावलीच्या चोपडींतून एक लहानसा लिहिलेला कागद बाहेर काढला, व दुर्लभरायाच्या हातांत दिला. तो वाचून दुर्लभराय म्हणाला, "हूं ठीक आहे. तुम्हीं आतां तिची दुसरी एक नकल करा, म्हणजे दोन चार दिवसांत आमचा शिष्य वामनदास याजबरोबर तिकडे पाठवून देऊं. तो हुषार, बुद्धिमान् आहे, त्याला तिकडे गेल्यावर काय करायचें, काय बोलायचें वगैरे अगोदरच पढवून ठेविलें ह्मणजे झालें."

राय महाशय हांसून ह्मणाले, " तें सर्व कांहीं ठीक झालें हो ! परंतु थोड्याच महिन्यांनीं नीलांबर बाबूंची सर्व संपत्ति त्यांच्या स्वाधीन करून तुह्मी संसार परित्याग करून हरिनाम घेत योगसाधन करीत शेष आयुष्य कंठण्याचा विचार केला आहे असें अशोकपुरांतील सर्व लोकांना सांगितलें आहे, त्याची वाट काय ? "

गोवर्धनाचें दन्तविहीन मुख हास्यानें बरेंच रुंदावलें; तो ह्मणाला, " तुह्मी सर्व कांहीं जाणतच आहां. जग किती मूर्ख असतें पहा ! मी सर्व जग मिथ्या मानतों व फक्त ईश्वरावरच भाव ठेवतों ही गोष्ट हे बेटे खरी मानितात ! ह्या पथ्थराच्या मूर्तीला-उर्फ श्री बिष्णूलक्ष्मीला मीं भजतों; पूजतों, तिजपुढें नाक घांसतों; हें सर्व मी अगदीं मनापासून करतों असेंच ते समजतात; आणि मीहि ह्या धर्मल-

डांना चकविण्याकरितां, त्यांच्याकडून वाहवा मिळवून घेण्याकरितां, आणि माझें प्रस्थ वाढवून स्वार्थ साधण्याकरितां त्या पथ्थरासमोर नाक घांसतो, कपाळावर तिलक लावून भला मोठा चंदनाचा त्रिपुंड्र चढवितों, विष्णु सहस्रनामावळी सदोदित जवळ बाळगितों व मुखानें अखंड हरिनामोच्चार करितों, हें सर्व तुह्माला ठाऊक नाहीं असें नाहीं. 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये.' मनुष्याची बुद्धि हाच परमेश्वर ! दुसरा कोणी ईश्वर आहे ही केवळ कवींची कल्पना ! तुह्माला माहितच आहे कीं, सर्व लोक मला मोठा ईश्वर-भक्त व योगी समजतात; परंतु माझी भक्ती कोणती व माझा योग कोणता हें एक माझ्या मनाला ठाऊक कीं तुह्मांला ठाऊक; लोकांना काय ? ' अंदरकी बात राम जाने. ' बुद्धीच्या जोरावर आपलीं हवीं तीं कार्यें साधून घेणें हीच माझी ईश्वरभक्ती व या मूर्ख लोकांना सदोदित असेंच भ्रमांत ठेवणें हाच माझा योग !"

या वेळींहि एकवार—एकवारच—रायमहाशयांचें सर्वांग रोमांचित झालें—थरारून गेलें ! ते म्हणाले, " ह्या गोष्टी बोलण्याची ही वेळ नव्हे. त्या पत्रासंबंधीं जें कांहीं बोलावयाचें असेल तें बोला."

" पत्र का ? दोन तीन दिवसांच्या आंत नकल करून, नक्की पाठवायचें. "

" तर मग त्या अवकाशांत मी त्याच्या दोघ तिघांकडून नकला करवून आणून तुह्मांला दाखवितो. मग त्यांपैकीं जी पसंत पडेल ती वामनदासाच्या हातीं कलकत्त्यास पाठवून देऊं."

प्रकरण ५ वें.

नीलांबराचा हृदयभेद.

बंधनानि खलु सन्ति बहूनि । प्रेमरज्जु दृढबंधनमाहुः ॥

सुभाषित.

कलकत्ता शहरीं लॉखारी टोला नांवाच्या भागांत बाबू घनश्याम बोस यांचा एक लहानसा टुमदार दुमजली बंगला होता. त्यामधील एका बाजूच्या उद्यानासमोर असलेल्या खोलीमध्यें तिन्हिसांजेच्या सुमारास नीलांबर एकटाच योगवासिष्ठ रामायण वाचित बसला होता. बाहेरच्या बाजूस एक नोकर आंत हालत असलेल्या पंख्याची दोरी ओढीत होता. एकाएकीं पंखा हालण्याचा बंद झाला. इतक्यांत बाहेरून दुसऱ्या एका व्यक्तीचा आवाज नीलांबरानें ऐकला. तो ताबडतोब उठून बाहेर आला तों कोणीएक मनुष्य समोरच भूमीवर पडून मोठ्यानें रडत आहे असें त्यास दिसलें ! नीलांबरानें त्यास विचारिलें, " कोण आहेस तूं ? रडायला काय झालें ? "

त्या व्यक्तीनें कपाळावर हात मारीत व रडत रडत म्हटलें, " हाय हाय ! सरतेशेवटीं माझ्याच नशिबांत हें सांगण्याचें आलें ! यापेक्षां मला मरण आलें असतें तरी पुरवलें असतें ! "

नीलांबरानें जिज्ञासेनें विचारलें, " कोण आहेस तूं ? काय सांगण्याचें नशिबीं आलें ? "

" हाय हाय ! धनीसाहेब, माझ्यानें तें बिलकूल सांगवत नाहीं. अद्याप मला आपण ओळखलें नाहीं ? मी आजपर्यंत आपल्याच अन्नावर मोठा झालेला वामनदास आहे. हाय ! माझ्या हातून असें कोणतें पाप घडलें. होतें कीं, असली भयंकर बातमी सांगण्याची मजवर पाळी यावी ! "

नीलांबर अधिकच जिज्ञासेनें ह्मणाला, "कोण ? वामनदास ? तूं इकडे कां आलास ? घरची काय खबर आहे ! सर्व मंडळी खुशाल आहेत ना ? नीट बोल."

वामनदास रडक्या स्वरानें म्हणाला, "धनीसाहेब, मी कोणत्या तोंडानें तुम्हाला ती हकीगत सांगूं ? त्रिस्रोता नदीच्या कांठावरील स्मशानांत मला जेव्हां आपल्या वैभवलक्ष्मीचें मृतशरीर दिसलें तेव्हांच मला कसें मरण आलें नाहीं !"

नीलांबराच्या काळजांत चर्र झालें, त्याचा कंठ शुष्क झाला; तो वामनदासास रागानें म्हणाला, "खरी काय हकीगत आहे ? हराम-खोर, नीट बोलायला काय झालें ? चल बोल लवकर."

वामनदास उठून बसला व बोलूं लागला, "माझ्यावर आपण रागावलां, शिव्या दिल्या, अथवा मला मारिलें तरीहि मी ती गोष्ट माझ्या मुखानें कधींच सांगणार नाहीं. नायब महाशयांनीं हें पत्र दिलें आहे तें पहा. यावरून आपणाला सर्व कांहीं कळून येईल. मी बोलणार नाहीं." वामनदासानें गोवर्धनाचें पत्र नीलां-बराजवळ दिलें व रडत रडत तो तेथून निघून गेला.

नीलांबरानें कंपित हृदयानें तें पत्र हातीं घेतलें. आपल्या खोलींत जाऊन त्यानें दार घट्ट लावून घेतलें व पत्र वाचण्यास आरंभ केला. तें वाचून होतांच त्याचें प्रशस्त ललाट घामानें डंवडवून गेलें, मुखचंद्र अगदीं निस्तेज झाला व त्याचें सर्व शरीर कंपित होऊं लागलें. त्याच्या हातांतील पत्र समोर असलेल्या मेजावर पडलें; त्यानें एक दीर्घ निश्वास टाकला व मागें अस-लेल्या खुर्चीवर धाडकन् अंग टाकून दिलें. कांहीं वेळानें नीलां-बराचे सेवक त्याच्या खोलीशीं आले तों त्यांस खोलीच दार बंद असलेलें दिसलें. त्यांनीं दाराच्या फटींतून आंत पाहिलें, तों नीलां-

वर आपल्या खुर्चीवर मागें टेकून अर्धवट निद्रितावस्थेंत आहे असें त्यांस आढळलें. त्यांनीं त्याला हांका मारिल्या परंतु आंतून मुळींच उत्तर आलें नाहीं. आपला धनी निद्रिस्त आहे असें समजून व त्याला अधिक त्रास होऊं नये, म्हणून, ते आपापल्या ठिकाणीं निघून गेले. क्रमाक्रमानें रात्र अधीक झाली; मेजावर जळत असलेली बत्ती विझून गेली; खोलीमध्यें गाढ अंधार पडला यावेळीं बाहेर नगरामध्यें होत असलेला कोलाहलहि कमी झाला होता.

अकस्मात् नीलांबर शुद्धीवर आला व उठून बसला. आतां तो पूर्वीप्रमाणें अर्धवट निद्रिस्तहि नव्हता किंवा अचेतनहि नव्हता, परंतु त्याच्या मनाला एक चमत्कारीक भूल पडली होती. त्याला असें वाटत होतें कीं, आपण अशोकपूर येथें असलेल्या वाड्यांतील आपल्या शयन मंदिरांतच यावेळीं आहों. आपल्या शयन मंदिराचा दरवाजा कोणीतरी उघडला असें त्यास वाटलें, व दुसऱ्याच क्षणीं कोणाच्या तरी चंचल चरणांचा नूपुरध्वनी त्याच्या कानीं आल्याचा त्यास भास झाला, व त्याबरोबरच किंचित् गर्व व तिरस्कार यांनीं युक्त परंतु मधुर असा हास्यध्वनीहि त्याच्या कानीं आला. आपण निजण्यापूर्वी अनङ्गमोहिनीची पुष्कळ वेळ वाट पाहून सरते शेवटीं झोंपी गेलों होतों असें त्यास वाटलें, आणि त्यामुळेंच किंचित् तिरस्कारयुक्त अशा तिच्या हास्यानें व जोरानें दरवाजा उघडण्यानें त्याचा निद्राभंग झाला. तो हर्षयुक्त अंतःकरणानें उठून दाराकडे पाहूं लागला. दरवाजा उघडल्यामुळें त्रिस्रोता नदीच्या पात्रावरून वहात आलेला थंडगार वारा खोलींत आला असें त्यास वाटलें. पूर्वीच खोलींत प्रवेश केलेल्या हास्यमुखी चंचल बालिकेची मुखश्री आतां अनादरामुळें क्रोधयुक्त, अभिमानपूर्ण व गंभीर अशी दिसूं लागली. ती बालिका—म्हणजे अनङ्गमोहनी—आपल्या भृकुटी व चंचल नेत्र वक्र करून नीलां-

बरास उद्देशून म्हणाली, "मजवर इकडचें प्रेम किती आहे, हें मी आतां पुर्तेपणीं समजून चुकलें! मला बरोबर घेऊन चलायचं म्हणून इकडे परोपरीनं किती विनविलें, परंतु कांहीं ऐकणं झालं नाहीं! ज्या ठिकाणीं माझा इतका अनादर होतो, त्या ठिकाणीं मी यापुढं मुळींच राहूं इच्छित नाहीं," असें ह्मणून अनङ्गमोहिनी आपले बाहू पसरून वाडयापलीकडे असलेल्या नदींत उडी टाकण्याकरितां धांवत सुटली. वाऱ्यामुळें, सैल असलेला बुचडा सुटून तिचे रेशमासारखे मऊ व सडक केंस तिच्या पाठीवर लोळूं लागले. नीलांबर उच्च स्वरानें तिला उद्देशून, "अनङ्ग, एकवार क्षमा कर. पुन्हां मी तुला सोडून कधींहि कुठें जाणार नाहीं" असें ह्मणाला व तिला धरण्याकरितां तिच्या मागून धांवूं लागला.

हे सर्व कल्पनेचे खेळ होते! नीलांबर दहापांच पावलें गेला नाहीं तोंच समोरच्या भिंतीमधें असलेल्या कपाटावर जोरानें आपटून मागें पडला, व त्याबरोबर मोठा आवाज झाला. तो ऐकून बंगल्यांतील सर्व चाकर एकदम खडबडून उठले व त्याच्या खोलीशीं धांवत आले. त्यांनीं दार ठोठावून पुष्कळ हांका मारिल्या परंतु आंतून मुळींच उत्तर आलें नाहीं; तेव्हां त्यांनीं दार फोडून आंत प्रवेश केला. त्यांच्या घाईत वामनदासानें आपलाहि आंत प्रवेश करून घेतला व कंदिलाचा उजेड झाल्याबरोबर मेजावर असलेलें पत्र घेऊन आपला पाय काढला. त्याला कोणीहि पाहिलें नाहीं.

आंत आलेल्या इतर सेवकांनीं दिव्याच्या उजेडांत पाहिलें, तों दाराच्या जवळच नीलांबर बाबूंचा सुंदर, सुकुमार व कांतियुक्त देह भूमीवर अस्ताव्यस्त पडला आहे! त्याच्या मस्तकांतून एकसारखें रक्त वहात होतें.

प्रकरण ६ वें.

अशोकपुरांत.

श्लोकः—बसुनी विटपावरी खगा । जरि गातोसहि गोड तूं मुदें ।
मज तें न रुचे, रहां उगा । हृदया वल्लभ-वृत्त दुःख दे ॥१॥
(वि. मो. महाजनी.)

कलकत्त्यास असलेल्या घनश्याम बोसांच्या बंगल्यापासून थोड्याच अंतरावर गोवर्धन घोषाल यांचे इष्टगुरु प्रेतोद्धार परमहंस हे एकटेच रहात असत. ते पुष्कळ दिवस नीलांबर यास संसाराच्या असारतेविषयीं अनेक तऱ्हेनें उपदेश करीत असत. नीलांबर शुद्धीवर आल्यावर कांहीं वेळानें त्यानें प्रेतोद्धार यांस बोलावून आणण्याकरित आपल्या एका सेवकास पाठविलें. ते आल्यावर त्यांच्या बरोबर नीलांबराचें बरेंच संभाषण झालें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ते दोघेहिजण कोणालाहि न कळवितां कोणीकडे निघून गेले, तें कोणालाहि समजलें नाहीं. चाकर नोकरांनीं त्यांनां सर्व ठिकाणीं धुंडाळलें, परंतु त्यांचा कोठेंहि मुळींच पत्ता लागला नाहीं.

दोन आठवड्यांनंतर, अशोकपूर येथील वाड्यांत एका बाजूच्या खोलींत अनङ्गमोहिनी एकटीच आपल्यापाशीं कांहीं विचार करीत बसली होती. इतक्यांत तिची परिचारिका वामा तेथें आली व ह्मणाली, "बाईसाहेब, आपण अझून इथेंच का बसलां आहां? एकदां बाहेर येऊन संध्याकाळची नदी किनाऱ्यावरील मौज तर पहा, ह्मणजे तुमच्या मनाला थोडा उत्साह येईल."

अनङ्गमोहिनी तिजबरोबर बाहेर आली. यावेळीं बाहेरील देखावा खरोखर फार रम्य दिसत होता. भगवान् सूर्यनारायण यासमयीं नुक्ताच अस्ताचलाकडे वळला होता, व जणों स्वप्रियेस भेटण्याच्या आतुरे-

तेनें त्याची कांति आरक्तवर्ण झाली होती. पश्चिमेकडे आकाशरूपी वितानावर निरनिराळे मनोहर रंग चित्रित होऊन त्यांचें प्रतिबिंब त्रिस्रोतेच्या शांत जलप्रवाहांत पडलें होतें. जिकडे तिकडे शांतता पसरली होती, फक्त आनंदी पक्षीगणांच्या कलकलाटानें मात्र त्या शांततेचा भंग होत होता!

अनङ्गमोहिनीच्या मनाला हा देखावा पाहून कहीं शांति वाटली खरी, तथापि पतीच्या समाचाराविषयींची तिची उत्सुकता दूर झाली नाहीं. कांहीं वेळानें ती वामेचा हात धरून जिज्ञासेनें ह्मणाली, "वामे, आज तूं नायबांच्या येथें गेली होतीस का ग? काय बातमी आहे तिकडची?"

वामा ह्मणाली, "बाईसाहेब, मी तुमच्या पायां पडतें पण मला पुन्हा कधीं त्या मेल्या माकडतोंडया झातारडयाकडे पाठवूं नका. त्याचं तें वस्कन् अंगावर ओरडणं अन् त्या शिव्या, मला नाहीं बाई सहन होत. मी दोनप्रहरीं त्याच्या येथें जाऊन ह्मटलें कीं, 'कलकत्त्याची काय हकीगत आहे? बाईसाहेबांची थोडे दिवस तिकडे जाण्याची इच्छा आहे,' तर मेला माझ्यावर केवढ्यानं खेंकसून ह्मणाला, 'चल नीघ येथून! परवांच तुला सांगितलं ना कीं पुन्हा त्यांच्याविषयीं विचारूं नकोस ह्मणून? मोठी आली आहे तपास करायला!"

"तो आतां कुठं आहे?"

"तो त्या मेल्या दुर्लभराय वकिलाबरोबर बोलत बसला आहे. आपल्या नायबांचं तें माकडासारखं तोंड आणि बोलतांना त्या पसरट ओंठांतून पाघळणारा रस पाहून, मला तर बाईसाहेब अगदीं पोट धरधरून हंसावसं वाटतं!"

वामेचा हा विनोद अनङ्गमोहिनीच्या गांवींहि नव्हता. ती म्हणाली, "वामे, गडे तूं तरी सांग आतां पुढें काय करूं तें?

मला तर बाई आज अगदीं कससंच वाटतं ! कांहीं सुचत नाहीं न् कुठेंही मन लागत नाहीं !"

वामा म्हणाली, "मी काय सांगूं बाईसाहेब ! आपण इतकं अधीर होऊं नये. धाकटे विनोद बाबू इतक्यांत इकडे येतील."

अनंङ्गमोहिनी म्हणाली, "जाते वेळीं तिकडून दोन महिन्यांनीं, एकवार तुला भेटायला जरूर येईन, असं सांगून जाणं झालं होतं. आतांतर दोन महिने होऊन वर तीन आठवडेहि होऊन गेले तरी अझून पत्ता नाहीं !"

वामा ह्मणाली, "त्यांनीं दोन महिने सांगितले, म्हणजे आपणहि अगदीं तितकेच समजून दिवस मोजित बसायचं कीं काय ? अहो दोन महिन्यांनीं नाहींतर तीन महिन्यांनीं येतील. पुरुषांचं काय ! त्यांच्याबद्दल आपण इतकं वाईट वाटून घेऊं नये."

"जवळ जवळ एक महिन्यांत पत्रबित्र कांहीं नाहीं ! पहिले कांहीं दिवस तिकडून पत्र पाठवणं झालं नसतंच म्हणा परंतु आतां इतके दिवसांत कांहीं नाहीं, तेव्हां समजावं तरी काय बाई माणसानं?"

"समजायचं कसचं बाईसाहेब? येतील बरं लवकरच ते. निदान एखादं पत्र तरी येईल असं मला अगदीं खात्रीपूर्वक वाटतं."

अनंङ्ग म्हणाली, "त्या दिवशीं कलकत्यास जाण्याच्या वेळीं माझ्या इतक्या परोपरीच्या विनवण्या अमान्य करायचं झाल आणि मला निष्ठुरपणानं इथं एकटीलाच टाकून जाणं झालं, हें खरंच माझ्या मनाला फार लागलं. कलकत्यास पोंचल्यावर तिकडचं पत्र आलं तेव्हां मी उत्तर लिहितांना असं लिहिलं कीं, जोंपर्यंत इकडे येऊन मला आपल्या बरोबर घेऊन जाणं होणार नाहीं तोंपर्यंत आपण मला पत्रहि पाठवूं नये आणि माझं नांवही घेऊं नये."

वामा म्हणाली, "छे छे; बाईसाहेब, तुम्ही असं उगीच त्यांना लिहिलंत; त्या गोष्टीचा कदाचित् राग येऊन त्यांनीं तुम्हाला पत्र पाठवलं नसेल. जवळ असतांना बोलल्याची गोष्ट निराळी पण पत्रांत असं ल्याहायचं नव्हतं."

"पण त्यांनीं तरी अजून पत्र कां पाठवूं नये? तिकडून महिन्या महिन्यांतहि पत्र येईनासं झालं तेव्हां मी इकडून दर दिवस पत्र पाठवूं लागलें. त्या पत्रांतून किती विनवणी केली, किती वेळां पदर पसरून क्षमेची भिक्षा मागितली आणि एक दोन वेळां तर 'याचं उत्तर न आल्यास आत्महत्या करीन' असंहि लिहिलं पण ज्याचं नांव तें; उत्तर म्हणून नाहीं! मला तर बाई यावरून आतां असं वाटूं लागलं आहे कीं, तिकडे जिवाला तरी चैन नसावं किंवा दुसरा कांहीं घोंटाळा तरी असावा!"

वामा म्हणाली, "छीः छीः, असं अमंगल मनांत सुद्धां आणूं नका बाईसाहेब. निःसंशय ते चांगल्याच स्थितींत आहेत. इतक्यांत नायबानां त्यांचं एखादं तरी पत्र आलं असेलच."

अनङ्ग म्हणाली, "मी तर रोज दोन तीन वेळां विनोद भावोजीनां त्यांच्या येथें कांहीं पत्र आलें किंवा नाहीं तें पाहण्यास पाठवितें; पण त्यांचं आपलं नेहमीं एक उत्तर—'अजून पत्र वगैरे कांऽऽहीं नाहीं!' बिचारे विनोद भावोजी दररोज रडत येऊन मजजवळ सांगतात कीं, पत्र नाहीं; अन् वामे, त्यांचं तसं उतरलेलं तोंड पाहिलं कीं नाहीं, म्हणजे माझंहि अंतःकरण अगदीं भरून येतं! मी त्यांना किती समजावून सांगतें कीं, 'बाळ; जास्त कामामुळं तिकडे पत्र लिहायला फुरसत होत नसेल; आतां लवकरच येणं होईल बरं.' पण 'लवकरच येतील' ह्या खोट्या आश्वासनानं तरी त्यांची किती दिवस समजूत होणार? त्यांची दुःखी कष्टी मुद्रा पाहिली म्हणजे मलाहि फार दुःख होतं! विनोद माझा

पंचप्राण आहे. पोटच्या मुलापेक्षांहि मी त्याला अधिक चाहते. तो आहे तर मला सर्व कांहीं आहे. खरंच, वामे, मी फुशारकी मारीत नाहीं, परंतु माझ्या विनूबद्दल माझ्या अंतःकरणांत जितकी माया वसत आहे तितकी प्रत्यक्ष त्याच्या आईच्याहि वसली नसेल! आमच्या सासूबाई वारल्यापासून मी मनांत असं समजतें कीं, मीच त्याला आईच्या ठिकाणीं आहे,—हा पहा, माझा विनोद इकडेच आला. ' ये बाळ असं रडायला काय झालं ?"

विनोदाला येतांना पाहिल्याबरोबर अनङ्गमोहिनी झटकर उठली व त्याला जवळ घेण्याकरितां हात पसरून पुढें गेली. दहा वर्षाच्या त्या सुंदर सुकुमार बालकानें डोळे पुशीत पुशीत येऊन अनङ्गमोहिनीच्या मांडीवर अंग टाकिलें, व तिच्या कुशींत तोंड खुपसून तो फारच रडूं लागला. अनङ्गमोहिनीनें त्याच्या मुखाचें एकवार प्रेमानें चुंबन घेतलें व मुखावरून हात फिरवीत म्हणाली, " उगी, विनू, काय झालं बाळ रडायला ? कोण काय बोललं ?'

विनोद वर तोंड करून अनङ्गमोहिनीच्या मुखाकडे पहात म्हणाला, " वहिनी, नायब म्हणाले, ' तूं रोजं रोज येऊन माझ्या योग–साधनांत व्यत्यय कां करतोस ? जें व्हावयाचें तें झालें ! आम्हीं काय करावें त्याला ?' मी म्हटलें काय झालें ? तर ते म्हणाले, ' काय झालें तें पत्र वाचल्यावर कळेल तुला.' तेव्हां मी विचारलें, ' कुठें आहे पत्र ?' तर ते रागावून म्हणाले, ' जा म्हणतोना तुला पाठवीन मग पत्र तिकडे. तेव्हां पहा. जा आतां !"

संशयानें अथवा विषादानें, क्रोधानें अथवा अभिमानानें, अनङ्गमोहिनीचें सर्व शरीर कंपित होऊं लागलें ! तिनें विनोदाचा हात धरला आणि अंतःपूर व त्यापुढील एक दालन ओलांडून ती बाहेर आली. वामाहि तिच्या मागोमाग आली व जिज्ञासेनें विचारूं लागली, " हें काय बाईसाहेब ? कुठं जातां ?"

अनङ्गमोहिनीचे आरक्त ओष्ठ थरथर कांपत होते. तिनें उत्तर केलें, "विष्णुमंदिरांत, त्या मेल्या दुष्ट नायबाकडे! मी स्वतःच जाऊन आतां काय आहे काय नाहीं तें विचारतें. पहातें कसा नाहीं मला धडपणें सांगत तें! चल दूर हो!"

विनोद अनङ्गमोहिनीचे हात धरून म्हणाला, "वहिनी तूं नको जाऊं, वामेला पाठव."

अनङ्गमोहिनीनें आपला राग किंचित् आंवरून धरिला व वामेकडे वळून म्हणाली, "तर मग तूं तरी जा वामे! नायबानां म्हणावं मी असं म्हणते आहे कीं, तुम्ही आत्तां या घटकेला इथं येऊन खरी काय हकीगत आहे ती सांगा अथवा पत्र असल्यास द्या! नाहीं तर मी आजच्याआज विनोदाला बरोबर घेऊन कलकत्याचा रस्ता धरतें!"

प्रकरण ७ वें.

दुःखवार्तेचा परिस्फोट.

श्लोकः—पोतो दुस्तर वारिराशितरणे, दीपांधकारागमे
निर्वाते व्यजनं, मदांधकरिणां दर्पोपशांतौ सृणिः।
इत्येतद्भुवि नास्ति यस्य विधिना नोपायचिंताकृता—
—मन्ये दुर्जनचित्तवृत्तिहरणे धातापि भग्नोद्यमः ॥ १ ॥

सुभाषित.

विष्णुमंदिरांतील आपल्या एकांत योगगृहांत बसून गोवर्धन, आपला प्रिय सहचर दुर्लभराय यांजबरोबर संभाषण करीत होता. राय महाशयांनीं त्यास विचारिलें, "तर मग आंतां नीलांबर बाबू पुन्हां इकडे येण्याची भीती नकोच?"

"आमच्या गुरुदेव प्रेतोद्धार परमहंसांच्या मोहिनी मंत्राचा त्याजवर असा कांहीं परिणाम झालेला आहे कीं, तो आतां फिरून संसारांत पडेल हें संभवनीयच नाहीं !"

"हल्लीं तुमच्या गुरुदेवांची व तुमची भेट झाली होती कीं काय ?"

गोवर्धन ह्मणाला, "ते स्वतः तर कांहीं भेटले नाहींत, परंतु त्यांनीं आपल्या एका विश्वसनीय शिष्याजवळ निरोप पाठविला होता. मी नुक्ता परवां रामनगरास गेलों होतों, तेव्हां त्याला भेटलों होतों. त्याच्याकडून मला असें कळलें कीं, गुरुदेव नीलांबराला दूरच्या जंगलांतील एका अत्युच्च व जनशून्य अशा पहाडावर घेऊन गेले आहेत, व ते तेथें त्याच्याबरोबर थोडे दिवस राहणार आहेत. नंतर कलकत्त्यास परत येऊन माझी भेट घेतील. मी त्यांना वाटखर्चासाठीं वगैरे पैसे पाठविले आहेत. एकंदरींत आतां थोड्या दिवसांत हें काम एकदां आटपून गेलें ह्मणजे आपण कांहीं काळपर्यंत निश्चित झालों !"

दुर्लभ:०—तो आतां फिरून संसारांत मुळींच पडणार नाहीं अशी जर खात्री असली तर मग निष्कारण त्याचा प्राणनाश तरी कशाला करायचा ? शिवाय जंगलामध्यें आणि अन्नाशिवाय तो असा कितीसे दिवस जगणार ? काढील जेमतेम कांहीं दिवस आणि पडेल एखाद दिवशीं एखाद्या वाघाच्या अथवा लांडग्याच्या भक्ष्यस्थानीं, ह्मणजे झालें ! मग तुह्मीं या अफाट संपत्तीचे भोक्ते आहांच !"

गोवर्धन दुर्लभचंद्राकडे पाहून व थोडा हांसून ह्मणाला, "हां, तुह्मीं ह्मणतां तें खरें आहे, आणि गुरुदेवांचेंहि मत तसेंच पडेल ! परंतु मला वाटतें, भाई, कंटक समूळच उपटून टाकावा हें फार बरें. एक प्रकारें झालें आहे हें ठीकच झालें आहे. परंतु न जाणों, तो वयानें पडला तरुण, शिवाय राजभोगांमध्यें लहानाचा मोठा झालेला ! फिरलें कदाचित् त्याचें मन तर ? तेव्हां मी म्हणतों या

कंटकाला अजीबातच जगांतून नाहींसें करावें म्हणजे ठीक! मग या सर्व पंचाइतीचें मूळच नाहींसें झालें! बरें, आतां आमचे गुरुदेव येतील तेव्हां त्यांच्या संमतीनें पुढचा बंदोबस्त करूं. त्याला येथून काढून लावण्याचें बिकट काम तर पार पडलें! आतां याचें काय–सहज उडवून टाकूं! कसें?–"

"हो हो! माझेंहि म्हणणें तेंच आहे."

"अद्याप या गोष्टीचा निकाल काय करायचा, यांच्याबद्दल तुम्हाला पुष्कळ विचारायचें आहे."

"आतां काय राहिलें बोवा विचारायचें?"

"नीलांबर तर आतां कायमचाच गेला येथून. त्याजबद्दलची काळजी तर आतां मिटलीच. परंतु आतां त्याची बायको व तो विनोद यांचें एक लचांड मागें लागलें आहे! तीं दररोज दोन तीन वेळां येऊन मला विचारितात कीं, 'नीलांबर कुठें आहे? कसा आहे? पत्र कां नाहीं?'–याला काय करावें? यांनां काय सांगून यांचीं तोंडें बंद करावीं आतां?"

रायमहाशय चिंताग्रस्त होऊन म्हणाले, "हो हें तरी एक संकटच आहे; किंवा त्यांनां स्पष्टच कां असें सांगाना कीं, नीलांबर बाबूंना एकाएकीं उन्मादरोग झाला व संसार परित्याग करून संन्यासधर्म स्वीकारून ते कोणीकडे निघून गेले, त्यांचा पुष्कळ शोधांतीहि मुळींच तपास लागत नाहीं."

गोवर्धन मस्तक हालवून म्हणाला, "छे छे; भाई, त्याच्या बायकोचा स्वभाव तुम्ही पुरा ओळखलातच नाहीं तर मग. तें प्रकरण कांहीं इतकें सहजासहजीं वळणारें नाहीं, एवढें तुम्हीं पक्कें ध्यानांत ठेवा! तसें जर तिला सांगितलें तर ती भलतेंच आणखी कांहीं तरी उपस्थित करील. ती असें निःसंशय म्हणेल कीं, माझ्याबरोबर लोक द्या म्हणजे मी स्वतः जाऊन त्यांचा पत्ता लावून

आणतें. मी एक उपाय योजून ठेवला आहे: तिला सांगावें कीं, नीलांबर गंगासागर तीर्थामध्यें पडून मृत्यू पावला; ह्मणजेच या हटवादी स्त्रीचें नाक जरा तरी खालीं होईल. याहून अन्य उपाय आपणांला कांहीं बोवा दिसत नाहीं.—कोण ? यावेळीं दाराशीं कोण आहे ?"

बाहेरून पुनः कोणी दार ठोठावून ह्मटलें, "नायब महाशय, बाईसाहेबांनीं मला तुमच्याकडे पाठविलें आहे"—

गोवर्धन रागानें ह्मणाला, "भाई, हें पहा. आतां ही आली विचारायला फिरून. मग आतां आपला विचार ठरल्याप्रमाणेंच देतों सांगून. उशीर कशाला उगीच ?"

गोवर्धनानें दरवाजा उघडून ह्मटलें, "कोण आहे ? तूं कां ? हल्लीं तूं दररोज काय ह्मणून माझा योगभंग करीत असतेस ! बेशरम कुठली ! बोल काय बोलायचें तें लवकर."

वामा ह्मणाली, "बाईसाहेबांनीं सांगितलें आहे कीं कांहीं पत्र वगैरे आलं असल्यास—"

गोवर्धन ह्मणाला, "समजलों, समजलों; पुढें बोलूं नकोस. माझ्यावरची तूंच जाऊन तुझ्या बाईसाहेबांना सांग कीं, हकीगत कळली आहे, मी थोड्या वेळानें येणारच होतों तिकडे. पण येऊन तरी काय सांगूं ? सर्व नाश झालेला आहे ! काल रात्रीं तिकडील कारभाऱ्याचें हें पत्र आलें आहे तेंच मी देतों. वाचून पहा ह्मणजे सर्व कांहीं कळेल. आज पांच दिवस झाले, नीलांबर बाबू गंगासागर तीर्थांत पडून मृत्यु पावले !"

हें ऐकतांच वामा एकदम मोठ्यानें रडूं लागली व तशीच अंतःपुराकडे निघून गेली.

प्रथम सर्ग समाप्त.

अनङ्ग मोहिनी.

सर्ग दुसरा.

प्रकरण १ लें.

विजयवल्लभ दत्त.

श्लोकः—पुढें हें करूं तें करूं पुण्य साधूं
धनें मेळवूं मंदिरें थोर बांधूं ।
असें शुद्ध वेड भ्रमीं या रहाणें
उद्यां काय होईल तें कोण जाणें ! ॥ १ ॥

(वि. कों. ओक.)

अशोकपूरचे जमीदार घनश्याम बोस यांच्या वाड्यापासून बऱ्याच अंतरावर विजयवल्लभ दत्त या नांवाचा दुसरा एक जमीदार रहात असे. दोघांचीहि अशोकपूर येथें व आसपासच्या गांवांतून फारच मानमान्यता होती. परंतु पुढें, दीर्घकालव्यापी, स्पर्शजन्य रोगाप्रमाणें सर्वत्र पसरलेला, व आत्मध्वंसी असा जो द्वेषानल या देशांतील बहुतेक जमीदारांच्या सन्मान व संपत्तीचा नाश करीत आहे त्यानें अल्प काळांत उभयतांच्याहि मनांत प्रवेश केला.

लक्ष्मीची दृष्टी कोणावर केव्हां वक्र होईल व कोणावर केव्हां दयार्द्र होईल याचा काय नेम आहे ! बाबू घनश्याम बोस यांची कलकत्त्यास एक पेढी होती. त्यांना त्या धंद्यांत एकेवेळीं फारच थोड्या अवधींत पुष्कळ फायदा झाला. तेव्हां त्यांनीं आसपास असलेल्या गांवांतून दुसरीहि बरीच जमीन खरेदी केली. पुढें

तें आपला प्रतिस्पर्धी विजयवल्लभ याचा अहंकार नाहींसा करण्याकरितां बऱ्याच सढळ हातीनें खर्च करूं लागले. त्यांनीं आपल्या गांवांत दुर्गापूजादि अनेक महोत्सव सुरू केले; पितृश्राद्धाच्या वेळीं दूरदूरच्या गांवचे लोक निमंत्रित करून बराच खर्च केला व गरीब दीन दुबळे इत्यादिकांस द्रव्याची खैरात केली. विजयवल्लभहि कांहीं कमी नव्हता. त्यानें तर घनश्यामबाबूपेक्षांहि अधिक थाटानें आपलीं कार्यें केलीं. वास्तविक पाहूं गेलें असतां, त्याच्याजवळ तसा खर्च करण्यासारखा पैसा नव्हता, परंतु चढाओढ करण्याच्या हांवेनें थाटमाटाचा खर्च करण्यासाठीं हळुहळू आपल्या जमिनीचा एक एक भाग गुप्तपणें विकण्यास त्यानें आरंभ केला होता! त्याच्या कित्येक हितेच्छु आप्तेष्टांनीं त्यास तसें न करण्याबद्दल परोपरीनें सांगून पाहिलें, परंतु त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं.

असें होतां होतां पुढें कांहीं दिवसांनीं उभय जमीदारांमध्यें एका गांवाच्या जमीदारीसंबंधीं तंटा उपस्थित झाला. पुढें सरकारदरबार होऊन अखेरीस घनश्यामबाबूंस जय मिळाला व विजयवल्लभास एकंदर खटल्याचा खर्च भरून द्यावा लागला. तो गांव बोसांच्या ताब्यांत आल्यावर त्यांनीं त्याच्या पश्चिम भागीं वहात असलेल्या त्रिस्रोता नदीच्या सुंदर किनाऱ्यावर पाण्यासारखा पैसा खर्चून व दूरदूरच्या ठिकाणांहून कारागीर आणवून एक अति सुंदर व भव्य असा वाडा बांधिला, व त्याच्या सभोंवती मनोहर फलपुष्पवृक्षादिकांनीं युक्त असा एक बगीचाहि तयार करविला. त्या वाड्याचें ‘ कैलासभवन ’ असें अन्वर्थक नांव ठेवण्यांत आलें. तें सर्व काम संपूर्ण झालें तेव्हां दूरदूरचे लोकहि तें पाहण्याकरितां मुद्दाम तेथें आले. त्या प्रासादाचें अतुलनीय शिल्पनैपुण्य आणि तें मनोहर उद्यान पाहून सर्व लोकांच्या तोंडून साहजिकच त्याच्या मालकाविषयीं धन्योद्गार निघाले!

सरकारदरबाराच्या खटपटींत बराच द्रव्यनाश होऊन शेवटीं बरीच इष्टेट आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या हातीं गेल्यामुळें विजयवल्लभाच्या मनास मोठा धक्का बसला व वरील गोष्ट घडल्यानंतर अल्प कालानेंच त्याचा अंत झाला! विजयवल्लभाच्या ह्या आकस्मिक मृत्यूमुळें त्याचा एकुलता एक पुत्र विनयकृष्ण हा मात्र फारच संकटांत पडला. त्याच्या पित्यानें मागें रोकड द्रव्य असें कांहींच ठेविलें नव्हतें, व जमीदारीहि इतकी थोडी उरली होती कीं, ती विकूनहि एकंदर पितृकार्य होण्यासारखें नव्हतें! त्यामुळें तो चिंतेनें फारच व्याकुळ झाला. त्याच्या पित्याच्या मृत्यूस सुमारें एक आठवडा झाल्यानंतर एके दिवशीं विनयकृष्ण आपल्या वाड्यांतील पूजागृहांत एकटाच बसून विषण्ण मनानें विचार करीत असतां, अंतःकरण विशेष व्याकुळ होऊन त्याच्या नेत्रांतून हळुहळू अश्रु वाहूं लागले! इतक्यांत एकाएकीं आपल्या समोर आपल्या पित्याचा प्रतिस्पर्धी घनश्याम बोस यास पाहून त्याला फारच आश्चर्य वाटलें. तों उठून उभा राहिला, परंतु मनांतील खेद आंवरेनासा होऊन त्याच्या डोळ्यांतून आधिक अश्रु वाहूं लागले. घनश्याम बाबूनांहि तें पाहून फार वाईट वाटलें! त्यांनीं विनयकृष्णास प्रेमानें आपल्या पोटाशीं धरून म्हटलें, "विनय, इतकें वाईट वाटून घेण्याचें कांहीं कारण नाहीं, समजलास! मी आजपासून तुमचा वैरी नव्हे, मित्रच आहें असें समज. निःसंशय तुझ्या पित्याच्या अकालिक मृत्यूला मीहि थोडा बहुत कारणीभूत झालों याबद्दल मला फार वाईट वाटतें. मीच जर मागें निष्कारण विकारवश न होतां तुझ्या पित्याला कमीपणा आणण्याच्या हेतूनें माझें वैभव वाढविलें नसतें, तर आज तुझ्यावर ही विपत्ति बहुतांशी आली नसती. तेव्हांपासून माझ्या मनानें तर असें घेतलें आहे कीं, माझ्या या पापाला कांहीं तरी प्रायश्चित्त आवश्यक आहे. पितृश्राद्ध

वगैरे कार्याबद्दल तूं आतां बिलकूल काळजी करूं नको, मी स्वतः माझ्या खर्चानें तें करीन. परवांपासून मी त्याच्या तयारीस लागतों. उद्यां तूं एकदां माझ्याकडे येऊन मला भेट. मात्र तुला माझें एकच सांगणें आहे कीं, यापुढें तूं मला आपल्या शत्रूप्रमाणें लेखूं नयेस."

परदुःखदुःखी, उदारहृदयी घनश्याम बोसानें बोलल्याप्रमाणें यथास्थित पैसा खर्च करून आपल्या स्वर्गवासी प्रतिस्पर्ध्याचें क्रियाकर्मांतर फारच उत्तम रीतीनें पुरें केलें! एके दिवशीं घनश्याम विनयकृष्णास म्हणाला, "आजपासून तुला मी माझ्या जमीदारीचा सर्व मुखत्यार व्यवस्थापक नेमिलें आहे. इतर कामगारांवर फक्त देखरेख करण्यापलीकडे तुला कांहीं करावयाला नको. मात्र माझ्या जुन्या कामदारांना तूं कामावरून दूर करूं नकोस म्हणजे झालें. तुला दरमहा वेतन आमचे नायब गोवर्धन घोषाल यांजपेक्षां दहा रुपये अधिक मिळत जाईल. मला तुझें सुशील आचरण आणि सरळस्वभाव फारच पसंत आहे!"

विनयकृष्णानें घनश्याम बोसांच्या मुखाकडे कृतज्ञेनें पाहून म्हटलें, "आपल्या इतक्या स्नेहाला, इतक्या दयेला, मी खरोखर पात्र नाहीं; परंतु माझ्याकडून होतां होईल तितकें करून मी आपणांस, अपात्रीं दया केली, असें कधींहि वाटूं देणार नाहीं."

तेव्हांपासून विनयकृष्ण दररोज बोसांच्या वाडयांत जाऊं लागला. त्याचें लग्न पांच सहा वर्षांपूर्वीच सुमती नामक एका सुंदर सुशील स्त्रीशीं झालें होतें त्याला निर्मला नांवाची एक चार वर्षांची सुंदर कन्या होती. तीहि कित्येक वेळां आपल्या पित्याबरोबर तेथें जात असे. या सुमारास घनश्याम बोसांच्या द्वितीय पुत्राचें वय सहा सात वर्षांचें होतें. घनश्यामास या मनोहर शिशुद्वयाची शैशवक्रीडा पाहून अपरिमित समाधान होत असे.

एके दिवशीं तीं दोघेंहि त्याच्या बैठकीच्या जवळच बाहेरील चौसोपींत आनंदानें खेळत होतीं. दोघेंहि केव्हां मध्येंच एकमेकां-बरोबर भांडत, अथवा केव्हां एकमेकांवर रागावून एकमेकांपासून दूर जाऊन उभीं रहात परंतु अखेरीस पुनः पूर्ववत् एक होऊन हसूं खेळूं लागत. घनश्याम आंत बसून प्रेमानें व कौतुकयुक्त दृष्टीनें त्या बालकद्वयाची ती लीला पहात होता. कांहीं वेळानें त्यानें आपल्या एका सेवकाला विनयकृष्णाला बोलावून आणण्यास पाठ-विलें. विनयकृष्ण ताबडतोब तेथें आला. त्यास उद्देशून घनश्याम म्हणाला, "विनय, हें पहा; हीं दोघें कशीं आनंद करित आहेत! मला तर वाटतें यापेक्षां अधिक सुंदर असें दुसरें दृश्य सर्व जगांतहि नसेल. मी बराच वेळ येथें बसून त्यांचा खेळ पाहतों आहें त्यामुळें माझ्या अंतःकरणांतील संसारसंबंधी क्लेशदायक गोष्टी अगदीं पार नाहींशा झाल्या व मन कसें प्रफुल्लित झालें! आज माझ्या मनामधें एक निराळीच कल्पना आली आहे, ती मी तुला सांगू का?"

विनयकृष्ण हात जोडून म्हणाला, "आपला कृपाप्रसाद होण्यास कोणती हरकत आहे?" घनश्याम हांसून बोलला "कल्पना अशी आली आहे कीं, ह्या सीतारामाप्रमाणें शोभणाऱ्या जोडप्याचें लग्न करून दिलें, तर किती उत्तम होईल?"

विनयकृष्णाला हें ऐकून अत्यानंद झाला; त्याला जणों एकाएकीं आकाशस्थ चंद्र हातीं आल्यासारखें झालें. त्यानें नम्रपणानें उत्तर केलें, "इतकें आमचें भाग्य कोठें आहे?" घनश्याम किञ्चित् विरक्तपणानें म्हणाला, "तूं जरी आज प्राक्तनाच्या वैचित्र्यानें माझा अंकित झाला आहेस तरी तुला असें बोलणें शोभत नाहीं? तुमचें घराणें आमच्या अगदीं तोडीचें असून काडीमात्रहि कमी दर्जाचें

नाहीं हें तूं विसरलास काय ? मग तुझ्या कन्येशीं माझ्या पुत्राचा विवाह होण्याला काय हरकत आहे ? "

विनयकृष्ण म्हणाला, "आपण केवळ दयेचे सागर आहां. आपणाला अशक्य काय आहे ?"

घनश्याम बोलला, "ह्यांत दयेचा बियेचा संबंध नाहीं. इच्यासारखी सुलक्षणी, सर्वांगसुंदर व अनुरूप अशी मुलगी मला कोठें मिळणार ? तर मग आज आपला हा वाङ्निश्चयच झाला म्हाणायचा ! विनोदा बरोबर निर्मलेचा विवाह कायम; परंतु ही गोष्ट दोघेहि अगदींच लहान असल्याकारणानें आणखी चार वर्षांनीं घडून येईल."

कमल पत्रावरील जलबिंदुप्रमाणें चंचल अशा मानव जन्मांत, मनुष्याच्या किती आशा, किती महत्वकांक्षा, किती भावी सुखाच्या कल्पना आकस्मिक मृत्यूबरोबर एका क्षणांत विलय पावतात ! दोन वर्षांच्या आंतच घनश्याम बोसांच्या मानवजन्माची इतिश्री झाली व त्या मनोहर बालकांनां विवाहरज्जूंनीं बद्ध करण्याची त्यांची आशाहि जागच्या जागींच जिरून गेली !

प्रकरण २ रें.

मृत्युवार्तेचा संदेह.

उद्भासिताखिलखलस्य विशृङ्खलस्य
प्राग्जातविस्मृतनिजाधमकर्मवृत्तेः ।
दैवादवाप्तविभवस्य गुणद्विषोऽस्य
नीचस्यगोचरगतैःसुखमास्यते कैः ॥

नीतिशतक.

प्राय: बहुतेक सर्व लोकांचा असाच अनुभव असतो कीं, शुभ-वर्तमान हें अनेक वेळां मिथ्या ठरून निराधार असतें; परंतु अशुभ वर्तमान—विशेषतः मृत्यूसंबंधीं, बहुशा खोटें असत नाहीं.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें अनंगमोहिनीची परिचारिका वामा हिनें गोवर्धन घोषालाच्या तोंडून नीलांबराचा गंगासागरतीर्थांत पडून मृत्यु झाल्याचें ऐकतांच, मोठ्यानें आक्रोश करीत जाऊन अनंग-मोहिनीला तें वर्तमान कळविलें.

वज्राघाताप्रमाणें दारुण असें तें वृत्त कानीं पडतांच बिचाऱ्या कोमल हृदयी अनंगमोहिनीची स्थिति काय झाली तें वर्णन करितां येणें अशक्य आहे! आर्य स्त्रियांच्या सुखाचें, प्रेमाचें, आशेचें मूलस्थान आणि आधिदैवत म्हणजे पती, आणि ऐन तारुण्यभरांत भावी सुखोपभोगाच्या सर्व कल्पना व्यर्थ होऊन त्या पतिदैवताचा अकस्मात् कायमचा वियोग झाल्यावर त्यांच्या कोमल अंतःकरणास केवढा बरें धक्का बसत असेल! अनंगमोहिनीचा स्वभाव जसा अत्यंत प्रेमळ व दयाशील होता तसाच तेजस्वीहि होता. परंतु वरील दुःख-कारक वृत्त ऐकिल्यापासून मात्र तिची मनोवृत्ति एकदम उदासीन झाली. तें वृत्तच भयंकर असल्यामुळें त्याच्या सत्यत्वाविषयीं संशय घेण्याइतकें अथवा शोध करण्याइतकें मनोधैर्य तिच्या अंगीं राहिलें नाहीं. अशोकपुरांतील सर्व आबालवृद्धांनाहि तें वर्तमान ऐकून अत्यंत वाईट वाटलें; परंतु त्यांस काडीमात्रहि संदेह उत्पन्न झाला नाहीं.

घनश्याम बोसांच्या कलकत्त्याच्या बंगल्यांतील चाकर नोकर बहुधा अशोकपुरीं येत नसत. नीलांबर कोणीकडे गेला हें त्यां-पैकीं कोणालाहि ठाऊक नव्हतें; व त्याच्या एकाएकीं नाहींसें हो-ण्याचें कारण म्हणजे वामनदासानें नेलेलें पत्र, याविषयीं तर त्यांना बिलकूल माहिती नव्हती. शिवाय गोवर्धनानेंहि त्यासंबंधीं योग्य

ती व्यवस्था पूर्वीच करून ठेविली होती. त्यामुळें नीलांबराच्या मृत्यूविषयीं विशेषसा कोणाला संशय आला नाहीं, व त्यासंबंधीं चौकशीहि झाली नाहीं.

वाचकहो, तुह्मांला कळून चुकलेंच असेल कीं, गोवर्धनानें, घनश्याम बाबूंच्या मृत्यूनंतर तीन वर्षांनंतर नीलांबराविषयींची ही अंगावर शहारे आणणारी निराधार बातमी केवळ स्वार्थासाठींच उठविली होती. !

त्या गोष्टीला हळूहळू तीन वर्षे लोटलीं. अद्यापपर्यंतहि नीलांबराच्या मृत्यूची हकीगत खोटी आहे, असें कोणालाहि वाटल्याचें दिसून आलें नाहीं. हीं गेलीं तीन वर्षे अनङ्गमोहिनीनें केवळ खडतर व्रताचरणांत व आपल्या प्रियपतीच्या आराधनेंत घालविलीं. तिनें संसारविषयक गोष्टींकडे इतक्या काळांत ढुंकून सुद्धां पाहिलें नाहीं. आपण मेल्यानंतर आपली व आपल्या प्रिय देवतुल्य पतीची भेट स्वर्गांत होईल, अशी तिची दृढ समजूत होती. ती प्रत्यहीं प्रातःकाळीं उठत असे, व प्रातर्विधी आटोपून स्नान वगैरे करून शुचिर्भूत होऊन तुलसीची व श्रीविष्णूची गंधपुष्पादिकांनीं यथासांग पूजा करीत असें. इतकें झाल्यावर ती मनःपूर्वक ईश्वराची प्रार्थना करून नंतर जेवण तयार होईपर्यंत पोथीपुस्तकादि वाचण्यांत आपला काळ दवडीत असे.

'बामा, अत्यंत आवश्यक अशा गोष्टी खेरीजकरून इतर संसारविषयक गोष्टी, अनंगमोहिनीजवळ, ती अगदींच विरक्त होईल या भीतीनें फार करून बोलत नसे. अनङ्गमोहिनीहि त्यासंबंधीं विशेष चौकशी न करितां विनोदाशींच काय तें पुष्कळ वेळ व मोकळेपणानें बोलत असे. विनोद केव्हां अतिशय वाईट वाटून रडत बसला ह्मणजे, अनङ्गमोहिनी त्याजवळ जात असे, आणि प्रेमानें

जवळ घेऊन व त्याच्या तोंडावर हात फिरवून त्यास अनेक समजुतीच्या गोष्टी सांगत असे.

अशा रीतीनें हळुहळू तीन वर्षे निघून गेलीं. एके दिवशीं वामा तिजजवळ येऊन ह्मणाली "बाईसाहेब, दत्तांच्या सुमतीबाई आपल्याला भेटायला आल्या आहेत. घेऊन येऊं का त्यांना आंत ?" 'होय' अनङ्गमोहिनी ह्मणाली.

वामा बाहेर गेली, व थोड्याच वेळांत विनयकृष्ण दत्तांची पत्नी सुमती—निर्मलेची आई,—हीस आंत घेऊन आली. आंत येतांच अनङ्गमोहिनीनें सुमतीस आदरपूर्वक बसावयास सांगितलें. किंचित्काल दोघीहि स्तब्ध राहिल्या. नंतर एकमेकींचे कुशल प्रश्न विचारिल्यावर सुमती अनङ्गमोहिनीस ह्मणाली "मी या पूर्वीहि एक दोनदां तुमच्या वाड्याकडे आल्यें होत्यें, परंतु दोन्ही वेळां तुमची भेट होणार नाहीं असं कळल्यावरून मग तशीच परत गेल्यें. मी मागें आल्यें होतें, त्याला कांहीं नाहीं तरी बरेच महिने झाले ! पण तेव्हांच्यांत नी आतांच्यांत तुमच्यांत पुष्कळच कींहो फरक पडला ! तुमचा चेहरा किती तरी सुकून गेला ! खरंच, बाई, झाल्या गोष्टीसंबंधीं असं सदोदित झुरणं बरं का ? आणि त्यांतल्या-त्यांत तुमच्यासारख्या समंजस बायकांनां हें शोभतं का ? अदृष्टांत जें असतं तें कां कुणाच्यानं चुकवणार आहे ? पुढं असं होईल हें कुणाच्या स्वप्नीहि नव्हतं ! ह्मणून त्याच्याबद्दल अद्यापपर्यंत इतकं वाईट वाटून घेणं हेंहि कांहीं बरं नव्हे. अन् अशा मनच्यामनांत तुह्मी झुरणार तरी कुठवर ? एकदां पृथ्वीवर जें मनुष्य जन्माला आलं त्याला मरण हें आहेच. खरंच बाई, तुमच्याकडे पाहिलं किंनई ह्मणजे माझी तर अगदीं छाती फाटून जाते ! नी तुमच्या ह्या सोन्यासारख्या संसाराची—"

अनङ्गमोहिनी सुमतीला मधेंच थांबवून ह्मणाली "आज हें काढलंत तरी काय वहिनी? माझा सोन्यासारखा संसार! मी ह्मणजे कोण? काया गेली नी छाया राहिली.! तिचं काय आतां घेऊन बसलांत? तिकडून मला नेहमीं उपदेश करायचं होत असे कीं, पतिपत्नीपैकीं कोणीहि जरी अगोदर किंवा मागाहून मृत्युमुखीं पडलं, तरी स्वर्गांत गेल्यावर त्यांची भेट ही होणारच! आणि ह्याच आशेवर मीहि आजपर्यंत जीव धरून आहें. ती वाणी कदापीहि मिथ्या होणार नाहीं, अशी माझी पक्की खात्री आहे. माझ्या चर्म-चक्षूंना जरी ती मूर्ती हल्लीं दिसत नाहीं नी पुढेंहि दिसणार नाहीं, तरी ती माझ्या मानसचक्षूं पुढं अहोरात्र खेळत आहे, माझी तर त्या जगन्नियंत्या भगवंतीजवळ सदोदित इतकीच विनंति आहे कीं, देवा, माझी इथून एकदां लवकर सुटका कर, ह्मणजे मला सर्व कांहीं मिळालं.

सुमः—तें सर्व खरं पण सध्यां आहे हा संसार कोणाचा?

अनङ्गः—ज्यांच्यासाठीं संसार करायचा तेच जर गेले, तर आतां त्याला घेऊन हो काय जाळायचं आहे? आणि माझा त्याशीं संबंध तरी काय? निदान ह्या जन्मांत तरी तें आतां होणार नाहीं!

यावर थोडावेळ कोणीच कांहीं बोललें नाहीं. नंतर कांहीं वेळानें पुन्हां अनंगमोहिनी म्हणाली "बरं वहिनी, जाऊद्या त्या गोष्टी. तुम्ही कोणत्या कामाकारतां आलांत आज?"

सुः—तुमचीच जर स्थिति ही, तर माझं दुःख तरी मी तुम-च्यांजवळ कोणत्या तोंडानं सांगूं? परंतु आतां बोलल्यावांचून गत्यं-तरच नाहीं; तेव्हां लज्जा-शरम सगळं कांहीं सोडून तसं करणं भाग आहे. मी जास्त बोलतें त्याची क्षमा करा.

अनंग—माझ्याजवळ जर तुम्हांला कांहीं संसारसंबंधी गोष्ट बोलायची असेल, तर मात्र तें बहुतेक व्यर्थच समजा. बाकी मग—विचारा; मी ऐकत्ये. काय म्हणणं आहे तुमचं?

सुः—म्हणणं दुसरं काय असणार ? 'आज जवळ जवळ आठ वर्षं झालीं ? माझी निर्मला तेव्हां साडेचार पांच वर्षांची असेल. तुमचे मामंजी त्या वेळीं होते. तुम्हांला आठवत असेलच त्यांनीं त्यावेळीं तुमच्या विनोदलालाबरोबर माझ्या निर्मलेचं लग्न करण्याचं कबूल केलं होतं तें ? तेव्हां आमच्या तिकडेहि तेंच नक्की ठरवून, दुसरं कुठं स्थलसुद्धां बघायचं नाहीं, असा निश्चय करणं झालं होतं. सगळं खरं पण मेला काळ का कुणाची वेळ अवेळ लक्षांत घेणार आहे ? पुढें आणखी कांहीं दिवस जर तुमचे मामंजी वांचते, तर आज आम्हांलाहि असं घोटाळंत बसावं लागलं नसतं. पुढं गोष्ट काढायची तों तुमचं असं झालं ! तिथं तरी कुणाचा उपाय चालणार ? ' ह्या एकंदर अशा चमत्कारिक गोष्टी मधें घडून आल्या कारणानं सर्वच लांबणीवर पडत गेलं. परंतु, बाई, तुम्हांला दिसतंच आहे; आतां कांहीं पुढं निर्मळेला तसंच ठेवतां यणं शक्य नाहीं. तिचं वयहि काहीं थोडं नाहीं, जवळ जवळ बारा तेरा वर्षं झालीं ! तेव्हां अशा ह्या स्थितींत आमच्या मनाची स्थिति कशी बरं होत असेल ? याचा तुम्हींच विचार करा. आमची का थोडीच कांहीं मोठी जमीदारी, इष्टेट आहे, तर तिच्या जिवावर आम्हीं उड्या माराव्या ? येऊन जाऊन मेलं बघायला गेलं तर सारं एक खेड नी घर; जेम तेम पोट सुटणार. तेव्हां आतां करावं कसं ?

अनंगः—मामंजीनीं निर्मलेला विनोद भावोजींना करायचं नक्की केलं होतं, हें कोण नाहीं म्हणतं ? ही गोष्ट तर सगळ्या गांवालासुद्धां ठाऊक आहे ! आमच्या मामंजीनीं नी सासुबाईनीं तर तेव्हांपासूनच तिला ' सूनबाई ' म्हणून हांक मारण्यालासुद्धां आरंभ केला होता. मीसुद्धां कितीकवेळां थट्टेनं विनोद भावोजींच्या आणि निर्मलेच्या वस्त्रांनां गांठ दिली आहे ! असं जर

आहे, तर तुमचे पती ह्याबद्दल गोवर्धनांच्याजवळ गोष्ट कां काढीत नाहींत ?

सु:—मग तिकडून अद्याप कांहीं बाकी का ठेवणं झालं आहे, असं तुह्मीं समजतां ? ते तर आजपर्यंत ‘ तुमच्या मनांत आहे तसंच होईल. काळजी करण्याचं कारण नाहीं ’ असंच आशेचं बोट लावीत होते. परंतु आज दोन दिवस झाले; तिकडून गोवर्धनांकडे जाऊन पुन्हां एकदां गोष्ट काढण्याच झालं होतं. त्यावेळीं ते ह्मणाले ‘ तुह्मांला काय वेड लागलं आहे ? तुह्मी ही भलतीच इच्छा करतां तरी कसे ? लहान मुलानें आकाशांतला चांदवा मागण्यासारखंच आहे हें ! तुमच्या मुलीचा आणि घनश्याम बोसांच्या मुलाचा कधीं तरी विवाह होणं शक्य आहे का ? तिकडून मला हें सर्व सांगणं झालं. तेव्हां मला सुद्धां फारफार वाईट वाटलं. पहा ! ह्या अशा गोष्टी आहेत. तुह्मांला ह्मणून आज सारं सांगितलं.

सुमतीचें वरील बोलणें ऐकून अनङ्गमोहिनीचें सुंदर मुख किंचित्काल क्रोधानें आरक्त दिसूं लागलें. ती थोडा वेळ स्तब्ध राहिली; तिच्या मुखावरची क्रोधाची छटा जाऊन तें उदास दिसू लागलें. ती एक दीर्घ निःश्वास टाकून ह्मणाली “ काय करावं हो वहिनी ! माझी स्थिती हल्लीं एकाद्या विषदंतहीन सर्पिणीप्रमाणं झाली आहे ! आज जर माझे पती जिवंत असते—मग ते कितीहि दूर असते तरी हरकत नव्हती—तरी तेवढ्यावरच मी माझा हवातसा अधिकार चालवून, ह्या गोवर्धनाचा गर्व चांगलाच उतरला असता. पण मला आतां तसं तेज दाखवितां येत नाहीं, मला तसा गर्व नाहीं, अभिमान नाहीं, व तसा अधिकार चालविण्याची इच्छाहि नाहीं. त्यांच्या बरोबरच माझं सर्व लयाला गेलं. ”

इतकें बोलतां बोलतां अनङ्गमोहिनीचा कंठ दाटून आला; तिच्या कमल नेत्रांतून अविरल अश्रुवषाव होऊं लागला.

सुमतीनें आपल्या पदरानें तिचे डोळे पुसले व ह्मणाली "छे, छे, बाई, हें काय? असं रडूं नका गडे. अधिकार नाहीं असं कां ह्मणतां? सर्वांवर अधिकार तुमचाच आहे."

अनङ्गः—अधिकार असेल, नाहीं कोण ह्मणतं? पण मी याउप्पर तो चालवूं इच्छित नाहीं, अथवा मला तें शक्य नाहीं, असंच कां ह्मणाना घटकाभर? मी असं म्हणतें, वहिनी, तुम्हीं पुन्हां एकदां तुमच्या पतींना गोवर्धनांकडे विचारायला जायला सांगा. मीहि एकदां कोणाच्या तरी तोंडीं निरोप पाठवतें त्यांना तसा. पण, वहिनी एवढाच वेळ हां, पुन्हां कांहीं मी त्यांना त्याबाबत एक अक्षर सुद्धां सांगायची नाहीं. ह्या संसाराच्या गोष्टींत मी केवळ तुमच्याच साठीं ह्मणून आज पुन्हां मन घालतें! विनोदाचं एवढं लग्न झालं, म्हणजे मात्र मी अगदीं कश्शा कश्शांत मन घालायची नाहीं.

सुः—कुठून तरी होवो एकदां तसंच. आह्मांला तर बाई हल्लीं अन्न सुद्धां गोड लागेनासं झालं आहे! तुम्ही आतांपर्यंत माझी बापडीची दुःखाची कहाणी ऐकून घेऊन त्यांत मन घातलंत हेंच मी ह्मणतें किती तरी काम झालं. हो पण बाई, तुमच्याजवळ एक गोष्ट मी फार दिवस बोलेन बोलेन ह्मणतें. तुमचं जर वचन असेल तर सांगतें.

अनः—काय आहे? खुशाल सांगा माझी कांहीं हरकत नाहीं.

सुः—गोवर्धन हा कशा प्रकारचा आहे नी किती दुष्ट आहे, हें तुह्मी जाणत असाळच.. मी असं एक ऐकलं आहे कीं; नीलांबर बाबूंच्या संबंधाची हकीगत ह्यानं बनावटच करून सांगितली आहे! मग खरं काय तें ईश्वर जाणे.

अनङ्गमोहिनीला, 'हें' ऐकतांच अत्यंत आश्चर्य वाटलें. ती किंचित् दूर होती, तेथून सुमतीच्या जवळ जाऊन ह्मणाली "काय ह्मणतां तुह्मीं? खरच कीं काय? पण मला असं अद्याप कधीं वाटलं सुद्धां नाहीं तें. पण, छेः! अस होईल कसं? बहुतेक अशक्यच! ते जर अद्यापपर्यंत जिवंत असते तर माझा ह्या गेल्या सबंध तीन वर्षांत त्यांना इतका विसर कधींच पडला नसता. छे! इतकी निष्ठुरता त्यांच्या अंगीं मुळींच नाहीं. नाहींच मला खरं वाटंत हें."

सुः—उगीच कशाला बरं मी तुह्मांला खोटं सांगेन! खरंच बाई, एकएकदां असं मनांत येतं, तुह्मांपासून असा अपराध तरी काय घडला आहे कीं, या मेल्यानं अशी भलतीच युक्ती लढवून तुह्मांला एकमेकांपासून दूर ठेवावं! पण मला वाटतं याचा एकवार स्वतःच तपास करून शहानिशा करायला काय हरकत आहे?

अनः—परंतु असलं हें भयंकर काम करून त्याला लाभ तरी काय?

सुः—असं साहस जर न करील, तर आज तो जो एकाद्या राजसारखा बसून खातो आहे; तें त्याला कसं मिळेल?

एकाएकीं अनङ्गमोहिनीला त्रिस्तोतेच्या तीरावरील नीलांबराच्या कलकत्त्यास जाण्याचे वेळीं झालेल्या भाषणांतील कांहीं शब्द आठवले. तीन वर्षांनंतर नीलांबराच्या मृत्यूविषयीं तिच्या मनांत संशय उत्पन्न झाला.

प्रकरण ३ रें.

लग्नाचें ठरलें.

उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः ।

सुभाषित.

सुमतीनें घरीं जातांच विनयकृष्णास घडलेली सर्व हकीगत सांगितली. दुसऱ्याच दिवशीं प्रातःकाळीं विनयकृष्ण गोवर्धनास भेटण्यास गेला. त्यावेळीं गोवर्धन सरोवराच्या मागल्या बाजूस असलेल्या पुष्पोद्यानांत हातांत तुलसीमाला घेऊन मुखानें विष्णुसहस्रनामावलीपैकीं कांहीं ह्मणत होता. विनयकृष्णास पाहिल्याबरोबर गोवर्धनमहाशय हांसून म्हणाले, " यावें, यावें विनयकृष्णबाबू ! आज आपल्याच संबंधीच्या गोष्टींनीं माझ्या योगसाधनांत बराच व्यत्यय आणिला. परंतु, करतां काय ? संसारांत राहिलें म्हणजे योगाभ्यासांत अशा तऱ्हेचीं विघ्नें हीं येणारच. जयकृष्ण ! जयकृष्ण ! मी असें ऐकिलें आहे कीं, त्या दिवशीं तुम्हास लग्नाबद्दल मी जें सांगितलें त्याबद्दल तुम्ही मजवर बरेच असंतुष्ट झालां आहां ! तुमचें कुटुंबहि अनङ्गमोहिनीकडे गेलें होतें असें कळलें ! अनङ्गमोहिनीचाहि मजवर थोडासा राग झाला आहे व हा विवाह लवकर जुळवून आणण्याबद्दल तिचा मला निरोपहि आला आहे. "

विनयकृष्ण म्हणाला " माझ्यासारख्या क्षुद्र मनुष्याला आपणासारख्या थोरांवर असंतुष्ट होणें शक्य तरी आहे का ? आपणांला ठाऊक असेलच कीं आतां माझ्या मुलीला याउपर लग्नाशिवाय ठेवतां येणें शक्यच नाहीं; आणि त्यामुळें मला अतीशय चिंता लागून राहिली आहे. शिवाय स्वर्गवासी बाबू महाशयांनीं तिचा विवाह विनोदबाबूंजवळ करण्याचें वचन दिलें होतें हेंही आपण जाणत असालच."

“ आपण म्हणतां तें सर्व कांहीं खरें आहे. आपल्या कन्येचा विनोदलालाबरोबर विवाह झाला तर ती गोष्ट सर्वतोपरी चांगलीच होणार आहे. जयकृष्ण ! जयकृष्ण !–माझा थोडाच त्यापासून कांहीं तोटा आहे ? परंतु तुम्हांला हें ठाऊक आहेना, कीं ज्या अर्थी स्वर्गवासी घनःश्याम बाबूंनीं ह्या सर्व संपत्तीचा भार माझ्यावरच टाकिला आहे, त्या अर्थी, मला, जेणेंकरून मजवर कोणाचाच ठपका येणार नाहीं, अशाच रीतीनें वागलें पाहिजे. अशा ह्या जोखमीच्या कामांत अल्पबुद्धि स्त्रियांच्या सल्यानें जर मी वागूं लागलों तर ह्या अफाट संपत्तीची विल्हेवाट लागावयाला कांहीं उशीर लागणार नाहीं; शिवाय आजकाल विवाहसंबंधीं नवीन रीत निघाली आहे तीहि आपल्याला ठाऊक असेलच.’

“ कसली नवीन रीत ? स्पष्ट करून सांगा.”

गोवर्धन ह्मणाला “ हल्लीं मुलींच्या लग्नप्रसंगीं–विशेषतः मोठ्या मोठ्या लोकांशीं गरीबांच्या मुलींचीं लग्नें होतात त्या प्रसंगीं मुलींच्या बापास बराच अर्थव्यय करावा लागतो ! हें तंर उघडच आहे कीं हा विवाह झाल्यास घनश्याम बोसांच्या सर्व संपत्तीची मालकीण तुमची कन्याच होणार.–जयकृष्ण ! जयकृष्ण ! परंतु सध्यां प्रचारात असलेल्या लोकरीतीच्या विरुद्ध आचरण करून जर मी तुह्मांपासून कांहींच घेतलें नाहीं तर लोक मला ठपका दिल्याविना राहतील का ? खरें कीं खोटें ? ”

“ आमच्याजवळ पैसा कितपत आहे हें तर आपणास विदित आहेच. ”

“ तें समजलें हो ! आपली इष्टेट ह्मटली ह्मणजे जमीदारीचा एक गांव व एक घर इतकेंच कीं नाहीं ? जयकृष्ण जयकृष्ण ! तेव्हां मी ह्मणतों आपण कसेंहि करून आठदहा हजाराची सोय पहा ह्मणजे झालें ! बरें तर आतां तुम्ही आपलें काय तें नक्की

ठरवा; तोंपर्यंत मीहि या गोष्टीसंबंधी आणखी जरा विचार करतों. जयकृष्ण! जयकृष्ण! जय सच्चिदानंद प्रभो!"

विनयकृष्ण चिन्तायुक्त अंतःकरणानें परत आपल्या घरीं गेला. त्याच्या मनांत सहजच असा विचार आला कीं आतां पुढें करावें कसें? आठ दहा हजाराची ही एवढी मोठी रक्कम आणावी तरी कोठून? गांवातील लोक तर आतां अपरोक्ष रीतीनें निर्मलेचा विवाह लवकर उरकण्याबद्दल मला सूचना पाठवूं लागले! व देखतहि तिजकडे पाहून नाकें मुरडूं लागले! आतां अशा वेळीं दुसरें ठिकाण शोधावें कुठें? आणि लवकर मिळणार कसें? प्राक्तनाचा भोग आहे, दुसरें काय? अशा तऱ्हेचे विचार करीत करीत विनयकृष्ण खिन्न मुद्रेनें आपल्या घरीं गेला. घरांत पाऊल टाकतांच सुमतीनें त्यास उत्सुकतेनें विचारिलें "आज काय ह्मणतो आहे गोवर्धन? अनङ्गमोहिनीनें त्याला कांहीं निरोप पाठविला होता कीं नाहीं?"

विनयकृष्ण म्हणाला, "गोवर्धनानें स्वतःच मला ह्मटलें कीं, अनङ्गमोहिनीनें हें लग्न लवकर जुळवून आणण्यासाठीं मला निकडीचा निरोप पाठविला आहे. परंतु त्याचें ह्मणणें असें कीं, अशा कामांत अल्पबुद्धि स्त्रियांच्या सल्ल्यानें वागणें हें योग्य नव्हे! आणखी, पहिल्यानें रोख आठ हजार रुपये दिल्याखेरीज ही गोष्ट बिलकूल होणें नाहीं! तेव्हां आतां करावें कसें?"

सुमतीः—तरी मला अगोदर वाटलंच होतं, कीं हा मेला कांहीं-तरी मधें आडफांटा आणल्याखेरीज रहायचा नाहीं. मग आतां यापुढं आपण व्यर्थ आशा करण्यांत कांहीं अर्थ नाहींच तर?

विनयकृष्णः—तो जें ह्मणत होता कीं आमच्या सारख्यांनीं ही गोष्ट करायला जाणें, ह्मणजे आकाशांतील चंद्रालाच हात घालायला जाणें होय; तें कांहीं खोटें नाहीं! असो. परमेश्वरानेंच

जर आह्माला हे असे दिवस आणले आहेत, तर त्यापुढें आपला तरी काय इलाज आहे. ?

हें ऐकून सुमतीचे डोळे अश्रूंनीं भरून आले; व ती तेथून उठून आपल्या खोलींत गेली, आणि एकीकडे बसून रडूं लागली. विनयकृष्ण जागच्याजागींच खिन्न मुद्रेनें बसून राहिला. त्याला मनांतून अतीशय वाईट वाटलें. त्याच्या मनांत नानातऱ्हेचे विचार घोळूं लागले.

बराच वेळ अशा स्थितींत गेल्यावर विनयकृष्णाच्या मनांत कांहीं एक विचार आला, व त्या बरोबर एकाएकीं त्याचा चेहराहि प्रफुल्ल दिसूं लागला. आपल्या मनाचा कांहीं एक निश्चय करून तो तेथून उठला व कपडे वगैरे करून बाहेर जाऊं लागला. इतक्यांत निर्मला येथें आली. तिनें विनयकृष्णास बाहेर निघालेलें पहातांच त्यास विचारिलें " कुठं जातां आतां बाबा ? "

" मी हा आतां जाऊन आलोंच. तोंपर्यंत तुम्ही आपलें आंघोळ जेवण वगैरे आटपून घ्या. "

तुम्ही आल्याशिवाय आई एक पाण्याचा घोंट सुद्धां घ्यायची नाहीं, हें आहे ना ध्यानांत ? आज मीहि पण, बाबा, तुम्ही आल्याशिवाय नाहीं जेवायची लवकर या गडे. "

" मी मुळींच उशीर करीत नाहीं. अगदीं लवकर येतों मग तर झालें ?" इतकें बोलून विनयकृष्ण तावडतोब तेथून निघून गला.

इकडे विष्णुमंदिरांत योगिवर गोवर्धन घोषाल जेवण खाण नुक्तेंच आटोपून, आपल्या एकांत खोलीमध्यें पलंगावर मृदु शय्येवर, मुद्दाम दूर देशाहून आणविलेला व अनेक सुगन्धी पदार्थ मिश्रित असा ताम्रकूट उर्फ तंबाखू गुडगुडींत घालून ओढीत निद्रादेवीच्या

आगमनाची प्रतीक्षा करीत पडले होते. इतक्यांत खोलीच्या दारांत एका चाकरानें येऊन नम्रपणानें त्यांस म्हटलें. " धनीसाहेब, दासाला अपराधाची क्षमा असावी. आपले विनयकृष्ण बाबू बाहेर आले आहेत. आपणास एकवार भेटण्याची त्यांची इच्छा आहे. मी त्यांना पुष्कळ सांगितलें कीं धनीसाहेब बुक्तेच आंत गेलेले आहेत आणि ते आतां योगनिद्रेंत आहेत; त्यांना भेटण्याची ही वेळ नव्हे, मग या, वगैरे परंतु त्यांनीं तें मुळींच न ऐकतां मला इकडे पाठविलें. ते— "

तो पुढें आणखी कांहीं बोलणार तों मधेंच गोवर्धन म्हणाला " त्यांना बाहेरील दिवाणखान्यांत बसायला सांग, मी तिकडे येतों."

विनयकृष्ण घरून कपडे करून जो निघाला, तो तडक विष्णुमंदिरांत गोवर्धनाकडे आला, व त्यानें तेथील एका नोकराला वर लिहिल्याप्रमाणें निरोप देऊन, आंत पाठविलें. थोड्या वेळानें त्यानें बाहेर येऊन गोवर्धनाचा निरोप त्यास कळविला. विनयकृष्ण दिवाणखान्यांत जाऊन बसला. इतक्यामधें गोवर्धनहि तेथें आला व ह्मणाला " काय, विनयबाबू ? आपण या वेळीं कां आलांत ? काय काम आहे ? या आंत या. "

दोघेहि जण तेथून दुसऱ्या एका खोलींत गेले. विनयकृष्ण म्हणाला " मघांच्याच गोष्टीसंबंधानें आपणाला आणखी कांहीं विचारावयाचें आहे. सकाळीं आपण पैशांविषयीं जें म्हटलेंत त्याजबद्दलच अद्याप माझ्या मनांत विचार घोळत होते. मला एक उपाय सुचला आहे परंतु त्याला आपली मदत पाहिजे आहे. माझ्या मनांतून असें आलें आहे कीं माझें जमीदारीचें गांव आणि घर हें विकावें किंवा गहाण टाकावें. तसें केल्यास ही पैशांची अडचण सहजीं दूर होण्यासारखी आहे: तेव्हां याबद्दल आपलें कसें काय ह्मणणें आहे ? "

गोवर्धनः—फार उत्तम आहे! माझ्याहि मनांत ती गोष्ट आली होती. परंतु ती आपणाला सांगण्याचें कांहीं मला एकाएकी साहस करवलें नाहीं. न जाणों, तुह्मांला तें रुचेल न रुचेल! पण मी ह्मणतों, हें विकण्याचेंच काय प्रयोजन आहे? माझ्याकडे आठ हजाराला गहाण ठेवा ह्मणजे झालें! पुढें लग्न झालें ह्मणजे सर्व कांहीं तुमचेंच आहे! मग काय? आहे ना कबूल? उद्यांच आपण दुर्लभचंद्रानां बोलावून गहाण खत वगैरे करूं, आणि तें रजिस्टर करून लगेच लग्न तिथीहि ठरवून टाकूं; ह्मणजे झालें. ह्या लग्नासंबंधीं माझ्याहि मनांत हल्लीं बरेच दिवस विचार घोळत होते. जमलें एकदाचें, ठीक झालें.—जय कृष्ण, जय सच्चिदानंद प्रभो!—तुम्ही एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवा कीं, यासंबंधीं कोणाजवळहि एक अवाक्षर सुद्धां उच्चारावयाचें नाहीं. तुम्हीं त्या बद्दल आतां अगदीं निश्चित असा. तें रजिस्टर करून घ्यायला मात्र आपणाला दिनाजपुरास जावें लागेल."

इतकें बोलणें झाल्यावर कांहीं वेळानें विनयकृष्ण प्रफुल्ल मनानें आपल्या घरीं निघून गेला.

प्रकरण ४ थें.

कलकत्याहून तार आली.

दुसऱ्या दिवशीं पहांटेसच कोणाचाशा एकाएकी ओरडण्यानें विनयकृष्णाचा निद्राभंग झाला. त्यानें बाहेर येऊन पाहिलें तों पोष्टाचा शिपाई तेथें वाट पहात होता. त्यानें विनयकृष्ण बाहेर येतांच त्याच्या हातीं एक तारेचा लिफाफा दिला. त्यानें तो उघ-

न पहातांच पुढील आशयाचा इंग्रेजींत लिहिलेला मजकूर त्याच्या दृष्टीस पडला "एका क्षणाचाही विलम्ब न करितां माझी प्रत्यक्ष भेट घ्या. मृत्युपत्र चोरीस गेले आहे; मी फारच संकटांत आहे; वांचण्याची आशा नाहीं; विलम्ब न करितां निघून या." तारेच्या खालीं A Harrison ए. हॅरीसन' अशी तार पाठविणाराची सही होती व ती कलकत्त्याहून रवाना झाली होती. विनयकृष्णास त्या तारेचा अर्थ मुळींच समजला नाहीं. मृत्युपत्र कुठलें? संकटांत कोण आहे? ए. हॅरीसन कोण? कशाचाच त्यास समज पडेना! विनयकृष्ण किंचित्काल विमनस्कपणानें ती तार हातांत घेऊन उभा राहिला, व नंतर गोवर्धनाकडे जाऊन म्हणाला, "दूर्लभचंद्राच्या बरोबर दिनाजपुरीं आज कोणत्या वेळीं जावयाचें? काल तें मी विचारायला विसरलों. आज आतांच कलकत्त्याहून माझ्या नांवें ही तार आली आहे. परंतु तिच्यांत काय लिहिलें आहे व कोणासंबंधी लिहिलें आहे, कांहींच कळत नाहीं!" 'कुठें आहे पाहूं?'

विनयकृष्णानें तारेचा लिफाफा गोवर्धनाच्या हातांत दिला. त्यानें तो आपल्या कांपऱ्या हातांनीं उघडला व वाचूं लागला. अकस्मात् त्याचें मुख फिक्कें पडलें. लिफाफा हातांतून खालीं पडला. त्याचा सर्व देह थरथर कांपूं लागला. कांहीं वेळानें डोक्यावर हात चोळीत चोळीत गोवर्धन म्हणाला, "दत्त महाशय! मला कांहीं याच्यांत समज पडत नाहीं. कलकत्त्याचा हॅरीसन साहेब कोण? तुमची त्याची पूर्वींची कांहीं ओळख होती?"

"मी तर त्याचें नांवही कधीं अद्याप ऐकिलें नाहीं." "तर मग मला वाटतें ही तार चुकीनेंच तुमच्याकडे आली असावी; दुसऱ्या कोणाची तरी असावी.. ही आतां मजजवळच राहूंद्या म्हणजे त्या मनुष्याचा तपास मिळण्यासारखा असल्यास करून पाहीन. आपल्याला तर कांहीं ठाऊक नाहीं, हा हॅरीसन कोण तें."

" बरें असो ! दिनाजपुरास किती वाजतां जायचें ?" काल मी दुर्लभरायाकडे मनुष्य पाठविला होता. तेव्हां असें समजलें कीं, ते कलकत्त्यास कांहीं कामाकरितां गेले आहेत. तिकडे कदाचित् कांहीं थोडे दिवस रहावें लागणार आहे. आजच मी त्यांना पत्र लिहितों कीं, तुम्ही कलकत्त्याहून परस्परच दिनाजपुरास यावें. त्या पत्राचें उत्तर आलें कीं, आपण विजापुरास जाऊं. मग आठ हजारांचें खत वगैरे सगळें कांहीं यथास्थित करूं. "

विनयकृष्ण म्हणाला " तर मग मला या मधल्या अवकाशांत कलकत्त्यास जाऊन या तारेसंबंधी तपास करावयास काय हरकत आहे ? मग मीहि परस्पर दुर्लभराय यांचे बरोबर दिनाजपुरास येईन."

गोवर्धन म्हणाला " छेः तसें नको. यदाकदाचित् दुर्लभचंद्राची व तुमची गांठ न पडली तर ? तुम्ही आपल्या मुलीच्या लग्नाच्या सध्यां खटपटींत आहां तोंच हें दुसरें काम मागें न लावून घेणें बरें. त्या तारेबद्दल तुम्ही बिलकूल काळजी करूं नका. ती कोणाची आहे तें मात्र तपास करून पाहिलें पाहिजे. तुम्ही त्याबद्दल अगदीं निश्चिंत असा. मला नांव कळल्याबरोबर मी तें तुह्मांस कळवीन."

बिनयकृष्ण निघून गेला. गोवर्धन वामनदासाला हांक मारून म्हणाला, " एकदां रायमहाशयांना घेऊन ये पाहूं लवकर त्यांना म्हणावें कीं, फारच जरूरीचें काम आहे.

थोड्याच वेळांत दुर्लभराय तेथें आले. त्यांस गोवर्धन म्हणाला, दुर्लभभाई ! सर्व नाश होण्याची वेळ आली आहे. आज विनयकृष्णाच्या नांवें कलकत्त्याचे ते अॅटर्नी हॅरीसन साहेब यांच्याकडून एक तार आली आहे. ही पहा वाचून, म्हणजे सर्व कांहीं कळून येईल. आपल्या योगसाधनाच्या खोलींत चला. यासंबंधीं काय करावयाचें तें आपण नक्की करून टाकूं. तुम्हाला यांसाठीं बहुतकरून कलकत्त्यास जावें लागेलसें दिसतें. मला वाटतें आतां बहुतेक-

आपलें सर्व कारस्थान बाहेर येणार!" रायमहाशयांनीं ती तार लक्ष-पूर्वक वाचिली. त्यांचा चेहरा किंचित् उतरलेला दिसला.

प्रकरण ५ वें.

पूर्णपणें जाळ्यांत सांपडला.

श्लोक

....
हा मोह काय ! भुललों परिसूनि वाणी ।
वाणी जरी मधुर, मानसिं कालकूट !
देखों कसें हृदय ?—फार कठीण कूट ॥ १ ॥

(वि. मो. महाजनी.)

दिनाजपूर येथें फार दिवसांपासून घनश्याम बाबूंची एक पेढी होती. जमीदारी संबंधीं कोर्टांत त्यांचें कांहीं काम उपस्थित झाल्यास, त्यांचे कारभारी वकील वगैरे येथेंच उतरत असत. गोवर्धन व दुर्लभराय हे त्यांच्या पेढीवरील एका दालनांत बसून हळूहळू कांहीं संभाषण करीत होते.

गोवर्धनः—एकंदरींत आतां असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं कीं सुंठीवांचून खोकला गेला! हॅरीसन साहेब मेला ही गोष्ट खरी एकुण! त्यांचा हेडक्लार्क उद्धव बाबू तर आपल्या कबजांत आलेला आहेच. हॅरीसन साहेबानें मागची सारी व्यवस्था आतां त्याच्याकडेच सोपविली असेल बहुतेक.

दुर्लभः—होय अर्थातच! कारण त्याचें मरणच अगदीं आकस्मिक रीतीनें झाल्याकारणानें, त्याला कांहीं मागची नीटशी व्यवस्था करायला मिळालें नाहीं उद्धव बाबू जवळ होते त्यानांच त्यानें जी कांहीं व्यवस्था करावयाची ती तोंडी सांगितली. मला

एक मोठेंच आश्चर्य वाटतें कीं मृत्युपत्रासंबंधी झालेल्या भानगडींत त्याला त्यांचाच कसा संशय आला नाहीं ? त्यानें तर त्यांनांच खोट्या मृत्युपत्राविषयीं योग्य ती चौकशी वगैरे करवून फिर्यादी वगैरे करण्यास सांगितलें आहे ! असो पण आपणाला काय त्याचें ? उद्धव बाबू तर सध्यां आपल्याच बाजूचे आहेत.

हें ऐकून गोवर्धन थोडा वेळ विचारांत गढल्यासारखा दिसला. कांहीं वेळानें त्याच्या सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्यावर किंचित् टवटवी आली. तो म्हणाला, " दुर्लभराय, याच्यावरून मला एक युक्ती सुचली आहे ! जर साधली तर विनयकृष्णाच्या मुलीचा विवाह होण्या ऐवजीं त्याचा स्वत:चाच शृंखला बाईशीं विवाह होईल ! आणि आयताच आपला मार्ग सुगम होईल ! आपणाला तरी विनोदाचें लग्न न होणें हेंच इष्ट आहे. "

दुर्लभः—अशी कोणती युक्ती सुचली आपल्याला ?

गोवर्धनः—इकडे या, असे जवळ, म्हणजे ती तुमच्या कानांत सांगतों मी.

आपणाला सुचलेली युक्ती गोवर्धनानें दुर्लभचंद्राच्या कानांत सांगितली. ती त्यालाहि पटली ; व दोघांच्या मतानें ती अमलांत आणण्याचें ठरलें.

गोवर्धनः—दुर्लभराय, हं आटोपा आतां; विनयकृष्ण येण्याची वेळ झाली. ठरल्याप्रमाणें तें खत लिहून तयार करा. मीहि जरा जपमाळ घेतों हातांत.

गोवर्धन ताबडतोब जपमाळ हातांत घेऊन ध्यानस्थ झाला. थोड्याच वेळांत विनयकृष्ण तेथें आला. तो येतांच दुर्लभचंद्र त्याला उद्देशून म्हणाला, "यावें विनयबाबु. स्नान संध्या वगैरे सर्व आटोपलें ना तुमचें ? मग आतां उशीर कशाला ? खत वगैरे सर्व कांहीं लिहून तयार आहे. हें घ्या, वाचून पहा एकदां."

विनयः—अहो त्यांत काय वाचावयाचें आहे ? तुम्हींच ना लिहिलेंत तें ?

इतक्यांत गोवर्धनाचें ध्यानहि आटोपलें. तो विनयकृष्णास उद्देशून म्हणाला "विनय बाबू, आलेत का तुम्ही ? चला स्नान संध्या वगैरे आटापून घ्या. म्हणजे आपणाला इथलें कांम उरकून आजच कलकत्त्यास जातां येईल."

दुर्लभः—अहो त्यांचें स्नान वगैरे केव्हांच झालें ! मीहि हें खत वगैरे लिहून तयार केलें आहे. तुम्ही हा वेळपर्यंत योगमग्न असल्या-कारणानें तुम्हांला हें कांहीं कळलें नाहीं. हें खत एकदां पहा त्यांत कांहीं चूक वगैरे असेल तर.

विनयकृष्णानें दुर्लभचंद्रानें लिहिलेलें खतपत्र वाचून पाहिलें, त्यांतील साधारण सारांश असा होता "मी स्वर्गवासी घनश्याम बोस यांचे कारभारी श्रीयुत महाशय गोवर्धन घोषाल यांजपासून कांहीं विशेष कार्याकरितां आठ हजार रुपये कर्जाऊ घेतले आहेत. त्याजबद्दल माझें राहातें घर व जमीदारीचा गांव हीं त्याजकडे गहाण रहातील. मी घेतलेली सर्व रकम व्याजासह खालीं दिलेल्या मुद-तीच्या आंत परत करीन. मजकडून तसें न झाल्यास उपरी निर्दिष्ट गोवर्धन महाशय यांनीं माझ्या घराचा व गांवाचा लिलांव करून आपली रकम व्याज सह वसूल करून घ्यावी." इत्यादि. इतकें लिहून सर्वांच्या खालीं तारखा घातल्या होत्या.

गांव व घर गहाण टाकण्याचा विचार विनयकृष्णाच्या मनांत आल्यापासून हा वेळपर्यंत त्यानें प्रसंगावर नजर देऊन आपल्या मनाचें समाधान करून घेतलें होतें. परंतु वरील खत वाचतांच मात्र आपणासारख्या पूर्वापार श्रीमंत घराण्यांतील मनुष्याला, कोण त्याहि कारणानें कां होईनां प्रण घर व जहागीर गहाण टाकण्याचा प्रसंग यावा, हें मनांत येऊन त्यास अत्यंत वाईट वाटलें. त्यानें

त्यांतला पहिला पहिला थोडासा मजकूर वाचला व त्याच्या डोळ्यावर अंधारी आली. त्याच्या हातांतून तो कागद गळून खालीं पडला. परंतु तितक्यांत त्यानें आपलें मन आंवरलें, व आपल्या मनोवृत्ति बाहेर न दिसूं देण्याबद्दल आपणाकडून होतां होईल तितका प्रयत्न केला. तरी विनयकृष्णाच्या चेहऱ्यावर उदासीनतेची छटा मारल्याशिवाय राहिली नाहीं. त्यानें पडलेला कागद उचलला व दुर्लभचंद्राच्या हातीं दिला. दुर्लभचंद्रानें तो गोवर्धना पुढें करून म्हटलें "आपणहि एकदां वाचून पहा त्यांत कांहीं कमी जास्त राहिलें असल्यास."

गोवर्धनः—अहो तुम्ही स्वतः लिहिलें असल्यावर त्यांत कुठली चूक रहायला? तुम्हांला तर ठाऊक आहेच कीं विनय बाबूंना सध्या ह्या आठ हजार रुपयांची फारच जरूर आहे; कारण त्यांच्या मुलीचें लग्न निघालें आहे. आणि ह्मणूनच मी तरी माझी सर्व कामें एकीकडेस ठेवून येथें स्वतः आलों!"

दुर्लभचंद्रः——पण तुह्मांला स्वतःलाच येथें येण्याचें काय प्रयोजन होतें? तुमच्या तर्फे कोणा मनुष्याला पाठविलें असतें तरी काम होण्या सारखें होतें.

गोवर्धनः——वाः! भलतेंच कांहीं तरी? अहो विनयकृष्णांसारख्या आमच्या परम स्नेह्यांखातर थोडासा त्रास पडला तरी तो आह्माला श्रेयस्करच आहे. हें सर्व लेखी वगैरे करून रजिस्टर करावयाचें हें केवळ लोकांना दाखविण्यासाठीं! आतां विवाह झाला ह्मणजे बोसांच्या ह्या अलोट संपत्तीची मालकीण तरी कोण होणार? ह्यांचीच मुलगी—जयकृष्ण—जय सच्चिदानंद प्रभो!

कांहीं वेळ थांबून गोवर्धन पुन्हां ह्मणाला, "सर्व गोष्ट खरी परंतुः—"

विनय:--काय ह्मणणें आहे आपलें? परंतु ह्मणून कां थांबलांत?

गोवर्धन किंचित् कष्टी मुद्रा करून म्हणाला "काय सांगूं हो! वियनबाबूंचें हें फारच निकडीचें काम असल्याकारणानें इकडे येण्यास निघते वेळीं माझी फारच तप्रांबळ उडाली. त्यामुळें पैसे बरोबर आणावयास मी विसरलों.! तेव्हां–मी म्हणतों, ते मजबरोबर कलकत्त्यास आल्यास तेथील ब्यांकेतून आठ हजार रुपये काढून मी त्यांना देईन. अगोदर हवा असल्यास तसा चेक लिहून देतों."

दुर्लभ:–विनयबाबू काय या एवढ्याशा रकमेकरतां आपला अविश्वास करितील? छेः मला नाहीं वाटत तसें. पण त्यांची तशी इच्छाच असली तर त्यांना तसा चेक लिहून द्यावयाला काय हरकत आहे.?

विनय:–आपण जर कलकत्त्यास गेल्याबरोबर पैसे देणार आहां, तर मग या दोनच दिवसांसाठीं चेक काय करावयाचा आहे? मलाहि त्या हॅरीसन साहेबाविषयीं व तारेविषयीं चौकशीकरण्यासाठीं कलकत्त्यास जावयाचेंच आहे.

गोवर्धन हांसून म्हणाला "तरी आपणासारख्या थोर जनांच्या तोंडून असें ऐकायला येणार असें मला वाटलेंच होतें. बरें. दुर्लभराय, रजिस्टर वगैरे काय करून घ्यायचें आहे तें घ्या करून लवकर, आणि आपली कलकत्त्याला जायची तयारी करा.

'बरें आहे' असें ह्मणून दुर्लभराय तेथून उठून गेला. लवकरच खतपत्र रजिस्टर होऊन आलें. त्याच दिवशीं विनयकृष्ण, गोवर्धन व दुर्लभराय यांजबरोबर कलकत्त्यास निघून गेला.

१०   अनङ्ग मोहिनी.

प्रकरण ६ वें.

विनोद.

हें वृत्त मानस मदीय खरेंच कापी ।
....
(महाजनी).

के दिवशीं सकाळीं विनयकृष्णाच्या घरांत वरच्या मजल्यावर मती व निर्मला बसल्या होत्या. खालीं असलेल्या मधल्या दालनांत ंची जुनी मोलकरीण क्षेमंकरी उर्फ 'क्षेमी मावशी' ही झाड- ड सारवण स्वयंपाकादि गृहकृत्यांत गुंतली होती. पुष्कळच वर्षां- सून क्षेमङ्करीचा बाप आजा वगैरे सर्व परिवार अशोकपूरच्या ंच्या वाड्यांत नोकरीस असत कालान्तरानें ते सर्व मृत्युमुखीं ले होते, व एकटी क्षेमङ्करी मात्र मागें राहिली होती. फारच नी मोलकरीण असल्याकारणानें क्षेमी ही हल्लीं जवळ जवळ च्या कुटुंबांतीलच एक झाली होती. कित्येकांनां तर ती मोल- णि आहे किंवा त्यांच्या कुटुंबापैकींच एक आहे, हें देखील ीत नव्हतें. सुमती तिला नेहमीं 'क्षेमी मावशी' असें ह्मणत े. व तिचें ऐकून निर्मलाहि तिला त्याच नांवानें हाक मारीत े. निर्मलेला लहानपणापासून आपल्या अंगाखांद्यावर खेळविलें ल्याकारणानें क्षेमीहि तिला आपल्या स्वतःच्या मुलीप्रमाणेंच ीत असे.

क्षेमी मोठमोठ्यानें हांका मारीत असलेली ऐकून निर्मला जिन्याच्या ापाशीं येऊन म्हणाली "मावशे, कशाला ग हांका मारतेस? ा आलं आहे मला पहायला म्हणतेस?

क्षेमी:—अग पण एकदां अशी खालीं तर येशील कीं नाहीं? ाव कोण आलं आहे तें.

निर्मलेनें पुढें होऊन पाहिलें तों क्षेमी विनोदलालाचा हात धरून वरती ओढून आणीत होती. निर्मलेनें मृदुहास्य केलें व ती एकदम आंत पळून गेली. तें पाहून सुमतीनें ह्मटलें " कां ग कोण आलं आहे? पाहीनास का खालीं जाऊन? निर्मला यावर कांहींच बोलली नाहीं. तें पाहून सुमतीनें तेथूनच म्हटलें " मावशे आलं आहे तरी कोण ग? इकडे तरी घेऊन ये. कोण विनोद का ये, विनोद केव्हां आलास तूं? बैस "

क्षेमी:—हो, तो असं थोडंच सांगायला बसला आहे निर्मला कुठं दिसली नाहीं, तेव्हां आपला बाहेरूनच परस्पर चालला होता. तों मी आणला धरून इकडे. "

विनोद:—" नाहीं हो आते, मी तुह्मांला पहायला आलो होतों. वहिनीनें मला तुमच्याकडे पाठविलें आहे.

विनोद लहानपणापासूनच सुमतीस ' आते ' ह्मणत असे.

सुमती:—मग खालूनच कां जात होतास? वर यायचं तसंच कसं काय बरं आहेना? तुझी वहिनी खुशाल आहे ना?

विनो:—होय. खुशाल आहे. तिनें तुह्मांला एकदां प्रत्यक्ष भेटायला बोलावलें आहे.

सुमती:—होय कां! बरं आहे, ह्मणावं एकदोन दिवसांतच येईन मी तिकडे. आज उद्यां दिनाजपुराहून बहुतकरून येणं होईल. ते आले ह्मणजे जरूर येत्यें.

विनोद:—गोवर्धनांच्या बरोबरच गेले आहेत ना ते? मी तर असें ऐकिलें आहे कीं, गोवर्धन तेथून पुढें कलकत्त्यास गेले आहेत आणि ते लवकर येणार नाहींत. कालच त्यांनीं तेथून एका मनुष्याला मला कलकत्त्यास घेऊन जाण्या करितां पाठविलें आहे.

हें ऐकतांच सुमतीचें तोंड उतरलें. ती ह्मणाली. "तुला कलकत्त्यास नेण्यासाठीं? तें कशाला? तुझं काय काम तिथं?"

विः——बहुत करून दोन चार दिवसांतच मला तिकडे जावें लागेलसें वाटतें.

सुः——तुझ्या वहिनीला कळलं का हें?

विः——हो तर आणि ह्मणूनच तर——

सुः——पण आतां तुला नायब कलकत्त्यास कशाला बोलावताहेत!

विः——त्यांनीं असें सांगून पाठविलें आहे, कीं येथल्या शाळेंत शिक्षण चांगलं मिळत नाहीं ह्मणून मला कलकत्त्याच्या शाळेंत घालायचा त्यांचा विचार आहे.

क्षेमीः——येत्या आषाढांत आमच्या निर्मलेचं नी तुमचं लग्न करायचं, आणि आतां हो कशाला कलकत्त्यास जाता?

सुः——क्षेमे, तुझ्या तोंडाला कांहीं धरबंध असा नाहींच का ग! किती वेळां तुला सांगितलं तरी तुझं आपलं आहे ते आहेच!

क्षेः——असं हो काय ह्मणतां तुह्मी? आणखी तें काय ठरायचं नवीन? लग्न ठरल्याला तर पांच सहा वर्षे झालीं. आतां मधें बिब्बा घालणारा कोण? तो गोवर्धनच ना? ऊंः, त्याचं हो काय? अश्शी शेंडी धरून वांकवून कबूल करूं त्याला!

सुः——अग पण हो (विनोदास उद्देशून) तूं कलकत्त्यास जाणार, हें तुझ्या वहिनीला कळलं तेव्हां ती काय ह्मणाली?

विः——ती ह्मणाली विनोदाला मी माझ्यापासून मुळींच दूर करूं देणार नाहीं. आणि तुम्ही त्याला इथून नेलंतच तर मला कांहीं त्याच्यावांचून इथें एक घटकाभर सुद्धां राहवणार नाहीं, नी दुःखानं मी अगदीं वेडी होऊन जाईन. माझ्या जाण्याचें ऐकून

तीं किती तरी वेळ रडत बसली होती. पण तिला विचारतो कोण नायब करणार तीच पूर्व दिशा !

क्षे:—जळ्ळं मेल्याचं तोंड एकदां ! खेटरानंच थोबाड रंगवायला पाहिजे अशांचं ! पाहीन, पाहीन, माझ्यापुढं कशा गमजा चालतात त्याच्या त्या ! लग्नांत कांहीं फांटा तर आणूं दे मेल्याला, ह्मणजे मग या क्षेमीच्या हातच्या झाडूचे सपाटे पाठींत बसले नाहींत, तर नांव दुसरं ठेव ह्मणावं ! मोठ्या बाई (अनङ्गमोहिनी) म्हणतात लग्न करायचं, नी ह्या मेल्याचा लुब्रेपणा कशाला पाहिजे मधें हा ?

सु:—क्षेमे, अग तुला झालं तरी काय ? तोंडाला मेलं हाड तें कसं नाहींच तुझ्या ! सारखं लबूलब् लवतं आहे !

त्रि—बरें, आत्याबाई, मग मी वहिनीला काय सांगूं ?

सु:—त्यांना म्हणावं मी एक दोन दिवसांच्या आंत जरूर भेटेन तुह्मांला, समजलं किनई ? आणखिन् ह्मणावं मी भेटल्याशिवाय तुला कलकत्त्यास पाठवायचं मुळींच करूं नका.

वि:—बरं येतों तर मी.

क्षे:—विनोदबाबू, चाललेत ? जरा थांबा. मला सुमतीला कांहीं सांगायचं आहे. चल सुमती, खालीं ये माझ्या बरोबर तुला एक गोष्ट सांगत्यें. थांबा हां विनोदबाबू. आतां येतों आम्हीं.

क्षेमी व सुमती दोघीहि खालीं गेल्या. आतां माडीवर एकटा विनोदच राहिला. हा वेळ पर्यंत निर्मळा आंतल्या खोलींत दार लावून बाहेर चाललेलें संभाषण ऐकत होती. ती लहानपणीं विनोदावरोबर अनेक तऱ्हेचे खेळ खेळली होती. विनोद आपल्या घरीं आला असतां ती त्याजबरोबर आनंदानें व मोकळेपणानें बोलत चालतहि असे. एकंदरींत त्यांचें एकमेकांवर

अकृत्रिम प्रेम होतें, परंतु तें अगदीं निर्मळ होतें. जसजसा काल लोटत गेला व उभयतांस शैशवावस्था संपून थोडथोडा प्रौढपणा येत गेला तसतसें त्यांच्या पूर्वींच्या निर्व्याज प्रेमाला किंचित् निराळें स्वरूप प्राप्त झालें. त्यांना आपलें लग्न होणार आहे हें तर ठाऊक होतेंच, परंतु गेलें वर्ष दीड वर्ष घरांत त्या गोष्टी प्रत्यक्षच ऐकूं येऊं लागल्यापासून निर्मला विनोदासमोर जाण्यास फारच लाजूं लागली होती; मग पूर्वींप्रमाणें बोलणें, हांसणें, तर दूरच.

विनोद माडीवर एकटाच आहे असें पाहून निर्मला धीर करून खोलीचें दार उघडून हळूच बाहेर आली. विनोदास कलकत्त्यास जावें लागणार हें ऐकल्यापासून तिला फारच वाईट वाटून चैन पडेनासें झालें होतें. ती बाहेर आली व विनोदाच्या पाठीमागें गुपचुप उभी राहिली. किंचित्कालानें तिनें लाजत लाजत आपला हात हळूच त्याच्या खांद्यावर ठेविला.

विनोदानें करस्पर्श होतांच मागें वळून पाहिलें तों निर्मला! तिला पाहतांच त्याच्या मुखावर स्मितहास्य विलसूं लागलें. परंतु इतक्यांत तिचा उतरलेला चेहरा पाहतांच तो तिचा कोमल हस्त धरून किंचित् आश्चर्यानें म्हणाला " निर्मले. "

निर्मलेची दृष्टी एकदम भूमीकडे वळली. तिच्या मुखावर लज्जेनें लाली आली. ती मृदुस्वरानें व लज्जावनत मुखानें म्हणाली " गडे आपण कलकत्त्यास जाण्याचं करूं नये. "

विनो:—कां बरें ?

लिर्म:—मग मला आपलं दर्शन नेहमीं प्रमाणं होणार नाहीं.

विनोद कांहीं बोलणार तोंच जिन्यांत कोणाचीं पावलें वाजलीं, त्या बरोबर निर्मला जवळच्या खोलींत शिरली व तिनें दार लोटून घेतलें. थोड्या वेळानें विनोदहि सुमतीचा निरोप घेऊन तेथून निघून गेला.

प्रकरण ७ वें.

अनङ्ग मोहिनी व सुमती.

त्वत्कर्म हें करितसे मन दीर्घ शंकीं ।
सारेच कीं न रुळती जन पापपंकीं ॥

(कुसुमांजली).

विनयकृष्णाची आणखी दोन तीन दिवस वाट पाहून नंतर सुमती अनंगमोहिनीस भेटण्याकरितां गेली. अनंगमोहिनीनें तीस येतांच विचारिलें "विनयबाबू दिनाजपुराहून नाहीं की आले अजून ?"

सुमती:—नाहीं. येण्याला इतका बिलम्ब कां लागला तेंहि कांहीं कळत नाहीं !

अनंग:—ते तिकडे कशासाठीं गेले आहेत ?

सुमती:—तुमचे गोवर्धन पर्वा म्हणाले होते कीं, तुम्हांला निर्मलेचा विवाह जर विनोदाबरोबर करणं असेल, तर नक्की आठ हजार रुपये हुंडा आम्हाला मिळाला पाहिजे ! इतके हे रुपये कुठून बरं आणावे आमच्यासारख्या गरीबांनीं ? तेव्हां नायबच म्हणाले कीं, तुमच्या कांहीं वस्तू गहाण बिहाण ठेवण्यासारख्या असल्या तर ठेवा, अन् काढा रुपये ! त्यावरून कांहीं खटपट करण्याकरतांच दिनाजपुरीं जाणं झालं आहे.

हें ऐकून अनंगमोहिनीचें मुख क्रोधातिशयानें लाल झालें. ती म्हणाली " काय म्हणता, वहिनी ? मी नीटसें समजल्यें नाहीं. माझ्या विनोदाच्या नुसत्या जमीदारीचंच उत्पन्न दरमहा आठ हजारांपेक्षां अधीक असेल ! आणि त्याच्या लग्नाकरतां आठ हजार रुपये हुंडा मागतो ! धिक्कार असो मेल्याच्या निलाजरेपणाला !"

सु:—मग काय करावं हो बाई ? ते तर म्हणाले, कीं, त्यावांचून कांहीं हें लग्न जमायचं नाहीं. तेव्हां तसं करणं भागच आहे आम्हांला.

अव:—लेखी खत वगैरे होऊन पैसे आले का त्यांच्या हातीं ?

सु:—तेंच तर मला अद्याप कांहीं कळत नाहीं ! दोनतीन दिवसांच्या आंत येतों, म्हणून सांगून जाणं झालं, आणि आज जवळ जवळ आठदहा दिवस होत आले तरी अजून पत्ता नाहीं; तेव्हां समजावं तरी काय बाई माणसानं ?

अनङ्ग:—गोवर्धनानीं कलकत्त्यास जाऊन तेथून विनोदास तिकडे घेऊन जाण्याकरितां एक मनुष्य पाठविला आहे, हें तुम्हांला पर्वा विनोदाकडून कळलेंच असेल ? विनयबाबूहि कलकत्त्यासच गेले असावेत त्यांच्या बरोबर.

सु:—तें मला कांहींच समजत नाहीं. जातांना तर दिनाजपुराहूनच परत येतों असं सांगणं झालं होतं !

अनङ्ग—वहिनी, तुमच्या पतीनीं जाणून बुजून ह्या सर्पाच्या बिळांत कशाला उगीच हात घातला !

सु:—असो. झाली खरी. गोष्ट. आतां देव बुद्धी देईल ती खरी. माझा तर बाई कालपासून जीव कसा अगदीं उडून गेला आहे. काय होवं आहे, नि काय नाहीं.

अन:—एक तर, विनोदाला कलकत्त्यास नेताहेत असं समजल्यापासून मी अगदीं जडमूढ बनून गेलें आहे. अन् आतां तुम्ही आपल्या पतीबद्दल ही अशी हकीगत सांगतां, त्यामुळं तर माझी अगदींच वेड्यासारखी स्थिति होऊन गेली आहे !

सुमती एक दीर्घ निःश्वास टाकून म्हणाली " असो विधात्यानं अदृष्टांत लिहिलं असेल, तें थोडंच का चुकणार आहे ! व्हायचं असेल तें होईल. बरं, पण तुम्ही विनोदाला कलकत्त्याला पाठवण्यासंबंधानं काय केलं ?"

अनंगः—मी पाठवणार किंवा नाहीं ? मी कोण ? माझं ह्मणणं तरी कोण ऐकायला बसलं आहे ? पाठवायचं किंवा नाहीं, हें तरी सांगणार कुणाला मी ? माझं तर वहिनी काळीज फुटून जात हो अगदीं ! आणि मला वाटतं आतां बहुतेक तसंच होणार. मी तरी विनोदासाठींच अद्याप या संसाराला चिकटून आहे नाहीं तर——

सुमती मध्येंच म्हणाली " छे: बाई, अशा ह्या भलत्याच गोष्टी मनांत सुद्धां आणूं नका तुह्मी जाऊं द्या तें. मी तुम्हांला मागं जें सांगितलं होतं, त्याबद्दल कांहीं तपास लागला का ?"

अनङ्गः——बऱ्याच सायासांनीं वामेनं एकाला केलं होतं तयार. त्याला कलकत्त्यास त्या संबंधीं तपास करायला पाठवलं होतं; त्यानं तपास करून येऊन सांगितलं कीं, कलकत्त्याच्या बंगल्यातील सर्व चाकर नोकरांना घालवून दिलं आहे. कोणाचाच पत्ता लागत नाहीं. परंतु त्यांच्या पैकीं एकजणाचा त्यानं मोठ्या कष्टानं तपास लावून त्याला तो इकडे घेऊनहि आला होता. पण काय झालं कुणास ठाऊक. तो आलेला मनुष्य दुसऱ्याच दिवशीं पळून गेला ! मला तर खास वाटतं कीं तो होऊन पळाला नसावा. त्याला मुद्दाम कुणीतरी तसं करायला लावलं असावं.

सुः—आज जर तुमच्या माहेरचं वडील, बंधु, आई कुणीतरी असतं तर तुह्मांला किती बरं आधार झाला असता !

अनः—ईश्वराचीच तशी इच्छा नाहीं, तिथं आपण तरी काय करणार ? नाहीं ह्मणायला एक तो चुलतभाऊ आहे. त्याला सुद्धां मी कमींत कमी पांच सहा पत्रं पाठविलीं असतील पण एकाचं उत्तर नाहीं ! मग त्यानं जाणूनबुजून तसं केलं, कीं माझीं पत्रंच त्याला मिळालीं नाहींत, ईश्वर जाणे.

सुः—असं हें आतां चालणार तरी किती दिवस बाई आणखी ?

अनङ्गमोहिनी वामेला हांक मारून ह्मणाली " वामे, त्या देवडीवरील सनातनाला बोलाव ग इकडे जरा."

वामा सनातनाला बोलाविण्यास गेली.

अनङ्ग--वहिनी, तुम्ही ह्मणतां त्याप्रमाणं करण्याचं माझ्याहि मनांत कितीकदां आलं होतं. पण बाई तें होणं एकपरी कठीणच दिसतं ! कारण, तुह्मांला ठाऊक आहेच कीं ह्या गोवर्धनानं वाड्यांतल्या हरएक नोकरचाकर, रामोशी प्याद्यापर्यंत सर्वांना अगदीं आपल्या कह्यांत आणून ठेविलं आहे ! त्याच्या आज्ञेशिवाय ते लोक कांहींच करायला कबूल नसतात; मला तरी बाई हें एक मोठं आश्चर्यच वाटतं अद्याप कीं मामंजींसारख्या शाहण्यासुरत्या विचारी पुरुषानं ह्या माकडाच्या हातीं ही कोलीत दिली कशी !!

सुः--तुह्मांला ह्मणून आपली सांगतें हो बाई; लोकांत साधारण बोलवा अशीच आहे कीं हें काम आमच्या तिकडेच सोंपविण्यांत आलं होतं, पण--

इतक्यांत वृद्ध सनातन घोष वामेबरोबर तेथें आला, व दरवाजातूनच हात जोडून ह्मणाला " काय आज्ञा आहे बाईसाहेब ?"

अनङ्गमोहिनी चिकाच्या पडद्याआड बसली होती, ती ह्मणाली ' विनोदाला इतक्या तांतडीनं गोवर्धन कलकत्त्यास कशाला बोलावताहेत, तें तुला ठाऊक आहे का ? "

सनातन हात जोडून ह्मणाला, " मला त्यासंबंधीं विशेष कांहीं माहिती नाहीं बाईसाहेब, नायब महाशयानीं त्यांनां तिकडे बोलावलं आहे इतकंच मला ठाऊक आहे"

अनङ्ग--रागानें ह्मणाली, नायबांनीं तुह्मांला हवं ते करायला सांगावं आणि तुम्हीं तें करावं, होय ना ? माझं ह्मणणं ह्मणजे कांहीं गांवींच नाहीं अँ ? त्यांनीं उद्यां आह्मांला एकाद्या खड्ड्यांत नेऊन टाकायला सांगितलं तरी तें तुम्ही करावंच ?

सनातन पूर्ववत् हात जोडून नम्रपणानें ह्मणाला "तसें नव्हे बाई-साहेब, परंतु त्यांच्या आज्ञेविरुद्ध तरी आम्हांला कसें जातां येईल?"

सनातनाचे वरील उद्गार ऐकून अनङ्गमोहिनीच्या अंगाचा अगदीं तिळपापड होऊन गेला. परंतु तिनें विवेकानें आत्मसंयमन केलें. तिनें असा विचार केला कीं ज्यास्त बोलून तरी आपल्या हातून त्याचें काय पारिपत्य होणार आहे? ती म्हणाली "अस्सं? ठीक आहे. गोवर्धनाना आज माझा असा निरोप कळव कीं 'सध्यां विनोदाला कलकत्त्यास पाठविण्याची माझी कांहीं इच्छा नाहीं. त्यानं सदोदित इथंच माझ्याजवळ रहावं अशी माझी इच्छा आहे."

सनाः—बाईसाहेब, अधिकोत्तराची माफी असावी. त्यांनीं केलेली आज्ञा, मग ती वाईट असो की चांगली असो, आह्मांला शिरसावंद्य मानिलीच पाहिजे. आपण एक वेळ त्यांच्या विरुद्ध जाऊं शकाल, पण आह्मां नोकरानां तसें कसें बरें करतां येईल? म्हणन म्हणतों बाईसाहेब आपण मला एकवार क्षमा करावी. दासाचा यांत काय बरें अपराध? नायब महाशयांच्या कलकत्त्याहून आलेल्या पत्रांतच असें लिहिलें आहे कीं 'विनोदबाबू जर खुशीनें येण्यास कबूल नसतील तर त्यांना जबरदस्तीनें घेऊन येणें. ही गोष्ट त्यांच्याच हिताची आहे.'

अनङ्गः—मी जर विनोदाला तिकडे नाहीं जाऊं दिलं, तर तुम्ही काय कराल?

सनाः—आम्ही काय करणार? ही गोष्ट कलकत्त्यास महाश-यांना कळवणार, आणि ते सांगतील तसं करणार!

कांहीं वेळ विचार करून नंतर अनङ्गमोहिनी म्हणाली, "ठीक आहे. त्यांना तूं असें लिहून पाठव कीं, कनकनगरीस माझा चुलतभाऊ आहे, त्याला मी यासंबंधीं एक पत्र लिहितें. तें तुम्ही कोणीतरी पोष्टांत टाका: कनकनगर कांहीं येथून फारसं दूर नाहीं.

तीनचार दिवसांत पत्राचं उत्तर सहज येईल. त्याप्रमाणं मग पाठवायचं किंवा नाहीं ते सांगेन. तोंपर्यंत विनोदाला माझ्याजवळून कोणीहि दूर करितां कामा नये."

वृद्ध सनातनाचें शरीर थरथर कांपूं लागलें. तो हात जोडून म्हणाला "बाईसाहेब, हा देह लहानपणापासून आजपर्यंत आपल्याच अन्नावर वाढला आहे. तेव्हां आपली आज्ञा शिरसावंद्य मानणें माझें कर्त्तव्य आहे; हें मी जाणतों, परंतु—परंतु—"

अनङ्गमोहिनी क्रोधयुक्त स्वरानें म्हणाली "काय? परंतु परंतु काय? नीट स्पष्ट बोल काय तें."

सनाः—आपली आज्ञा मी पाळल्यास माझा सर्वनाश होईल.

अनङ्गः—तो कसा?

सनातन थोडा वेळ स्तब्ध राहिला. यावर आपण काय बोलावें हें त्याला सुचेना. तो मनांतल्या मनांत फारच गडबडून गेला. तो कंपित स्वरानें म्हणाला "तें मी आपणास कोणत्या तोंडानें सांगूं? व आपली ही क्षुल्लक कामगिरी तरी कशी अमान्य करूं? मला आपणापुढें असें बोलण्याचा प्रसंग यावा म्हणजे दुर्दैव माझें, दुसरें काय? बाईसाहेब, या म्हाताऱ्यावर एवढी दया कराच तुम्ही."

अनङ्गः—कसली दया करूं? निष्कारण भय बाळगण्याचं कांहीं कारण नाहीं. खरं काय असेल तें बेलाशक सांग.

सनातन पुन्हां कांहीं वेळ स्तब्ध राहिला. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारची निश्चयाची छटा दिसूं लागली. तो एकवार साशंक मुद्रेनें सभोंवार पाहून नंतर म्हणाला, "तर मग माझ्या नशिबांत जें कांहीं व्हावयाचें असेल तें होवो, मी आपणांला खरें काय आहे तें सांगतोंच. पण बाईसाहेब, मी जें कांहीं सांगेन तें बाहेर मुळींच न फोडण्याची मात्र या दासावर दया करावी. नायब

महाशयांनीं वाड्यांतील सर्वांना आपणाविषयीं कांहीं गुप्त आज्ञा करून ठेविल्या आहेत. पहिली, आपणाला अन्तःपुरांतून बाहेर दुसऱ्या कोठेंहि जाऊं देऊं नये. दुसरी, आपली भेट घ्यावयाला कोणी जरी आलें तरी प्रथम त्यांना त्याची वर्दी पोहोंचली पाहिजे. शिवाय वाड्यामध्यें आपणावर नजर ठेवण्याकरितां त्यांनीं आपले कांहीं गुप्त हेर ठेविले आहेत! त्यांची सदोदित आपल्या वागणुकीवर बारीक नजर असते. हें कदाचित् आपणाला ठाऊकहि नसेल. तिसरी ही कीं, आपलें कोणालाहि लिहिलेलें पत्र वाड्याबाहेर मुळींच जाऊं देऊं नये! आपण या पूर्वी कलकत्यास किंवा आपल्या बंधूंना जितकीं ह्मणून पत्रें पाठविलीं तितकीं सर्व त्यांनीं आपल्या हेरांकरवीं व इतर नोकरांकरवीं मिळवून फाडून टाकिली आहेत! या तीन आज्ञांपैकीं कोणत्याहि आज्ञेचा कोणी भंग केला तर त्याचा मी सर्वस्वी नाश करीन असें त्यांनीं सर्वांना बजावून सांगितलें आहे!"

अनङ्गमोहिनीला हें सर्व ऐकून मनामध्यें काय वाटलें असेल त्याचा वाचकांनींच विचार करावा. तिचे नेत्र क्रोधानें आरक्त झाले. ती विषाद व दुःख यांनीं युक्त अशा कम्पित स्वरानें ह्मणाली, "ह्मणजे? आणि वाड्यांत ठेविलेलीं, दासदासी नौकरचाकर वगैरे सुद्धां तसल्या आज्ञा पाळण्या इतकीं का नीच अंतःकरणाची आहेत? त्यांच्यापैकीं एकाच्याहि अंगांत इतकं सुद्धां का साहस नाहीं? काडीमात्र धर्मज्ञानहि नाहीं? परमेश्वराविषयींहि भय नाहीं?"

सनाः—बाईसाहेब, क्षमा करा; मी पापी आहे, दुष्ट आहे, विश्वासघातकी आहे, मला एकवार क्षमा करा.

अनङ्गमोहिनी थोडा वेळ स्तब्ध राहून नंतर ह्मणाली, "बरं, तूं एक तरी करशील? मी तुला पत्र देतें, तेवढं पोस्ट हपीसांत जाऊन रजिष्टर करून ये."

सनाः—रजिस्टर केलें ह्मणजे तरी खात्रीपूर्वक पोहोंचेल असें का आपल्याला वाटतें? तसें वाटत असल्यास मात्र आपला समज अगदीं चुकीचा झाला!

अनङ्गः—ह्मणजे, असं कसं होईल? रजिष्टर केलेलं पत्र कसं त्यांना गहाळ करतां येईल?

सनाः—आपणासाठीं त्यानें कुठें कुठें आणि कसकसा बंदोबस्त करून ठेविला आहे, हें अद्याप आपणाला चांगलेंसें कळलें नाहीं तर मग! पैशानें काय होणार नाहीं बाईसाहेब? पोष्ट हपीसांतल्याहि दोघांतिघांना त्यांनीं हवातसा पैसा चारून पूर्णपणें वश करून ठेविलें आहे! आणि त्यांच्याच कडून त्यानीं आपलीं सर्व पत्रें गडप करविलीं आहेत. सरकार ह्मटलें ह्मणजे तिथें कांहीं लुच्चेगिरी किंवा अंदाधुंदी नसतेच अशांतली गोष्ट नाहीं!

वरील एकंदर हकीगत ऐकून अनङ्गमोहिनीस पराकाष्टेचें दुःख झालें. ती सद्गदित कंठानें म्हणाली, "जा आतां तूं."

सनातन बोष तेथून खिन्नांतःकरणानें निघून गेला. अनङ्गमोहिनीला आपलें रडें कांहीं केल्या आंवरेना. तिच्या डोळ्यांतून एकसारखे अश्रु वाहूं लागले, व ती स्फुंदस्फुंदून रडूं लागली.

सुः—हें काय? हें काय बाई? असं नका करूं गडे. कांहींतरी धीर धरावा माणसानं.

अन—हे दीनदयाळ प्रभो! भगवान्! कुठं आहेस तूं? नाथ, एकवार तरी या पापिणीला दर्शन द्या! या दासीला या दुःखसागरांतून मुक्त करा! मला व माझ्या विनोदाला निरर्थक पीडा करणाऱ्या ह्या नीच सर्पाचं मस्तक चूर्ण करून टाकण्याला एकदां तरी याहो! हाय! वहिनी, मी मागल्या जन्मीं किंवा या जन्मीं तरी असं कोणतं हो पाप केलं होतं, कीं, मी सर्वस्त्राला वंचित होऊन शिवाय आणखी अशा संकटांत पडावं?

अनङ्गमोहिनी आणखीहि अशाचप्रकारें शोक करूं लागली. हें पाहून सुमतीचें हृदय अगदीं कळवळून गेलें. ती म्हणाली, बाई, अशा निराश नका होऊं गडे. इथं लोक कितीहि अन्यायानं जरी वागले, तरी वर धर्मराज बसले आहेत ना ? ते तर तुमच्याशीं कधीं अन्यायानं वागणार नाहींत ना ? आतां लवकरच घरीं येणं होईल. आल्याबरोबर त्यांच्याकडूनच मी सारी व्यवस्था करविते. त्यांना तर कोणी अडवूं शकत नाहीं ना ? आणखी माझं तर मन मला अगदीं असंच सांगतं कीं, तुमचे पती खास जिवंत आहेत.

अनङ्गमोहिनी सुमतीच्या गळ्याला मिठी मारून म्हणाली, " वहिनी ! तुझ्या तोंडांत साखर पडो. तूं म्हणतेस तसंच होवो." नंतर थोड्या वेळानें सुमती तेथून निघून गेली. त्या रात्रीं अनङ्ग-मोहिनीला स्वस्थपणें झोंप अशी मुळींच आली नाहीं.

प्रकरण ८ वें.

सुमतीचा कपाळमोक्ष.

शशिदिवाकरयोर्ग्रहपीडनम्
गजभुजंगमयोरपि बंधनम् ।
मतिमतां च विलोक्य दरिद्रताम्
विधिरहो बलवानिति मे मतिः ॥ १ ॥

नीतिशतक.

आणखी एक आठवडा लोटला. अद्यापिहि विनयकृष्ण आला नव्हता, किंवा त्याजबद्दल कांहीं माहितीहि कळली नव्हता. सुमती फारच चिंताग्रस्त झाली होती. तिनें गोवर्धनाकडे आपल्या पतीचा तपास करण्याकरितां एका मनुष्यास पाठविलें. त्याला गोवर्धन म्हणाला, "काय ? विनयकृष्ण अद्याप परत आले नाहींत ? ते तर

मजजवळून आठ हजार रुपये घेऊन केव्हांच कलकत्त्यास गेले! अद्यापपर्यंत काय करीत आहेत तिकडे? कांहीं कळत नाहीं!"

दुर्लभचंद्राकडेहि सुमतीनें चौकशी करविली, परंतु तिकडूनहि सदरीलप्रमाणेंच उत्तर मिळालें. सुमती व निर्मला या दोघींचीहि चिंतेनें अगदीं झोंप नाहींशी झाली. वाचाळ क्षेमीच्या तोंडून दिवसांतून अनेक वेळां गोवर्धनाचा यथास्थित उद्धार होऊं लागला. सरतेशेवटीं त्यांनीं विनयकृष्णाच्या शोधार्थ कलकत्यास मनुष्य पाठविण्याचें ठरविलें. परंतु तसा मनुष्य मिळणार कोठून याचीच त्यांना पंचाईत पडली. विशेषतः विनयकृष्ण तेथें कुठें उतरला आहे, तें कोणालाच माहीत नव्हतें! गोवर्धनापाशीं किंवा दुर्लभचंद्रापाशीं त्याची विचारपूस करण्यासाठीं पुनः कोणीच गेलें नाहीं; कारण तेथें धडपणें उत्तर मिळेल अशी मुळीं आशाच नव्हती. सरतेशेवटीं बऱ्याच तपासाअंतीं क्षेमीच्या खटपटीनें एक मनुष्य तिकडे जाण्यास कबूल झाला. त्याचें नांव गिरीश असें होतें. तो फार चतुर व दूरदर्शी आहे अशी त्याची सर्वत्र ख्याती होती. तो अनेक वेळां कलकत्त्यास दिनाजपुरीं वगैरे गेला असून, तेथील निरनिराळ्या आदालतींतहि त्याची थोडीबहुत ओळख होती. तो प्रथम कलकत्त्यास जाण्यास नाकबूल झाला; परंतु क्षेमी म्हणजे इतक्या थोड्यावरच गप्प बसण्याइतकी कांहीं भोळी नव्हती. ती म्हणाली, "तूं जर हें काम करणार नाहींस तर, बघ, तुझ्या माथीं स्त्रीहत्येचं पातक लागेल! आमच्यासारख्या अडलेल्या लोकांचीं जर तुम्हीं कामें करणार नाहीं तर तुम्हांसारखे लोक जगांत जिवंत असून तरी काय फायदा?" बरेच आढेवेढे घेतल्यानंतर मोठ्या शिकस्तीनें गिरीश एकदांचा कबूल झाला, व क्षेमी बरोबर वाडयांत येऊन वाटखर्चीसाठीं पैसे मागूं लागला. सुमतीनें त्याला पैसे दिले व म्हणाली, "पहा बरं, तू तरी आतां लौकर ये बाबा, आणि आमची येवढी काळजी दूर

कर. मी अगदीं चातकासारखी तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसल्यें आहे असें समज. अगदीं उशीर लावूं नकोस हो."

गिरीशः—बाईसाहेब, मी एकदां काम हातीं घेतलें, म्हणजे मग तें पुरें केल्या शिवाय कधीं रहाणार नाहीं, एवढें पक्कें समजा. मला तुम्हीं असा तसा समजूं नका, अगदीं निश्चिन्त असा. आठ दिवसांच्या आंत धनीसाहेबांना घेऊन आपल्या पायांपाशीं हजर होतों पहा.

वर लिहिल्याप्रमाणें सुमतीस आश्वासन देऊन गिरीश आपल्या घरीं गेला. जातांच जपून ठेविलेला आजा पणजाच्या वेळचा जुना-पुराणा जोडा काढून व साफसूफ करून त्यानें तो पायांत चढविला. आणि तितकीच जुनी व शेंकडों छिद्रें असलेली अशी एक गरम कापडाची बंडी काढून अंगांत घातली. खांद्यावर एक खादीची चादर टाकिली, व हातांतली बांबूची केलेली लाठी फिरवीत फिरवीत स्वारी कलकत्यास जाण्यास निघाली.

गिरीशच्या चर्येवरून व एकंदर बोलण्याचालण्यावरून, सुमतीला हा पुष्कळ अंशीं काम फत्ते करून येईल असेंच वाटलें. परंतु आठ दिवसांच्या ठिकाणीं चार आठवडे लोटत आले तरी गिरीशचा पत्ता मुळींच नाहीं! व विनायकृष्णासंबंधीं कांहीं कळलेंहि नाहीं. इतकें झाल्यावर मात्र दोघी तिघींचाहि अगदीं धीर सुटला. सुमतीच्या व निर्मलेच्या तर डोळ्यांचें पाणी खळेनासें झालें.

एके दिवशीं रात्रीं आठांच्या सुमारास सुमती क्षेमी, व निर्मला वाड्याचें बाहेरचें दार लावून घेऊन बसल्या होत्या. खोलींत एक समई मंद जळत होती. निर्मला आपल्या आईच्या शेजारीं चटईवर पडली होती. रडण्यानें व सदोदित आपल्या बापाविषयीं चिंता केल्यामुळें तिचा चेहरा फिक्कट दिसत होता. खोलीमधेंहि जिकडे-तिकडे उदासीनतेचें साम्राज्य पसरलेलें दिसत होतें. सुमती म्हणाली, "कसं ग तरी करावं आतां क्षेमे? मनुष्य पाठविला त्याचाहि

पत्ता नाहीं ! मी स्वतःच जातें नाहींतर आतां कलकत्त्यास, आणि पहातें लागला कांहीं तपास तर. "

क्षेमीः—मेला गिराश; आठ दिवसांत येतों ह्मणून सांगून गेला तो अझून यतो आहे! निदान एकादं बोटभर पत्र तरी पाठवाव-याचं होतं मेल्यानं!

इतक्यांत एकाएकीं बाहेरच्या दरवाज्यावर कोणी थाप मारल्याचा आवाज आसा. क्षेमीनें आंतूनच विचारिलें, "कोण आहे बाहेर?"

बाहेरून उत्तर मुळींच आलें नाहीं, परंतु दारावर मात्र पूर्वी-पेक्षांहि जोरानें धक्का बसला. क्षेमीनें पुन्हां विचारिलें, "कोण आहे बाहेर? बोलत कां नाहीं?"

बाहेरील व्यक्तीनें " ऊँ–हूँ–" एवढेंच उत्तर दिलें.

क्षेमीः—कोण मेलं चावट आलं आहे बाहेर? बोलायला नाहीं का येत नीट?

बाहेरून पूर्ववत् ' ऊँ–हूँ–' असेंच उत्तर आलें. क्षेमी अगदीं संतापून गेली व ह्मणाली; " जळ्ळ रे मेल्या तुझं ' ऊँ–हूँ–' तोंड कुठं चरायला गेलं आहे होय तुझं? थांब तुझं ' ऊँ–हूँ–' च काढतें आतां."

क्षमीन रागारागानें जाऊन बाहेरचा दरवाजा खाडदिशीं उघ-डला; तों बाहेर गिरीश उभा असलेला पाहतांच तिला फारच आश्चर्य वाटलें—ती ह्मणाली, " कोण? गिरीश? तूं आलास आणि विनयबाबू कुठं आहेत?"

गिरीश हळूच बोलला " हळू बोल, हळू बोल; तशीच कांहीं गुप्त गोष्ट आहे. बाईसाहेब कुठं आहेत?"

क्षः—घरांत आहेत.

गिरीः—दार बंद करून घे आणि बाहेर ये.

क्षेमी बाहेर येऊन ह्मणाली "काय हकीगत आहे, बाबा? असं काय करतोस? लवकर सांग एकदां.

क्षेमी उठून दरवाजाकडे गेली, तेव्हां अर्थातच सुमतीचें लक्ष तिकडे लागलें. दरवाजा उघडल्यावर क्षेमीनें आश्चर्यानें गिरीश असें उच्चारिलेलें व गिरीशनें तिला हळू बोलण्याविषयीं सुचविलेलेंहि तिनें ऐकिलें होतें; पुढें तिच्यानें मुळींच राहवेना. गिरीशचें एकंदर आचरण पाहून तिच्या हृदयांत तर धडकीच भरली होती, व अंग थरथर कांपूं लागलें होतें. ती बसल्या जागेवरून उठून दाराश येऊन ऐकूं लागली.

गिरी:—आणखी जरा अशी बाजूला ये ह्मणजे काय हकीगत आहे ती सांगतों.

क्षेमी त्याजबरोबर आणखी थोडी दूर जाऊन त्यास ह्मणाली, "गिरीश, बाबा सांग एकदां लवकर, विनयबाबू आहेत कुठं? त्यांचं काय झालं?"

सुमतीला तीं दोघें काय बोलतात हें अर्थात्‌च ऐकूं येईना. तेव्हां ती दाराबाहेर येऊन पुढील चौथऱ्याच्या एका दगडाला धरून व उंच मान करून ऐकूं लागली.

गिरी:—मी काय सांगतों तें बाईसाहेबांना इतक्यांतच सांगूं नकोस. फारच वाईट खबर आहे. विनयबाबूंवर एक खोटा आरोप येऊन त्यांना सात वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा—.

गिरीश पुढें कांहीं बोलणार तोंच, चौथऱ्याचे बाजूला कोणाचेसे 'अगाई ग! सरतेशेवटीं माझ्या कपाळीं हेंच कां होतं?' असे रडक्या स्वरांत उच्चारिलेले शब्द ऐकूं आले, व दुसऱ्याच क्षणीं खालच्या दगडांवर कोणीतरी धाडकन् पडल्याचा आवाज ऐकूं आला. गिरीश व क्षेमी धांवत आंत जाऊन पहातात, तों सुमती

दगडांच्या राशीजवळ अस्ताव्यस्त व मूर्छितावस्थेंत पडली. असून तिच्या डोक्यांत भयंकर जखम पडून तींतून एकसारखें भळभळ रक्त वहात आहे! तो आवाज ऐकून अर्धवट निद्रितावस्थेंत असलेली निर्मलाहि दिवा घेऊन धांवतच बाहेर आली, व आपल्या आईची ती भयंकर स्थिति पहातांच तिच्याच पायांपाशीं मूर्छित होऊन पडली. क्षेमी अतीशयच घाबरून गेली, व रडत घरांतून पाणी आणून दोघींच्याहि मस्तकांवर शिंपडूं लागली. गिरीशनें डॉक्टराला घेऊन येण्यासाठीं धूम ठोकली; व थोडयाच वेळांत एका जवळच्या डाक्टराला घेऊन आला. त्यानें येतांक्षणींच सुमतीचा हात धरून तिची नाडी पाहिली; मस्तक तपासून पाहिलें; नाकावर हात ठेवून पाहिला; व बरोबर आणिलेली नळीहि छातीला लावून पाहिली. सरतेशेवटीं खिन्न मुखानें क्षेमीकडे पाहून तो ह्मणाला, "आतां काय? वेळ गेली. या मुलीकडे आतां लक्ष दिलें पाहिजे."

लगेच डॉक्टरानें त्यांच्या मदतीन निर्मलेस शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न सुरू केला.

प्रकरण ९ वें.

आतां हिचीहि व्यवस्था लाविलीच पाहिजे.

लोभश्चेदगुणेन किं, पिशुनता यद्यस्ति किं पातकैः ।

....

नीतिशतकं.

सनातनः—महाशय अद्याप कलकत्त्याहून आले नाहींत—असें कळलें.

गोवर्धनः—काय म्हणतोस ? दुर्लभराय अद्याप आले नाहींत ? काल तूं स्वतःच त्यांच्या येथें गेला होतास ना ? बरें, आज आतां एकदां जाऊन पहा बरें; आणि आले असले तर घेऊनच ये त्यांना इकडे.

वरील भाषण गोवर्धन घोषाल व सनातन घोष यांच्यामधें उद्यानामागें असलेल्या तलावाच्या कांठीं चाललें होतें. गोवर्धनाच्या आज्ञेवरून सनातन दुर्लभचंद्राची चौकशी करण्याकरितां त्याच्या घरीं गेला; व गोवर्धन विष्णुमंदिरांतील आपल्या खोलींत त्याची उत्सुकतेनें मार्गप्रतीक्षा करीत बसला. थोडया वेळानें रायमहाशय सनातनाबरोबर स्वतःच आले. त्यांना पहातांच गोवर्धन आनंदानें म्हणाला, "यावें दुर्लभराय, यावें. येण्याला तुम्हाला इतका विलंब कां लागला ? मी तर थोडा बहुत चिंतेंतच होतों तुमच्याबद्दल !"

दुर्लभः—आपलें पत्र मिळाल्याबरोबर निघालों. बरें काय खबर आहे नवीन ? विनोदासंबंधीं नक्की काय ठरविलें ?

गोवर्धन अभिमान पूर्वक हांसून म्हणाला, "वाः ! अहो तें काम तर असें कांहीं पक्कें करून टाकिलें आहे, कीं, तुम्ही सुद्धां तोंडांत बोटच घालाल तें ऐकून ! ती पर्वा जी एक कल्पना माझ्या डोक्यांत साधारण आलेली मी तुम्हांला सांगितली होती तीच अमलांत आणली; आणि तीहि अशा बेमालुम रीतीनें कीं या कानाचें या कानाला सुद्धां अद्याप कळलें नाहीं !"

दुर्लभः—अरे वाः ! बहारच केलीत म्हणायची तुम्ही तर मग ! पण ती गोष्ट अद्याप त्याच्या भावजयीला कळली नाहीं का ?

गोवः—छे हो, बिलकुल नाहीं. आणि आतां कळून तरी काय करणार ती ! तिचीहि योग्य ती व्यवस्था लावण्यांत कांहीं माझ्याकडून कसूर झाली नाहीं ! माझा तर पक्का अंदाज आहे कीं, या

पुढच्या एकदोन आठवडयांतच आपल्या मार्गातील हाहि कांटा समूळ उपटला गेलाच पाहिजे.

दुर्लभः—तिची व्यवस्था काय लावलीत आणखी! कळूंद्या तर खरें! एकंदरींत या चार सहा दिवसांत तुम्हीं बरेंच काम उरकून टाकिलेंत म्हणावयाचें!

गोवर्धन हांसून म्हणाला, " आमच्या सुपीक डोक्यांत युक्त्यांना कांहीं तोटा नाहींच म्हणा. सहज पर्वा तिजविषयीं ती युक्ती सुचली. इकडे असे जवळ या म्हणजे तुमच्या कानांत सांगतों."

दुर्लभराय जवळ जातांच गोवर्धनानें ती त्याच्या कानांत सांगितली. ती ऐकतांच दुर्लभचंद्राचे नेत्र आश्चर्यानें विस्तार पावले, व तो आ वासून गोवर्धनाकडे पाहूं लागला. त्याचें सर्वांग क्षणभर रोमांचित झालें! दुर्लभराय हा जात्या थोडासा पापभीरु होता असें म्हटलें तरी चालेल, परंतु सर्व प्राणिमात्रावर आपला ताबा चालविणाऱ्या षड्रिपूंपैकीं लोभाचा त्याच्या मनावर विलक्षण ताबा चालत होता. आणि म्हणूनच तो गोवर्धनासारख्या नीचतम नरराक्षसाच्या रुपेरी जाळ्यांत सांपडून, त्याजबरोबर नाहीं नाहीं तीं दुष्कृत्यें करण्यास प्रवृत्त होत होता. गोवर्धनाची अमानुष क्रूरत्वाची युक्ती ऐकतांच त्याच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले; व क्षणभर त्याला कसेंसेंच वाटलें. परंतु तें वाटणें फक्त क्षणभरच होतें. त्याच्या मनांत पैशाविषयीं विचार येतांच फिरून त्याचें मन फिरलें. तो लगेच गोवर्धनाच्या युक्तीचें समर्थन करून म्हणाला, " ओहोहो! हें काम इतक्या बेमालुम रीतीनें होईलसें वाटलें नव्हतें मला आजपर्यंत! केव्हांपासून तें सुरू केलें?

दुर्लभचंद्राच्या चेहेऱ्यावर झालेला फरक जरी अगदीं तात्कालिक होता, तरीहि गोवर्धनासारख्या चाणाक्ष कपटपटूच्या ध्यानांत तो आल्यावांचून राहिला नाहीं. आपल्या हरएक कारस्थानांत—दुष्कृ-

त्यांत त्यानें आजपर्यन्त ज्याचा सल्ला घेतला होता, व पुढेंहि घेण्याची इच्छा होती, त्या दुर्लभचंद्राचा त्याला आज किंचित् संदेह आला! त्यानें क्षणभर साशंक मुद्रेनें त्याजकडे पाहिलें; परंतु त्याचें आपल्या युक्तीबद्दल समर्थनात्मक बोलणें ऐकून त्याचा त्याजाविषयींचा संशय थोडासा कमी झाला. तो म्हणाला "झाले दोन तीन दिवस."

दुर्लभ:—हं फळास येणार एकूण आपली युक्ती? बरें, पण हें सांगण्याकरितांच कीं काय आपण मला इतक्या तांतडीनें बोलाविलें!

गोव:—नाहीं. ज्या कामासाठीं तुम्हांला बोलाविलें, तें तर अद्याप सांगावयाचें आहे. बहुतेक व्यवस्था चोख होत आली आहे; परंतु आतां एक नवीनच उपस्थित झालें आहे! पर्वा तुम्ही माझ्या वतीनें दिनाजपुरास जाऊन विनयकृष्णावर दहा हजारांची डिक्री काढली होती, तिची आठवण असेलच तुम्हांला? त्याप्रमाणें त्याचा गांव जमीन वगैरे दाखल होऊन, त्याचा लिलांव सुद्धां होऊन गेला. परंतु त्याचें रहातें घर मात्र अद्याप ताब्यांत आलें नाहीं. तेथें आतां त्याची ती जुनी म्हातारडी मोलकरीण आणि त्याची मुलगी अशा दोघीच जणी आहेत. त्या म्हातारीनें—क्षेमीनें पर्वा एका मनुष्याकरवीं निर्मलेच्या आजोळीं म्हणजे विनयकृष्णाच्या सासऱ्याकडे एक पत्र लिहून टाकिलें. तें जर तसेंच पुढें गेलें असतें तर तिकडची कोणीतरी मंडळी येऊन थोडाबहुत घोंटाळाच झाला असता. परंतु येथील पोस्टमास्तर आपणाला वश असल्याकारणानें व पत्रहि कांहीं रजिस्टर वगैरे केलें नसल्याकारणानें आयतेंच ठरावाप्रमाणें तें माझ्या हातांत पडलें व मी त्याची विल्हेवाटहि लाविली. मी काल एका सरकारी बेलिफाबरोबर दुसरे दोन नोकर देऊन त्यास, तें घर खालीं कराविण्यासाठीं सांगण्यास पाठविलें होतें. ते तेथें जातात, तों ती म्हातारडी. हातांत झाडू घेऊन घरच्या कंपाउंडाबाहेर आली व मोठमोठ्यानें शिवीगाळ करूं

लागली! पहातें, ह्मणाली, कसं कोण घर खालीं करवितं तें. तिच्या त्या तसल्या फटकळ तोंडीं लागण्याची शाहमत तरी कोणाची आहे! बेलिफानें तिला नीट समजावून सांगितलें. ती ऐकेना तेव्हां त्यानें मजकडे एका चाकराला पाठवून विचारिलें कीं, 'कायद्याप्रमाणें आत्तांच्या आत्तां हिचें बरोबर करूं का? पण मीं विचार केला कीं, तसें केल्यास गांवचे लोक आपणांस काय ह्मणतील? मग त्याला पाठविला निरोप कीं, राहूंद्या सध्यां तिला तेथेंच; तुम्ही जा परत; आम्ही पाहूं मग पुढचें पुढें. तिनें त्या दिवशीं शिवीगाळी करून माझाहि बराच अपमान केला; परंतु मी मुद्दामच तें मनावर घेतलें नाहीं! तिचे बारा वाजविण्याला आपणाला कांहीं उशीर लागेल, अशांतली गोष्ट नाहीं; परंतु निदान सरशेवटीं तर असें म्हणतां येईल कीं आम्हीं तुजवर अखेरपर्यंत दयाच केली! ती आणखी लोकांना असेंहि सांगत होती कीं, ही डिक्री, मी कांहीं तरी खोटें नाटें खत करून आणिली आहे; आणि विनयकृष्णाला शिक्षा होण्यांतहि माझेंच अंग आहे. मग हें तिनें नुसतें धोरणच बांधलें किंवा तिला कुणाकडून ती हकीगत खरीच कळली, कांहीं कळत नाहीं. ती आतां त्याजबद्दल कलकत्याच्या लाट साहेबांचे पाय धरून त्यांजकडून त्याची सुटका करविणार आहे!

असें ह्मणून गोवर्धन तिरस्कारपूर्वक थोडासा हांसला. व पुढें ह्मणाला, "तें कांहीं असो. पण आतां हिचें हें प्रस्थ असेंच पुढें माजूं देणें हें कांहीं ठीक नाहीं. आतां हिचीहि व्यवस्था लाविलीच पाहिजे. ती काय करते ह्मणा; परंतु तिचा बंदोबस्त हा झालाच पाहिजे. आणि त्याचकरतां मी तुम्हांला बोलाविलें. मला वाटतें, तुम्हीं स्वतःच आज संध्याकाळीं तिच्याकडे जावें: तिला म्हणावें झालेल्या गोष्टींविषयीं तूं कशाला आतां व्यर्थ धडपड करून सरकार दरबार करतेस? नीटपणें घर सोडलेंस तर त्यांत तुझेंच हित आहे.

नाहींतर आपणांला योग्य ती व्यवस्था करावी लागेलच. काय? कसें काय आहे म्हणणें यावर तुमचें? कां कांहीं बोलत नाहीं?"

दुर्लभः—आहे खरी थोडी बहुत अडचण. बरें आहे. तुमच्या म्हणण्याप्रमाणें आज संध्याकाळीं मी तिकडे जाऊन जरा अदमास पहातों; व त्याप्रमाणें नंतर तुम्हाला येऊन कळवीन. जातों तर मी आतां बराच उशीर झाला.

असें म्हणून दुर्लभराय तेथून निघून गेला; व गोवर्धनहि आपल्या नित्यकर्मीला लागला.

प्रकरण १० वें.

रंग पालटला.

आज गोवर्धन व दुर्लभचंद्र या दोघांच्याहि वृत्तींत किंचित् फरक पडल्यासारखा दिसत होता. सकाळीं दुर्लभचंद्राला आपली युक्ती सांगतांना त्याचा चमत्कारिक झालेला चेहेरा पाहून, व त्यानें तेव्हांपासून बराच वेळ धरलेलें मौन पाहून गोवर्धनाला त्याजविषयीं थोडासा संशय आला, ह्मणून पूर्वी सांगितलेंच आहे. गोवर्धन जसजसा त्याविषयीं अधिकाधिक चौकशी करूं लागला, तसतसा त्याचा तो संशय दुणावत चालला. त्याचें मन त्यामुळें अस्वस्थ झालें.

इकडे दुर्लभचंद्राचीहि स्थिति जवळ जवळ तशीच झाली होती असें ह्मटलें तरी चालेल. गोवर्धनाकडून घरीं गेल्यावर त्याच्याहि मनाला स्वास्थ्य असें मुळींच नव्हतें. त्यानें आजपर्यंत गोवर्धनांस त्याच्या अनेक दुष्कृत्यांत मदत केली होती. परंतु आजचें अमानुषत्वाचें कृत्य ऐकून मात्र त्याचें काळीज अगदीं थरारून गेलें होतें. या पूर्वीहि कैक वेळां दुर्लभचंद्रास गोवर्धनाचीं कारस्थानें

ऐकून व पाहून तसें पापकर्म आचरूं नये असें वाटलें होतें, परंतु त्या वेळीं आजच्यासारखी चमत्कारिक स्थिति मात्र त्याची कधींच झाली नव्हती! प्रत्येक वेळेस लक्ष्मीचा अनावर लोभ त्यास त्याच्या दुष्कृत्यांत मदत करण्यास पुन:पुन्हां प्रवृत्त करीत असे. परंतु आजचा प्रकार कांहीं निराळाच होता. गोवर्धन तर स्वभावत: नीचत्व होता! परंतु दुर्लभचंद्रासारख्या वास्तविक त्या प्रतीच्या नसणाऱ्या मनुष्याच्या मनावर आजपर्यंत ज्या द्रव्यलोभानें पगडा बसविला होता, त्याची आज त्याजपुढें मात्रा चालेनाशी झाली! दुर्लभचंद्राच्या मनांतील सद्सद्विवेकबुद्धि व लोभ यांमध्यें होत असलेल्या झटापटींत सद्सद्विवेकबुद्धिचाच जय होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं! आपण यापुढें गोवर्धनाला त्याच्या कोणत्याहि कृत्यांत मदत ह्मणून करावयाची नाहीं, असा त्यानें पुष्कळ वेळा निश्चयहि केला; यद्यपि द्रव्यलालसेनें त्याचे ते विचार डळमळूं लागले! त्याचें मन आजच्या प्रकारानें तशा कृत्यांपासून बहुतांशीं परावृत्त झालें होतें, यांत तर संशय नाहींच, परतु द्रव्यलालसा कांहीं समूळ नाहींशी झाली नव्हती! सरते शेवटीं त्यानें असा निश्चय केला कीं, आज आपण कबूल केल्याप्रमाणें सायंकाळीं विनयकृष्णाच्या घरीं जावें, व मग पुढें होतां होईल तों गोवर्धनाच्या कारस्थानांतून आपलें अंग काढतेंच घ्यावें.

इकडे दत्तांच्या वाड्यांत त्या दिवशीं संध्याकाळच्या सुमारास निर्मला क्षेमीच्या मांडीवर मस्तक ठेवून पडली होती. तिच्या डोळ्यांतून अविरल अश्रुवर्षाव होत होता. क्षेमी तिची वारंवार समजूत करीत होती. ती म्हणाली, "बाळ निर्मले! तूं आतां आपल्या शरीराचे अशा रीतीनें सर्व दिवसभर रडून रडून हाल करून घेऊं लागलीस ह्मणजे कसं बरं होईल? रडण्यानं का कुठं गेलेलीं माणसं, परत येत असतात?" यावर निर्मला व्यथितांत:करणानें म्हणाली, "जगायचं तरी कशाला नी कुणासाठीं? मला आतां मरणंच बरं

वाढतं. मी आजवर जन्मांत कधीं माझ्या आईला सोडून दूर राहिलें नव्हतें. आणि तिचा विसर मला इतक्यां लवकर कसा बरं पडेल? आई कुठं ग आहेस तूं? या अभागिणीला एकदां तरी दर्शन दे ग!"

असें ह्मणून निर्मला हंबरडा फोडून रडूं लागली. क्षेमीनें तिचे डोळे आपल्या पदरानें पुशिले व तिला पोटाशीं धरून प्रेमानें कुरवाळून म्हणाली, "असं काय बरं बाळ. उगी. आतां तुझे बाबा जेणेंकरून लवकर परत येतील अशा कांहींतरी खटपटीस लागलं पाहिजे."

आपल्या बापाची गोष्ट निघतांच निर्मला तात्काल उठून बसली, व उत्सुकतेनें क्षेमीस म्हणाली, "इतक्या लवकर बाबा परत येतील काय? मावशे, काय केलं असतां ते लवकर परत यतील? तुला आहे काग ठाऊक?"

क्षे:—वरिष्ठ कोर्टांत जर त्यासंबंधीं आपण एखादा अर्ज केला, तर कदाचित् त्यांची लवकर सुटका होण्याचा संभव आहे.

नि:--मग तसा अर्ज आपण गिरीशबरोबर लिहून पाठविला तर तो नेईल कीं नाहीं; ? कीं मी स्वतः च—

इतक्यांत बाहेरून कोणी हांक मारून ह्मटलें, "कोण आहे हो घरांत?"

क्षेमीनें ताबडतोब बाहेर येऊन दरवाजा उघडला. तोंच स्थूल-काय दुर्लभचंद्र तिच्या दृष्टीस पडले. क्षेमीनें पुढें येऊन त्यांस ह्मटलें, "कोण आहांत तुह्मीं? कोण पाहिजे इथं तुह्मांला?"

दुर्लभ:--क्षेमङ्करी तुमचेंच नांव काय?

क्षेमी:—होय माझेंच. काय काम आहे मजजवळ आपलें?

दुर्लभ:—मी गोवर्धनाकडून आलों आहे. ह्मणणें एवढेंच कीं, कोर्टाचा हुकूम कांहीं आतां रद्द होत नाहीं; हें तुह्मी जाणतच

आहां, तेव्हां हें घर दाखल करण्यासाठीं परवां जे गृहस्थ परवाना घेऊन आले.........

वरील शब्द ऐकतांच क्षेमीच्या तळपायाची आग मस्तकास गेली! ती मोठमोठ्यानें ओरडून व त्याच्या तोंडासमोर नानातऱ्हेचे हातवारे करून ह्मणूं लागली, "आग लागोरे मेल्या तुझ्या ह्मणण्याला! आला आहे मोठा इथं शिष्टाई करायला! त्या मेल्या गोवर्धनाचेच नारे तुह्मी कुत्रे? चल हो बाहेर. बापाचीच जिंदगी लागून गेली आहे नाहीं? आला घर दाखल करायला!"

दुर्लभ:—बाई अशा रागावूं नका. मी काय म्हणतों तें जरा ऐकून तर घ्या.

क्षे:—हो हो! पुष्कळ ऐकून घेतलं. आम्ही कांहीं घर खालीं करीत नाहीं! रस्ता धर तूं आपला बऱ्या बोलानं!

क्षेमीचें बडबडणें आणखीहि सुरू झालें.

दुर्लभराय संध्याकाळच्या सुमारास दत्तांच्या वाडयाकडे आला. दरवाजापाशीं येतांच आंत निर्मलेनें आपल्या आईची आठवण होऊन फोडलेला हंबरडा ऐकून, त्याचें अंतःकरण अगदीं विरघळून गेलें! तो क्षणभर तेथेंच स्तब्ध उभा राहिला; व थोडया वेळानें त्यानें वर लिहिल्याप्रमाणें दारावर थाप मारिली. व क्षेमी बाहेर येतांच तिला मनामध्यें किंचित् कचरत पूर्वोक्त युक्तिवाद सांगूं लागला. त्याबरोबर तिच्या तोंडून त्याची यथास्थित पूजा होऊं लागली. ती ऐकतांच कांहीं वेळानें निर्मला डोळे पुसून समोरील माजघरांत येऊन तेथूनच क्षेमीला तिच्या बडबडण्याचें कारण विचारूं लागली. परंतु क्षेमीच्या विलक्षण कडकडाटापुढें तिचा बारीक मंजुळ आवाज अगदींच फिका पडला. तो क्षेमीला मुळींच ऐकूं गेला नाहीं. तेव्हां निर्मला तिच्या समोर येऊन तिला थांबवून म्हणाली, "मावशे, काय ग आहे?" काय झालं?

निर्मला बाहेर यैतांच दुर्लभचंद्राचें लक्ष तिजकडे गेलें. आजपर्यंत त्याला दत्तांच्या वाडयांत येण्याचा प्रसंग मुळींच आला नव्हता. अर्थातच त्यानें हा दिवसपर्यंत निर्मलेला कधींहि पाहिलें नव्हतें. त्यानें फक्त लोकांच्या तोंडून तिच्या अनुपम सौंदर्याची प्रशंसा मात्र ऐकिली होती. परंतु आज निर्मलेला पाहतांच त्याची खात्री झाली कीं, आपण ऐकिलें होतें त्यापेक्षांहि ही कितितरी अधीक सुंदर आहे. परंतु गेल्या थोडयाच दिवसांत तिजवर असह्य दुःखाचे डोंगर कोसळल्यामुळें तिची शरीरयष्टी बरीच कृष झाली होती. व चेहरा शोकपूर्ण असून म्लान दिसत होता. ती एक साधीशीच साडी नेसली होती. तिच्या अंगावर या वेळीं एकहि दागिना नव्हता. तिचा तो एकंदरींत अगदीं उदास व शोकपूर्ण असा चेहरा पाहतांच, व तिच्या या सर्व दुःखांचें कारण गोवर्धन व आपण हें मनांत येतांच मात्र दुर्लभरायाचें मन पूर्णपणें फिरलें ! दुर्लभचंद्र तिजकडे एकसारखें टक लावून पाहून फारा दिवसांचें कसलें तरी स्मरण करीत असावासें दिसलें. सुमारें सहासात वर्षांपूर्वीं एकेवेळीं तो एका आजारानें अत्यावस्थ होता. अनेक औषधें देऊनहि रोग हटेना, तेव्हां त्याची आई त्यास दिनाजपुराहून अशोकपुरांत त्याच्या चुलत्याकडे घेऊन आली होती. तेथें येतांच तिनें त्याजकरितां देवधर्म, व्रतें, उपोषणें वगैरे करण्यास आरंभ केला होता. तेथील देवीचें स्थान जागृत असल्याबद्दल तिनें बरेच वेळां ऐकिलें होतें. तेव्हां तिचीच प्रथम मनापासून आराधना करण्यास तिनें आरंभ केला होता. कांहीं दिवस आराधना केल्यानंतर देवीनें तिला स्वप्नांत दृष्टांत देऊन असें सांगितलें कीं, ' आज तुझ्याकडे एक लहान मुलगी चुकून येईल. तिजकडून तूं तुझ्या मुलाला तिचा हस्तस्पर्श करव, म्हणजे तो बरा होईल. तुझें काम होतांच

तिला ताबडतोब परत पाठवून दे.' त्या दृष्टांताप्रमाणें दुसऱ्या दिवशीं एक मुलगी—ह्मणजे विनयकृष्ण दत्तांची मुलगी निर्मला—खेळतां खेळतां चुकून तिकडे आली. रात्रीं देवीनें सांगितलेली मुलगी हीच असावी, असें समजून दुर्लभचंद्राच्या आईनें तिला आपल्या घरांत आणिलें, व तिचा हस्तस्पर्श दुर्लभचंद्रास करविला. त्याबरोबर त्याचा रोग नाहींसा झाला. ती आठवण त्याला आतां झालीसें दिसलें; त्यावरून त्यानंतरहि कित्येकांनीं आजारी मनुष्यांना निर्मलेचा हस्तस्पर्श करवून पाहिला, परंतु पुन्हां कोणालाच तसा अनुभव आला नाहीं. ती शक्ती फक्त तात्पुरतीच देवीच्या वरानें तिच्या अंगीं आली असावी, असेंच सर्व लोक समजले. पुढें ती गोष्ट लवकरच सर्वांच्या ध्यानांतून गेली. त्यावेळीं दुर्लभचंद्र व त्याची आई हीं दोघेंहि अगदीं नवीनच असल्याकारणानें, ती मुलगी कोण हें दुर्लभचंद्राच्या ध्यानांत राहिलें नाहीं. फक्त तिचा चेहरा मात्र त्याच्या पूर्णपणें लक्षांत राहिला होता. त्याच्या आईला निर्मलेचें नांव ठाऊक होतें, परंतु तिनेंहि पुढें विशेष कांहीं चौकशी केली नव्हती. त्यामुळें दुर्लभचंद्रास तिची पूर्णपणें विस्मृती पडली होती. तथापि तिच्या चेहेऱ्याकडे बराच वेळ निरखून पाहिल्यानंतर त्याला त्या गोष्टीची स्मृति झाली. व अशा आपल्या प्राणदात्या मुलीचा आपण गोवर्धनाच्या नादीं लागून केलेला व्यर्थ छळ मनांत येतांच पराकाष्ठेचें वाईट वाटलें; व स्वकर्माचा पश्चात्ताप झाला. अगोदरच त्याच्या थोडयाशा घोंटाळलेल्या मनाला, ह्या गोष्टीनें पुरेंच फिरविलें. आतां मात्र त्यानें अगदीं निश्चय केला कीं, यापुढें पुन्हां म्हणून गोवर्धनाच्या दुष्कृत्यांत भागीदार व्हावयाचें नाहीं; उलट त्याच्यापासून निष्कारण दुःख पावणाऱ्या ह्या दोन्हीं निरपराध कुटुंबांचें होतां होईल तों रक्षण करावयाचें.

इकडे दुर्लभचंद्राच्या मनांत वर लिहिल्याप्रमाणें विचार घोळत असतां, क्षेमीहि कांहीं स्तब्ध बसली नव्हती. तिचें बडबडणें सारखें चालूच होतें. ती म्हणाली " बाहेर हो म्हणतेंना ? निलाजऱ्यासारखा मेला पाहतो आहे पहा कसा तोंडाकडे टकमक !"

दुर्लभराय तिचें तें सर्व बोलणें निमूटपणें सहन करून अश्रुपूर्ण नेत्रांनीं म्हणाला, " अरेरे ! बाई, यापूर्वीच जर कधीं मला तुमच्या येथें येण्याचा प्रसंग येता, अथवा ही मुलगी माझ्या दृष्टीस पडली असती, तर आजच्या सारखा हा दुर्धर प्रसंग तुम्हांवर खचित आला नसता ! अरेरे ! दैववशात् ज्या मुलीकडून एकवार माझा प्राण वांचला, तिचाच सर्वस्वी नाश करण्याला मी दुष्ट उद्युक्त झालों, ही केवढ्या दुःखाची— केवढ्या शरमेची गोष्ट !"

असें म्हणून दुर्लभराय फारच दुःख करूं लागला. तें पाहून निर्मलेला वाईट वाटलें. ती म्हणाली " आपण कोण आहां ? आपण काय ह्मणतां तें मला समजत नाहीं !"

क्षेमीः—अग त्याचं काय ऐकतेस निर्मले ! मायावी राक्षस मेले ते ! ए बाबा, तूं आतां बऱ्या बोलानं इथून जा कसा ! तुझा तो मायावीपणा नी चलाखी मजजवळ कांहीं चालायची नाहीं, बरं का ! तुझ्या गोवर्धनाला जाऊन सांग कीं, इतक्या सहजासहजीं फसायला इथें कांहीं आतां विनयबाबू नाहींत; त्यांच्या जागीं ही क्षेमङ्करी आहे क्षेमङ्करी ! कसं घर घेतां तें बघतें मी ह्मणावं !"

दुर्लभः—बाई, मी अगदीं ईश्वराला स्मरून खरें सांगतों; मी काय ह्मणतों तें तर ऐकून घ्या—

मध्येंच क्षेमी ओरडून म्हणाली, " अरे हो ! पुष्कळ ऐकली तुझी शिफाई ! जा आतां जा !"

निर्म:—मावशे, असं ग काय करतेस ? ते पुढं काय ह्मणतात तें ऐकून तर घे.

दुर्लभचंद्रानें नंतर मागें घडलेली दृष्टांतासंबंधीची इत्थंभूत हकीगत सांगितली, व डोळ्यांत आसवें आणून म्हणाला, “ अरेरे ! ज्या निरपराध मुलीकडून एक वेळ ह्या दुष्टाचें प्राणरक्षण झालें तिचाच व्यर्थ छल मजकडून व्हावा ही केवढ्या दुःखाची गोष्ट ! निर्मलाबाई, मी अंतःकरणपूर्वक हात जोडून तुमची क्षमा मागतों ! झाल्या गोष्टी तुम्हीं मनांत आणूं नये. तुम्हीं मला क्षमा नाहीं का करणार ? ”

निर्मलेनें दुर्लभचंद्राचें सर्व बोलणें शांतपणें ऐकून घेतलें. तिलाहि लहानपणच्या एका तशा प्रसंगाची पुसट पुसट आठवण झाली. क्षेमीचें मन किंचित् घोंटाळ्यांत पडल्यासारखें झालें. तिलाहि त्या गोष्टीची आठवण झाली. त्या वेळेस निर्मलेच्या त्या अद्भुत हस्तगुणाचा अनुभव इतर कोणासहि न आल्यामुळें त्या गोष्टीचें बहुतेक सर्वांना विस्मरण पडलें होतें. परंतु आतां क्षेमीला तिची चांगली आठवण झाली. ती बराच वेळ विचार करीत स्तब्ध राहिली. इतक्यांत दुर्लभचंद्र ह्मणाला, “ बाई, झाल्या गोष्टी आपण मनांत आणूं नका. मला आतां माझ्या कृतकर्माचा पूर्णपणें पश्चात्ताप होत आहे. मजकडून यापुढें आतां तसें आचरण कधींहि घडणार नाहीं; याबद्दल तुम्हीं अगदीं खात्री बाळगा. उलट माझ्याकडून होतांहोईल तितकें करून मी तुमचें बरें करण्याचा प्रयत्न करीन, हाच माझा निश्चय ! आणि अद्यापही तुह्मांला जर माझी खात्री पटत नसेल, तर त्या समोरच्या स्मशानकालीच्या देवळांत मजबरोबर चला. तिथें मी देवीच्या पायांवर हात ठेवून दिव्य करतों, आणि मग सर्व कांहीं हकीगत सांगतों. मात्र त्या

ठिकाणीं तुम्हींहि, मी जें कांहीं सांगेन त्यांतील एक अक्षरहि बाहेर न फोडण्याबद्दल देवीची शपथ घेतली पाहिजे."

दुर्लभचंद्र वरील सर्व बोलणें इतक्या नम्र स्वरांत व अंतःकरणपूर्वक बोलत होता कीं, क्षेमीला त्यांतील एक अक्षरहि खोटें आहेसें वाटेना. परंतु संशयहि आल्याविना राहीना! ती म्हणाली, "तुह्मांला काय सांगायचं तें इथंच कां सांगाना? माझा तुमच्यावर विश्वास बसेल. न जाणो तिथं जाऊन आम्हांला आणखीहि कांहीं अरिष्टांत लोटलंत तर आमचे हाल कुत्रा खाणार नाहीं!"

दुर्लभः––छेः छेः! मी अगदीं ईश्वराला स्मरून सांगतों कीं, तुह्मांला आतां मजकडून काडीमात्र भीति बाळगण्याचें कारण नाहीं. मी आजपर्यंत द्रव्यलोभानें त्या नीच दुरात्म्या गोवर्धनाचा त्याच्या सर्व दुष्कृत्यांत साथीदार होतों खरा, पण यापुढें तसें होणें केवळ दुरापास्त! ईश्वरकृपेनें माझें भ्रमपटल आतां दूर झालें आहे! आजपासून मी त्याचा परम शत्रू झालों.

क्षेमी, नंतर त्या गोष्टीला कबूल झाली व ह्मणाली, "बरं तर तुम्हीं चला पुढं. मी मागाहून येत्यें."

प्रकरण ११ वें.

गूढ उकललें.

श्लोक.

ऐसें कुकर्म करण्या नर हा प्रवृत्त
होईल हें मनिं नसे कटु केंवि वृत्त.
....
....

कुसुमाञ्जली.

विनयकृष्णाच्या घरांपासून थोड्याच अंतरावर स्मशानकालीचें देवालय होतें. तें लोकवस्तीपासून थोडें दूरच होतें ह्मटलें तरी चालेल. देऊळ कांहीं फारसें मोठें नव्हतें. आंत शिरतांच एक साधारण लहानसें दालन, व पुढें गाभारा. तें जुन्या तऱ्हेनें बांधलेलें असल्यामुळें पुढील दालनांत थोडासा व गाभाऱ्यांत तर अर्थातच अगदीं मिट्टकाळोख होता. आंत देवीजवळ एक तुपाचा दिवा मिणमिण जळत होता; परंतु त्यामुळें तो अन्धकारपूर्ण गाभारा उलट अधिक भयप्रद मात्र दिसत होता. त्यांत समोरच भीमवदना नृमुंडधारिणी कालिकादेवीची मूर्ति होती. तिच्या उग्र मुखांतून लळलळणारी जिव्हा पाहतांच, पापी दुष्ट लोकांच्या उरांत धडकीच भरविल्याविना रहात नसे.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें दिव्य करण्याकरितां दुर्लभचंद्र व क्षेमी हीं तेथें गेलीं. दोघांनींहि देवीच्या पायांवर हात ठेवून शपथा घेतल्या. नंतर क्षेमी ह्मणाली, "देवीच्या पायांवर हात ठेवून, आपण दोघांनींहि दिव्य केलें; हं आतां, आधीं आमचे विनयकृष्ण-बाबू परत केव्हां येणार तें सांगा पाहूं."

दुर्लभः—पहिल्या प्रथम माझें तुम्हांला एक सांगणें आहे. तें हें कीं, मी जें कांहीं आतांपर्यंत सांगितलें किंवा सांगेन, त्यापैकीं एक अक्षरहि बाहेर फुटतां कामाचें नाहीं. विनयकृष्णबाबूंविषयीं ह्मणाल तर होईल तितक्या लवकर त्यांची सुटका होण्यासाठीं मी शक्य तो प्रयत्न करून पाहतों.

क्षेः—हं आणखी काय?

दुर्लभः—विशेष गोष्ट ही कीं, नीलांबरबाबू अद्याप जिवंत आहेत! क्षेमी अत्यंत विस्मयचकित होऊन ह्मणाली, "आँ! काय ह्मणतां? नीलांबरबाबू अद्याप जिवंत आहेत? तर मग अनङ्गमोहिनी विधवा कशी झाली? ती तर गेलीं चार वर्षे विधवाच आहे!"

दुर्लभः——पापी गोवर्धनानें ती सर्व बातमी खोटीच उठविली होती. मी मागाहून तुह्मांला सविस्तर सांगेन, ती सर्व हकीगत पुष्कळच मोठी आहे. आतां तुह्मांला——

इतकें ऐकूनच क्षेमीला गोवर्धनाचा मनस्वी संताप आला. तिचें फटकळ तोंड कांहीं बोलल्याशिवाय राहीना. ती म्हणाली, "मोठीच बाई आश्चर्याची गोष्ट ! मढं गेलं मेल्याचं एकदां ! इतका का तो माजला आहे ? मेल्या सर्पाला आणून ह्या देवीच्या पायांशीं बळीच दिला पाहिजे !"

दुर्लभः——देवी स्मशानकाली त्या दुष्टाला योग्य शासन करण्याला समर्थ आहे. तें असो. पण तुह्मांला एक जरूरीचें काम पहिल्यानें केलें पाहिजे. अनङ्गमोहिनी बाईची दासी वामा हिची आणि तुमची ओळख असेलच ?

क्षेः——होय, आहेच. शिवाय ती लांबून माझी पुतणी लागते ! ती बहुतकरून मला रोज भेटते. बरं मग तिजविषयीं तुम्हीं काय म्हणतां ?

दुर्लभः——तिच्याजवळ वाड्यांतल्यां एका गोष्टीचा तपास होतां-होईल तितक्या लौकर करा. गोवर्धनानें एक विषारी औषध आणिलेलें आहे. तें चारपांच दिवस खाल्ल्यापासून मनुष्याला वेड लागतें; व आणखी आठ दहा दिवस खाल्लें कीं मरण येतें. आज जवळ जवळ चारपांच दिवस गोवर्धन तें परस्पर गौळणीकडून दुधांत मिसळवून अनङ्गमोहिनीला देतो आहे ! तेव्हां वामेला भेटून तिच्याकडून पहिल्या प्रथम बाहेर कांहीं न बोलण्याबद्दल शपथ घेववून नंतर सांगा, कीं, यापुढें कसेंहि करून तूं तें गौळणीनें आणलेलें दूध अनङ्गमोहिनीच्या पोटांत जाऊं देऊं नकोस.

क्षेः——अगाई ! काय तरी मेल्याची भयंकर कृत्यं हीं ! चारपांच दिवस तें औषध त्यांच्या पोटांत जातं आहे कां ? तर

मग आतां बहुतेक करून त्या वेड्या झाल्या असतील ? आई जगदंबे कालिका माते ! माझी म्हातारीची तुला लक्ष वेळां नमस्कार करून इतकीच विनवणी आहे कीं, ह्या मेल्या दुष्ट लांडग्यापासून आमच्या अनङ्गमोहिनी बाईचं रक्षण कर !

दुर्लभः—नीलांबर बाबूंची स्त्री जर वेडी झाली नसली, तर तिला वामेला एवढेंच सांगावयाला सांगा कीं, तिला (ह्मणजे वामेला) स्मशानकाली देवीनें स्वप्नांत येऊन असें सांगितलें आहे कीं, ‘ नीलांबर बाबू अद्याप जिवंत आहेत, व ते लवकरच परत येतील.’ तुह्मांला तर बहुतेक हकीगत आतां समजली आहेच. मात्र तीपैकीं वामेलाहि सध्यांच कांहीं विशेष कळवावयाचें नाहीं, फक्त त्या स्वप्नासंबंधींच सांगावयाला सांगा. परंतु आतां विनयकृष्ण बाबू परत येईपर्यंत, अथवा मी नीलांबर बाबूंना परत घेऊन येईपर्यंत तुम्ही दोघीनीहि या ठिकाणीं राहणें ठीक नाहीं. कारण, न जाणों, गोवर्धन कोणत्या वेळीं काय करील, त्याचा नेम कुणीं सांगावा ?

क्षे:—नीलांबर बाबू किती दिवसांनीं परत येतील ? हल्लीं ते आहेत कुठं ? तुम्हीं त्यांना बरोबर केव्हां घेऊन याल ? आणि आमचे विनयकृष्ण बाबू केव्हां सुटतील ?

दुर्लभः—बहुतकरून आणखी चारदोन महिन्यांच्या आंतच या सर्व गोष्टी घडून येतील, असा अजमास आहे. परंतु हे तीन-चार महिने निर्मलेला घेऊन तुह्मांला रहातां येईल, असें एखादें तुमचें आप्ताचें ठिकाण नाहीं का ?

क्षे:—काशींत निर्मलेची एक दूरची चुलती राहाते. निर्मलेला विचारून त्यासंबंधीं मी तुह्मांला कायतें लवकरच कळवीन. पण सध्यां आमच्या हातीं खर्चा–”

“ऊं ! पैशांविषयीं तुम्हीं अगदीं काळजी करूं नका.” दुर्लभ-चंद्र थोडा वेळ थांबून, नंतर खेदपूर्वक ह्मणाला, “ ह्या दुष्टानें,

आजपर्यंत नीलांबरबाबू व विनयबाबू ह्यांचा सर्वस्वी नाश करून त्यांच्या संपत्तीवर यथेच्छ हात मारिला आहे.! परंतु त्या कृत्याबद्दल मला आतां पूर्णपणें पश्चात्ताप वाटत आहे! माझी सर्व संपत्ती ही आपलीच आहे असें समजा; आणि मजजवळ हवी ती मदत हव्या त्या वेळेस मागण्यास काडीमात्र अनमान करूं नका, एवढी माझी विनंती आहे. आतां इथून गेल्यावर तुम्हीं पहिलें काम हें करा कीं वामेची भेट घ्या आणि मी सांगितल्याप्रमाणें तिजकडून अगोदर बंदोबस्त करवा. मात्र तिला इतर गोष्टींविषयीं विशेष माहिती न द्याल तितकी बरी. कारण कोणतीहि गोष्ट षट्कर्णी झाली ह्मणजे गुप्त राहूं शकत नाहीं."

इतकें बोलणें झाल्यावर दुर्लभचंद्र तेथून निघून गेला, व क्षेमीहि आपल्या घरीं गेली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं दुर्लभचंद्र गोवर्धनाकडे गेला. गोवर्धनानें नित्याप्रमाणें त्याचा आदरसत्कार करून ह्मणाला, "यावें दुर्लभ भाई, कसें काय झालें त्या कालच्या गोष्टीचें?"

दुर्लभः—तें सगळें कांहीं कालच्या कालच ठीक केलें आहे. आपण त्या विषयीं अगदीं निश्चिन्त असा. त्या दोघीहि बहुतेक एकदोन दिवसांच्या आंतच गांव सोडून जातील.

गोवः—हं? वाः! हें काम इतक्या लवकर आणि इतक्या सहजीं होइलसें वाटलें नव्हतें मला! बरें तें असो. पण तुमचा चेहरा जरा उतरल्यासारखा दिसतो आहे, आणि स्वरहि जरासा बदलला आहे! कांहीं प्रकृती वगैरे बिघडली आहे कीं काय?

दुर्लभः—छे, छे, विशेष कांहीं नाहीं. काल रात्रीं जरा जांग्रण झालें होतें, त्यामुळें दिसत असेन कदाचित् तसा. बरें पण नीलांबरासंबंधीं कांहीं हकीगत कळली किंवा नाहीं? तो अद्यापि

गुरुदेव प्रेतोद्धारानीं पोहोंचविलेल्या त्याच पहाडांत आहे काय ? आणि गुरुदेवांविषयींहि कांहीं हकीगत कळली नाहीं !

गोवर्धनः—नक्की असें कांहींच अद्याप कळलें नाहीं. परंतु चारपांच दिवसांत कळेलसा अजमास आहे. प्रेतोद्धार गुरुजींकडे पर्वाच एक मनुष्य पाठविला होता. त्याच्याबरोबर त्यानीं असा निरोप पाठविला आहे कीं, मी चारपांच दिवसांच्या आंत तिकडे येऊन सर्व कांहीं हकीगत कळवितों. पाहूं या आतां काय होतें तें. तिकडे पाठविण्याकरितां दोघां मारेकऱ्यांना नुकतेंच मी ठरवून ठेविलें आहे. तो एक गण्या, आणि तो दुसरा रुस्तम. मात्र तुह्मांला त्यांच्याबरोबर तेथपर्यंत गेलें माहिजे. त्याशिवाय आपणाला कांहीं निश्चिन्त वाटणार नाहीं.

दुर्लभचंद्राला तरी तेंच पाहिजे होतें. त्यानें प्रथमः वरवर नाखुषी दर्शविली, परंतु लवकरच तो त्या गोष्टीला कबूल झाला.

प्रकरण १२ वें.

प्रयाण.

त्याच दिवशीं संध्याकाळच्या सुमारास दुर्लभराय विनयकृष्णाच्या घरीं गेला. जातांच त्यानें क्षेमीला विचारिलें, "कसें काय ? काय खबर आहे वाडयांतली ? भेटला होतां का तुह्मी वामेला ?"

क्षेमी दुःखानें म्हणाली "काय सांगूं हो ? सत्यानाश झाला ! ज्या गोष्टीला आपण भीत होतों,. ती गोष्ट तर घडून आली ! त्या औषधापासून गेले तीन दिवस,—

दुर्लभः—काय ? नीलांबर बाबूंची स्त्री वेडी झाली ? अरेरे !

क्षेमीः——अद्याप कांहीं अगदींच वेडी झाली नाहीं, तरी पण बहुतेकं वेड लागल्यासारखेंच आहे. आजच दोनप्रहरीं मी वामेला भेटल्यें होत्यें, तिला तुमच्या सांगण्याप्रमाणें शपथ घेववून नंतर औषधाविषयीं हकीगत सांगितली. ती मला स्वतःलाच अनङ्गमोहिनीकडे घेऊन गेली. ती हल्लीं बहुतकरून कोणाचीहि भेट घेत नाहीं. मी गेल्यें तों ती एकदम माझ्यापुढं हात जोडून उभी राहिली, व तोंडांतल्या तोंडांत कांहीं पुटपुटली. तिनं मला ओळखलन्हि नाहीं! मग वामा तिला म्हणाली, 'बाईसाहेब, हिला तुम्हीं ओळखीत नाहीं का? ही ती आपली दत्तांच्या इकडची क्षेमी!' तशी अनङ्गमोहिनी माझ्याकडे पाहून एकदम हंसूंच लागली; व म्हणूं लागली कोण म्हणतं मी हिला ओळखलं नाहीं म्हणून? ही तर त्या चुनीलाल जव्हेरीची बहीण! अहो हिनं तर मला कित्येक वेळां उंची चोळ्या लुगडीं आणून दिलीं आहेत! तीं तूं मागतेस होय? काय? माझ्यासाठीं आतां आणखी नवीन आणलीं आहेस? छे: ग बाई, भलतंच कांहीं तरी! असले उंची उंची कपडे घालण्याचे का दिवस आहेत माझे आतां? मी तर विधवा! माझ्या बोलण्यावर तुझा विश्वास नसला, तर त्या बुढ्या नायबाला विचार.' वगैरे आणखीहि पुष्कळ बोलत होती. तिचं तें तसं बोलणं ऐकून किनई, माझी तर बाई अगदीं छाती फाटून गेली, आणि डोळ्यांत पाणी आलं! ती आणखी पुढं म्हणाली, 'कां ग तूं रडतेस कां? तूं आणलेले कपडे मी अंगावर घालीन, म्हणजे तर झालं ना? मी जेव्हां माझ्या स्वामींच्या जवळ जाईन, तेव्हां याच्याहि पेक्षां कितीतरी मौल्यवान् कपडे मला तिथं मिळतील. मग मी किती तरी डागडागिने, हिऱ्यांचे मुक्ताहार नी डोक्यावर माणिकमोत्यांचे अलंकार घालीन. अन् मी जेव्हां तिकडे जाईन तेव्हां तुला सुद्धां बरोबर नेईन हं! इथं जशी होत्यें, तशी तिथं

गेल्यावरहि मी त्यांची राजराजेश्वरी होईन.' वामा तिला गप्प करून ह्मणाली, 'ऐका बाईसाहेब कालच स्मशानकाली देवीनं मला स्वप्नांत येऊन असं सांगितलं आहे कीं, नीलांबर बाबू अद्याप जिवंत आहेत, आणि ते लवकरच येऊन तुह्मांला भेटणार आहेत ' अनङ्गमोहिनीनें वामेचं बोलणं ऐकलं, आणखी आपली हांसायलाच लागली एकसारखी! आणि ह्मणाली, 'दूर हो, अभागी आहेस तूं. भलतंच कांहीं तरी बोलते आहे! ते इथून किती दूर! इतक्या दूर असल्यावर कधींतरी वांचतील का ते?' माझ्याच्यानें तर बाई पुढें कांहीं तिथें राहवलें नाहीं. तिचें एकंदर तें चमत्कारिक बोलणें चालणें पाहून माझ्या काळजाचें अगदीं पाणी पाणी झालें! मी आलें मग तिथून. त्या नायबाचा मात्र मला असा राग आला होता कीं, मेल्याचे कापून तुकडे करून कोल्ह्याकुत्र्यांकडून खाववावे! पण अजून, मला वाटतं, लवकर कांहीं उपाय केले तर अनङ्गमोहिनी सुधरण्यासारखी आहे. होण्यासारखे आहेत का तसे कांहीं उपाय?

दुर्लभः—उपाय आहेत, पण सध्यां तोंड दाबून बुक्यांचा मार, अशांतली झाली आहे स्थिति! यांपुढें कुठून तरी तें विष पोटांत न जाण्याइतकी तजवीज ठेवा ह्मणजे झालें. मग कांहीं विशेष भीति नाहीं. ही गोष्ट बाहेर प्रसिद्ध करावी तरी गोवर्धन मध्यें दुसरेंच कांहींतरी विघ्न उपस्थित करावयाचा आणि न करावी, तरी तिकडूनहि पंचाइत! असो. प्रभु तारणारा समर्थ आहे. मी लवकरच गुप्तपणें कांहींतरी औषध देण्याची व्यवस्था करीन मजजवळ एक उत्कृष्ट प्रकारचें तेल आहे. तें जर मस्तकास चोळलें, तर मेंदू बराच शांत होतो. मी त्या तेलाची बाटली तुमच्याजवळ आणून देतों. तें वामेला अनङ्गमोहिनीच्या मस्तकाला दररोज चोळायला सांगा. ह्मणजे विषाचा जोर अधीक न होतां बाधा कमी कमी होत जाईल. तें असो. पण तुह्मीं हें ठिकाण बदलून कोणीकडे जाण्याचें नक्की केलें आहे?

क्षे:—मी त्याबद्दल निर्मलेला विचारलं. ती ह्मणाली कीं बाबा परत येईपर्यंत आपण तिकडे रहावं असं जर तुझं मत असेल तर माझी कांहीं हरकत नाहीं.

दुर्लभ:—तर मग आतां येथें अधीक रहाण्यांत अर्थ नाहीं. होतां होईल तितकी जलदी केली पाहिजे. तेथपर्यंत पोहोंचवायला मी तुमच्या बरोबर एक विश्वासू मनुष्य देतों. आजच निघण्याची तयारी करा. तुह्मांला वाटखर्चीसाठीं व इतर खर्चासाठीं हे पैसे आणले आहेत, हे घ्या.

असें ह्मणून दुर्लभचंद्रानें दोन पैशांच्या पिशव्या तिजपुढें केल्या व ह्मटलें "मी आजपर्यंत केलेल्या अगणित पापांपासून अंशतः तरी मुक्त होण्याला, मला हा एकच उपाय दिसतो आहे. ह्याला तुह्मीं नाहीं ह्मणूं नका."

पैशांची त्यांच्याजवळ खरोखरीच टंचाई असल्याकारणानें क्षेमीच्यानें एकाएकीं नाहीं ह्मणवेना. ती ह्मणाली, "थांबा हां जरा मी निर्मलेला विचारत्यें. निर्मले, अग निर्मले इकडे येऊन जा जरा."

निर्मला येतांच तिला उद्देशून क्षेमी ह्मणाली, "पहा. हे ह्मणताहेत कीं, आपण काशीलाच जावं आणि विनयबाबू सुटून आले कीं, त्यांच्या बरोबरच परत यावं. आणखी त्यांनीं वाटखर्चीसाठीं व इतर खर्चासाठीं हे पैसे आणलेले आहेत."

निर्मला:—आपण कसे घ्यावे त्यांचे पैसे! बाबा असे कर्ज कुणाचे घेत नव्हते.

दुर्लभ:—निर्मलाबाई, दैवयोगानें ह्मणा किंवा कसेंहि ह्मणा, पण तुमच्या हातून मला एकवार जीवदान मिळालेलें आहे. मी तुह्मांला माझ्या मातोश्रीप्रमाणें समजतों. तुह्मीं नाहीं ह्मणूं नका. त्यामुळें मला फार दुःख होतें! मला माझ्या पापाचें थोडेंतरी प्रायश्चित्त घेऊं द्या

क्षे:—ते ह्मणतात तें तरी एकाअर्थी बरोबरच आहे, आणि आपणाजवळ तरी काय आहे आतां खर्चाला ? जगदंबा कालिका माता जेव्हां आपणाला चांगले दिवस दाखवील आणि आपले विनयबाबू परत येतील, तेव्हां त्यांचे पैसे आपण परत करूं.

निर्मला:—पण तसें तरी कशाला हवं मावशे; माझ्या हातांत ह्या सोन्याच्या पाटल्या आहेत, ह्याच विकायला काय हरकत आहे ?

दुर्लभ:—छे, छे, असें भलतेंच अगदीं मनांत सुद्धां आणूं नका. माझी तुह्मांला हात जोडून इतकीच विनंती आहे कीं, तुह्मीं मला परका लेखूं नये. आणि माझ्याकडून होणारें हें अल्प साह्य नाकारूं नये.

यावर दोघींनाहि कांहीं बोलतां येईना. निर्मलेनें आपल्या पाटल्या वेण्याबद्दल पुष्कळ आग्रह केला, परंतु दुर्लभचंद्रानें तें कांहींएक न ऐकतां आणिलेले पैसे त्यांच्या गळ्यांत बांधलेच. त्याच रात्रीं दोघींनीही निघण्याची तयारी केली. दुर्लभचंद्रानें आपला एक मित्र सुरेंद्र यास त्यांजबरोबर पाठविण्याचें ठरविलें. वर सांगितलेल्या एकंदर गोष्टी दुर्लभचंद्रानें आपणाकडून होतां होईल तितक्या गुप्त रीतीनें चालविल्या होत्या. तरीहि गोवर्धनासारख्या महाकारस्थानी व कपटपटू नीचाला त्याचा थोडाबहुत सुगावा लागल्या खेरीज राहिला नाहीं.

क्षेमी व निर्मला त्याच रात्रीं सुरेंद्राबरोबर काशीस रवाना झाल्या.

सर्ग दुसरा समाप्त.

अनङ्ग मोहिनी.

सर्ग तिसरा.

प्रकरण १ लें.

गंगानदीच्या किनाऱ्यावर.

श्लोक—आतां बिनंति करितों तुज एकवार
शोधी मनास करुनी अनुताप फार !
येणें घडेल न पुढें जरि निंद्य कर्म
शर्मास पावशिल, होईल तुष्ट धर्म !

कुसुमाञ्जली.

मागें लिहिल्याप्रमाणें क्षेमी व निर्मला सुरेंद्रबरोबर काशीस निघून गेल्याला दोन महिने झाले. एके दिवशीं प्रातःकाळीं मिर्झापुरापासून जवळच असलेल्या पवित्र गंगानदीच्या तीरावर तिघे इसम बसले होते. त्यांपैकीं एकजण ह्मणाला, 'राय महाशय तें ठिकाण आतां कितीसें दूर आहे ?

राय महाशय ह्मणाले, 'कोणतें ठिकाण ह्मणतां ?'

"ज्या ठिकाणीं आपण आह्मांला घेऊन चाललां आहां तें !"

"मी तुह्मांला घेऊन जांतों आहें ? भलतेंच कांहीं तरी ह्मणतोस ! उलट मीच तुमच्याबरोबर येतों आहें."

"बरें तसें कां ह्मणाना. पण तें ठिकाण आतां खरोखर किती दूर आहे ?"

पण तें ठिकाण ह्मणजे तरी मी काय समजूं? तुह्मांला जायचें कोठें हेंच जर मला माहीत नाहीं, तर मी तें किती दूर आहे हें कसें सांगूं?".

"वाः महाशय, तुह्मांला तरी बतावणी छान करतां येते हो! जसें कांहीं एखाद्याला वाटेल कीं, खरेंच तुह्मांला कांहीं ठाऊक नाहीं. बरें पण महाशय, थट्टा राहूंद्या, आतां अगदीं खरें सांगा, तें ठिकाण किती दूर आहे? आपण तर बोवा चालून चालून अगदीं मेटाकुटीस आलों." पहिला इसम हांसून बोलला.

रायमहाशय कपाळाला किंचित् आंठ्या घालून ह्मणाले, "अरे पण तें ठिकाण ह्मणजे कोणतें? अमुक एक ठिकाण ह्मणून सांगशील, तेव्हां ना तें किती दूर आहे तें मला सांगतां येईल?"

पहिला इसम आश्चर्यचकित होऊन ह्मणाला, "ह्मणजे असें काय विचारतां तुह्मीं आज? थट्टा करतां कीं, खरेंच बोलतां? कीं माझ्याच तोंडून काढण्याचा विचार आहे? तसेंच असलें तर तसें सांगायला हो काय हरकत आहे? आपणाला, घनश्याम बोस यांचा मुलगा नीलांबर, जो दोन तीन वर्षांपूर्वी संन्यासी होऊन विन्ध्याचलावर गेला आहे, त्याला या जगांतून नाहींसा करण्याकरतां त्याच्या राहण्याच्या ठिकाणीं जायचें आहे. आतां तर झालें?"

वरील तिघे इसम कोण होते, हें आतां वाचकांना समजलेंच असेल. त्यांपैकीं एक दुर्लभचंद्र राय व दुसरे दोघे गोवर्धनानें नीलांबराचा खून करण्याकरितां पाठविलेले मारेकरी, गण्या व रुस्तम.

दुर्लभः—काय ह्मणतोस गण्या? तुह्मीं तेथें जाऊन नीलांबराचा खून करणार होय?.

गण्या व रुस्तम, या दोघांनींही बरोबरच उत्तर दिलें, 'होय तर काय?'

दुर्लभः—का बाबा त्यांनी काय असें तुमचें घोडें मारलें आहे? कीं तुह्मीं त्याचा खून करावा? कां गप्प कां राहिलेत? बोला कायतें.

रुस्तमः—त्यांनीं अपराध केला असो अगर नसो. त्याच्याशीं आह्मांला काय कर्तव्य आहे? नायब महाशयांनीं आह्मांला त्याबद्दल पैसे दिले आहेत व आणखी देतीलहि, आणि ह्मणूनच आह्मीं त्याचा खून करणार समजलें?

दुर्लभः—अरे नायबमहाशयांनीं जरी तुह्मांला पैसे दिले असले, तरी तुमच्या हातून हें किती वाईट कृत्य होत आहे याचा तुह्मीं कांहींतरी विचार केला आहे का? निरपराध नीलांबराचा तुह्मीं खून करणार! गरीब दीन दुबळ्यांचा केवळ मायबाप अशा त्या घनश्याम बोसांच्या मुलाला तुह्मीं निष्कारण मारणार? कांहीं विचार करा! या गोष्टीचा तुह्मीं परमेश्वराजवळ जाब तरी काय देणार?

रुस्तमः—अहो असल्या गोष्टींत, पोटाचा प्रश्न आला कीं, परमेश्वर ठेवावा लागतो गुंडाळून! परमेश्वर जर असता तर आमची अशी दशा आज कां बरें झाली असती? मीही एक वेळ जमीदाराचाच पुत्र होतों. आमच्या जवळ धनदौलत, दासदासी वगैरे सर्व कांहीं मुबलक होतें. त्या वेळेस सर्व लोकहि आमची खुशामत करीत असत. परंतु जेव्हां दुर्दैवानें आमची सारी धनदौलत वगैरे नाहींशी झाली, हाताशीं एक पैसाही उरला नाहीं, तेव्हां पूर्वी आमची खुशामत करणाऱ्या सर्व लोकांकडे जाऊन त्यांची मी किती मनधरणी केली, कित्येक वेळां हात जोडून विनंति केली, तरी त्यांपैकीं एकाही हरामखोराला माझी दया आली नाहीं! त्यावेळेस परमेश्वर कोठें होता? शेवटीं पोट जाळण्याकरितां मी एका श्रीमंत विधवेच्या घरीं प्रथम चोरी केली, आणि ती उघडकीस न येतां मला तिचा निश्चिन्तपणें बरेच दिवस उपभोगहि घेतां आला. तेव्हां-

पासून मी हाच धंदा करूं लागलों. इकडे येण्यापूर्वी गोवर्धन महाशयांनीं आह्मांला बरेच पैसे दिले व आतां हें काम करून गेल्यावर आणखी पैसे मिळतील. हीं कामें वाईट आहेत हें आह्मांस समजतें, परंतु आमच्या मागें हें कधींहि न भरणारें पोट लागलें आहे ना? तुमची कोणाची जर इच्छा नसेल तर मी एकटा जाऊन तें काम करून येतों.

दुर्लभः—छे, छे, बाबा असें बोलूं नकोस! आपल्या कमनशीबाचा दोष तूं ईश्वराला लावूं नकोस! तूं फक्त पैशाकरितांच ना नीलांबर बाबूंचा खून करणार? गोवर्धन तुला असे कितीसे पैसे देणार? फार तर चारपांचशें दिले असतील व आणखी चारपांचशें देईल, इतकेंच ना? ह्मणजे तुमच्या प्रत्येकाच्या वांटणीस दर वेळेचे फार तर अडीच अडीचशें येतील! पण मी असें ह्मणतों कीं, मी जर तुम्हांला प्रत्येकीं पांचपांचशें रुपये आतांच दिले तर? मग तुम्हीं हें काम सोडून द्याल का?

रुस्तमः—हो सोडून न द्यायला काय झालें! पण अगोदर पैसे, मग दुसऱ्या सगळ्या गोष्टी.

गण्याः—पण काय हो आम्हांला ह्या कामासाठीं गोवर्धनांनीं जेव्हां ठरविलें, तेव्हां तुम्हींहि तेथें होतां; मग तेव्हांच कां नाहीं तसें बोलला?

दुर्लभः—अरे वेड्या ती वेळ का तसें बोलण्याची होती? त्यावेळीं तसें करणें इष्ट नव्हतें आणि जर तसें बोललों असतों, तर तें तुमच्या लक्षांतहि आलें नसतें.

रुस्तमः—त्याच्याशीं आह्मांला काय करावयाचें आहे ह्मणा; परंतु काय हो? असें करण्याचें तुह्मांला कारण काय?

दुर्लभ:—अरे त्याशीं तुला काय करावयाचें आहे.? तुमचे सारे खटाटोप पैशाकरतां ना? मग ते तुह्मांला मिळाले ह्मणजे झालें! इतराशीं तुह्मांला काय कर्तव्य आहे?

इतकें बोलणें झाल्यावर दोघेहि कांहीं वेळ स्तब्ध बसले. दुलभचंद्राचें वरील बोलणें ऐकून त्यांच्या मनामध्यें जरा चलबिचल झालेली त्यांच्या चेहऱ्यावरून दिसून येत होती. ते दोघेहि विचारांत गढून गेले होते. नंतर थोड्या वेळानें रुस्तम ह्मणाला, 'मी जरा निमाज पढून येतो. मग पाहूं या कसें काय हात तें.' असें ह्मणून तो थोडासा दूर जाऊन जमिनीवर गुडघे टेंकून हात मसरून, व 'अल्लाहो अकबर' असें मोठ्यानें म्हणून निमाज पढूं लागला.

दुर्लभ:—गण्या, तूंहि आतां आपला विचार करून सांग काय तें मला. दोन्ही बाजूंनीं तुमचा काडीमात्र तोटा तर नाहींच. उलट मी सांगतों तसें केल्यास फायदाच आहे.

गण्या:—पण तुम्हीं आम्हांला पैसे केव्हां देणार?

दुर्लभ:—मिर्जापुरास माझा एक अडत्या आहे. त्याच्याजवळून घेऊन मी ते तुम्हांस आजच्या आज देतों. फक्त तेथें जाण्याचीच खोटी, कीं रक्कम तुमच्या हातांत! तुम्हांला काय? फक्त पैसे मिळाल्याशीं कारण. मग काय चलतांना दोघेहि तिकडे?

कांहीं वेळ विचार करून गण्या म्हणाला. 'बरें, आम्हांला पैसे दिल्यावर मग तुम्हीं कोणीकडे जाणार?

दुर्लभ:—तुम्हाला पैसे दिल्यावर, प्रत्यक्ष नीलांबर बाबूकडेच जाऊन त्यांनां ही सर्व हकीकत कळविण्याचा माझा विचार आहे. आणि शक्य तें करून त्यांना परत घरीं न्यायचें. तुम्हांला पैसे मिळाल्यावर पाहिजे तर तुम्हीं परत आपल्या गांवाला जा. अथवा माझ्याबरोबर चला. तुह्मांला वाटेल तसें करा.

गण्या:—बरें मिर्जापुरला तर अगोदर चला. पुढचें पुढें पाहतां येईल.

इतक्या वेळांत रुस्तम निमाज पढून आला. तो म्हणाला, "ठीक आहे, रावसाहेब, तुमच्या म्हणण्याप्रमाणें कां होईना. सध्यां तुमच्या अडल्याकडे चला आणि आमच्या पोटाची व्यवस्था अगोदर लावून टाका. मग पुढें खुदा आहे."

दुर्लभ:—हो, हो, चला. माझ्याकडून थोडीच ना आहे? तुम्हांला जसें ठीक वाटेल तसें.

प्रकरण २ रें.

युवकाचें स्वप्न.

श्लोक—तुला पाहें स्वप्नीं-प्रियतर कसें स्वप्न न गमे?-
उठें टाकीं निद्रा अनिल तयिं वाहे-मन रमे-
विराजे आकाशीं उडुगण तदा उज्वल सये!
....

कुसुमाञ्जली.

विन्ध्याचलाच्या अनेक भयाण पहाडांपैकीं एकावरील एका निर्जन स्थानीं असलेल्या पर्णकुटी समोर एक युवक निजला होता. रजनीनाथ शशांक सुनील स्वच्छ आकाशांत बराच वर आला असून युवकाच्या सुकुमार वदनावर सुधाधारा वर्षण करीत होता. वायू त्याच्या प्रशान्त ललाटाला व जटांभाराला स्पर्श करीत मंद गतीनें वहात होता. मातेच्या मृदु अंकावर ज्याप्रमाणें बालक तिच्या मुखातून निघणाऱ्या अस्फुट गानरवानें थोड्याच वेळांत सुखानें झोंपीं जातें, त्याचप्रमाणें तो युवक आपल्या धरणी मातेच्या

निसर्गसिद्ध मृदुतृणशैय्यारूप अंकावर, जवळच असलेल्या एका लहानशा जलप्रपाताच्या अस्फुट रवानें, निद्रिस्त झाला होता. त्याचें वय पंचविशीच्या आंतच दिसत होतें. ओंठावर नुकत्याच मिशा आलेल्या होत्या. त्याचें ललाट प्रशस्त दिसत होतें. त्यानें आपला सर्व केशभार एकत्र करून मस्तकावर मुकुटाकृती जटा बांधिली होती. एकंदरींत त्याचें मुख तेजःपुंज दिसत होतें. त्यानें एक साधी भगव्या रंगाची कफनी पांघरली होती, व आपला उजवा हात उशाखालीं घेतला होता. त्याच्या अनावृत असलेल्या हस्तपादादि अवयवांवरून त्याची सुदृढ व सतेज अंगकांति स्पष्टपणें दिसून येत होती.

युवक गाढ निद्रिस्त असतां त्याला कांहीं एक स्वप्न पडत असावें, असें त्याच्या मुद्रेवर उठणाऱ्या निरनिराळ्या विकारांवरून स्पष्टपणें दिसत होतें. त्याला स्वप्नांत असें दिसलें, कीं, शुभ्र चंद्रप्रकाशानें सिक्त होत असलेली ही सर्व भूमि, एकाएकीं गाढ अन्धकारानें व्याप्त झाली आहे; नील आकाशातून आपणाकडे प्रेमानें पाहून हास्य करीत असलेला शशांकहि त्यांत विलीन झाला आहे. हा वेळपर्यंत मंद गतीनें वहात असणारा वायु सोंसाट्यानें व गर्जना करीत वाहूं लागला आहे, व त्यानें चोहोंकडे एकच हलकल्लोळ उडवून दिला आहे. मत्त हत्तींच्या कळपाप्रमाणें आकाशांत चोहोंकडे इतस्ततः भ्रमण करणारे मेघ भीषण ध्वनी करून दिग्मंडळ कंपायमान करीत आहेत. इतक्यांत एक क्षणभर त्या सर्व अन्धकाराला विच्छिन्न करून सौदामिनीनें, आपल्या उज्वल प्रकाशानें डोळे दिपवून टाकिले. क्षणार्धांत तिच्या उज्वल रेषेमधून एक तेजःपुंज दैदिप्यमान पुरुष मूर्ति प्रकट झाली! तिच्या त्या प्रशान्त व वात्सल्यपूर्ण मुखाकडे अवलोकन करितांच, सन्यासी युवकाला अत्यंत संतोष झालासें दिसलें.

ती व्यक्ती अंतरिक्षांतून हळू हळू खालीं युवकाकडे येऊं लागली; व त्याच्या अगदीं जवळ येऊन म्हणाली "वत्सा, तूं अशा रीतीनें एकाएकीं या निर्जन प्रदेशांत येऊन कां बरें वास्तव्य केलेंस? विधात्यानें आपलें पूर्ण कौशल्य खर्च करून उत्पन्न केलेल्या, व आनंदमय अशा ह्या मानवनिकेतनाचा त्याग करून, तूं ह्या हिंस्रपशूंच्या सन्निध येऊन कां बरें राहिलास?"

नीलांबरानें ती तेजःपुंज प्रीतिमय मुखाकृती, व वात्सल्यपूर्ण परंतु गंभीर असा कंठरव तात्काळ ओळखला. त्या गंभीर कंठरवाचा त्याच्या मनावर परिणाम झाल्याविना राहिला नाहीं. तो हात जोडून त्या व्यक्तीला उद्देशून म्हणाला "बाबा! बाबा! मी घोर अन्धकारांत पतित झालों आहें! मला वर काढा! माझा उद्धार करा, आणि मला तुमच्या पायापाशीं त्या दिव्य धामाला घेऊन चला हो!"

"वत्सा, तुझ्या मनामधें काय आहे तें मी जाणलें. परंतु, तुझें मन अद्याप स्थिर झालें नाहीं; तुझें आयुष्य अद्यापि स्थिर झालें नाहीं; तें तूं कर. तूं नीट रीतीनें संसार कर. त्यांतच तुला अमित सुखप्राप्ति होऊन तुझें आयुष्य व मनहि स्थिर होईल. नंतर तूं चिरसुखप्राप्तीसाठीं प्रयत्न कर, म्हणजे ती तुला सहज प्राप्त होईल. तुझ्या मनाची अस्वस्थता—कांचणी तूं संसारांत शिरून दूर करून टाक; आणि इहपरलोकीं सुखप्राप्ति करून घे." वरील अधिकारयुक्त वाणीनें उच्चारलेले शब्द ऐकून, नीलांबराला अत्यंत आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, "छें, छे,! बाबा, असें कसें होईल? मी आतां संसार करूं? त्यांतला दीप तर केव्हांच मालवला! माझ्या दृष्टीनें तो आतां केवळ अंधकारमय आहे! त्यात राहून मला शान्ति कशी मिळणार?"

त्या व्यक्तीनें पूर्ववत् स्नेहार्द्र स्वरानें व किंचित् हास्यमुख करून उत्तर दिलें, "वत्सा तुला भ्रम झाला आहे! तूं माझ्या शब्दांवर विश्वास ठेव. संसारांत जाऊन पहा! हा पहा आकाशस्थ उज्वल दीप पुन्हां प्रकाशमान झाला! असाच तुझा संसारांतील दीप तुला परत मिळेल! माझा तुला पूर्ण आशिर्वाद आहे."

एकाएकीं ती व्यक्ती नाहिंशी झाली. तिनें जाण्यापूर्वी वर दाखविल्याप्रमाणें आकाशस्थ दीप–चंद्र–पुन्हां दिसूं लागला. सन्यासी युवक खडबडून उठून बसला. वसुधा पूर्ववत् चंद्रप्रकाशानें सिक्त होत असलेली व गंभीर रूप धारण केलेली अशीच त्याला दिसली. तिनें मध्यंतरी धारण केलेलें भीषण स्वरूप पार नाहिंसें झालें! युवक मोठ्या बुचकळ्यांत पडला. आपण नुक्तेंच जें कांहीं पाहिलें तें सर्व स्वप्नच किंवा खरी गोष्ट! त्याला पुनः पुन्हां भ्रम होऊं लागला. तो मनांत म्हणाला, 'काय? तुझा दीप तुला परत मिळेल! याचा अर्थ काय? माझी प्रिया अद्याप जिवंत आहे?" त्या व्यक्तीनें जातांना उच्चारिलेले शब्द, त्याच्या कानांत अद्यापि गुणगुणत होते. त्याची झोंप उडाली. तो पूर्ववत् आपल्या तृण-शय्येवर पडला. परंतु त्याच्या मस्तकांत शेंकडों परस्परविरोधी विचारांनीं काहूर करून सोडिलें होतें!

त्याला कांहीं वेळानें, कोणी तरी, "हे प्रभो! नाथ! आपण कुठं आहां! एकवार तरी या दीन दासीला दर्शन द्या हो!" अशी करुणार्त स्वरानें हांक मारिलेली ऐकूं आली. युवक मनांत म्हणूं लागला "अरे हें काय? हा कण्ठरव कोणाचा! माझ्या प्रिय अनङ्गमोहिनीचा हा अमृतोपम कण्ठस्वर या ठिकाणीं कोठून बरें ऐकूं येत आहे?" इतकें बोलून तो चोहोंकडे न्याहाळून पाहूं लागला,

क्षणांत तो स्वर विलीन होऊन गेला: तो त्याला पुन्हां ऐकूं आला नाहीं. परंतु किंचित्कालानें, पूर्वीच्या इतकाच प्रिय असा

आपल्या धाकट्या भावाचा स्वर त्याला ऐकूं आला! युवक एकदम रोमांचित होऊन उठून उभा राहिला; व म्हणाला 'ये, ये बाळ विनोद हा बघ मी इकडे आहें.'

तो उठून उभा राहतांच त्याचा भ्रम नाहींसा झाला. त्याचाच आवाज़ प्रतिध्वनित झालेला त्याला ऐकूं आला. त्यानें नीट डोळे उघडून पाहिलें; रत्नखचित पटाप्रमाणें शोभणाऱ्या नील आकाशांत, चंद्र अगदीं मध्यावर आला होता. वाराहि पूर्वीपेक्षां किंचित् थंडसा वाहूं लागला होता. जवळ असलेल्या ओढ्याचा खळखळाट पूर्ववत् ऐकूं येत होता. युवक मनांत म्हणूं लागला, "आं? आतां मी जें पाहिलें, तें सर्व स्वप्नच एकूण! माझ्या परम पूज्य पित्याची देववाणी व प्रिय बंधूचा व पत्नीचा कण्ठस्वर मी जो थोड्या वेळापूर्वी ऐकला, तेंहि स्वप्नच? माझी प्रियभार्या अद्याप जिवंत आहे! छे, तें केवळ स्वप्नच! ती तर चार वर्षांपूर्वींच या पापलोकाचा त्याग करून स्वर्गलोकीं निघून गेली. आणि माझ्या प्राणांपेक्षांहि प्रिय विनोदाची स्थिति काय असेल! म्यां दुष्टानें आजपर्यंत त्याची कांहींच विचारपूस केली नाहीं! पण बाबांनीं तरी मला पुन्हां संसारांत जाण्याविषयीं इतक्या आग्रहानें सांगण्याचें कारण काय असावें? त्यांची देववाणी मिथ्या कशी असूं शकेल?"

युवक एकसारखा विचार करूं लागला. त्याची प्रियभार्या अनङ्गमोहिनी हिची पावित्र्यपूर्ण, स्नेहपूर्ण मूर्ती व प्राणाहूनहि प्रिय अशा आपल्या कनिष्ठ बंधूची असहाय दीन मुद्रा त्याला वारंवार नजरेसमोर दिसूं लागली. तशाच स्थितींत तो पुन्हां भूमीवर पडून राहिला. बराच वेळ अशा स्थितींत गेल्यावर थंड वाऱ्याच्या झुळ-केनें त्याला झोंप लागली. कांहीं वेळानें त्याच्या पायाला कोणी स्पर्श केला असें त्याला वाटलें. तो तात्काळ उठून बसला, तों आपलें पादवंदन करीत असलेली एक व्यक्ती त्याच्या नजरेस पडली.

युवकानें विस्मयानें विचारिलें, आपण कोण आहां? या ठिकाणीं कशाकरितां आलां आहां? माझें पादवंदन कां करतां?' आगन्तुक व्यक्ती कांहींच उत्तर न देतां हात जोडून खालीं पहात उभी राहिली.

प्रकरण ३ रें.

नीलांबर व विनोद.

वाचकांनीं मागील प्रकरणांत आलेली व्यक्ति कोण हें जाणलेंच असेल. ती व्यक्ति म्हणजे आपले दुर्लभरायच होत. त्याच्या अंतःकरणाची आतां पूर्णपणें 'पश्चात्तापानें शुद्धि' झाली होती. त्यानें मागें सांगितल्याप्रमाणें त्या संन्यासी युवकाच्या उर्फ नीलांबराच्या पायांवर मस्तक ठेविलें व अथपासून इतिपर्यंत सर्व हकीगत त्याजवळ ओकून नम्रतापूर्वक त्याची क्षमा मागितली. नीलांबरानेंहि ती केली.

पुढें दुर्लभरायानें त्याची पुष्कळ विनवणी करून व आग्रह करून त्यास अशोकपुरीं परत चलण्यास सांगितलें. नीलांबरानें हें मान्य केलें, परंतु पहिल्या प्रथम अशोकपुरीं न जातां, कलकत्त्यास जाऊन तेथून अगोदर तिकडची सर्व कांहीं व्यवस्था करून नंतर कैलासभवनांत जावयाचें असें ठरविलें.

वरील हकीगतीनंतर तीन दिवसांनीं कलकत्त्यास भाड्यानें घेतलेल्या एका लहानशा बंगल्यांत नीलांबर व दुर्लभराय यांचें खालीं लिहिल्याप्रमाणें संभाषण चाललें होतें.

दुर्लभरायः—पोलीस कमीशनर साहेबांनीं आपणाला पाहिल्याबरोबर ओळखलें, तर मग!

नीलांबरः—माझ्या संन्यासी वेषाला पाहून ते पहिल्याप्रथम चकित झाले, परंतु ताबडतोब त्यांनीं मला ओळखलें खरें. बाबा

वारल्यानंतर त्यांची माझी चार पांच वेळां भेट झाली होती. त्यानंतर ते दुसऱ्याच डिस्ट्रिक्टला बदलून गेले होते, ते हल्लीं नुक्तेच इकडे आले आहेत.

दुर्लभराय:—बरं पण त्या दिवशीं त्यांच्या संभाषणांत विशेष निष्पन्न काय झालें ?

नीलांबर:—मी त्यांना तुमच्याकडून जशी कळली होती तशीच सर्व इत्थंभूत हकीगत सांगितली. तुमच्याबद्दलहि सांगितलें तें त्यानां अगोदर खरें वाटलें नाहीं; पण कांहीं वेळ विचार करून नंतर ते म्हणाले कीं, 'दुर्लभरायांनां समक्ष माझी भेट घ्यायला सांगा. त काय म्हणतात तें मी सर्व ऐकून घेईन आणि मग त्यांना कायद्या-प्रमाणें मुकद्दम्याचे प्रधानसाक्षी करीन; मात्र ती सर्व हकीगत त्यांनीं कोर्टांत शपथेवर सांगितली पाहिजे. गव्हर्नर साहेबांजवळ मी त्यांच्याबद्दल रदबदली करीन. वेड्यांच्या इस्पितळांतून तुमच्या धाकट्या बंधूची सुटका होण्याला आतां कांहीं हरकत पडणार नाहीं. तुम्ही अगदीं निश्चिन्त असा. विनयकृष्णाच्या सुटकेबद्दल आजच मी गव्हर्नरसाहेबांचा लेखी परवाना घेतों—' साहेबांचे याबद्दल मी पुष्कळ आभार मानले. तेव्हां ते पुढें म्हणाले, 'तुमच्या वडिलांचा व माझा फार स्नेह होता. अनेक वेळां ते माझ्या फारच उपयोगी पडले आहेत. मध्यंतरीं माझी दूर बदली झाल्यामुळें तुमच्याविषयीं कांहींच कळलें नव्हतें. आतां तुमचें हें काम करणें माझें कर्तव्यच आहे असें मी समजतों.'

दुर्लभराय:—मला तर मग त्यांना समक्षच भेटलें पाहिजे म्हणतां ? विनोदबाबू आजच सुटणार एकूण ?

नीलांबर:—होय आजच. कमिशनर स्वतः गेले म्हणजे तिथें रसुल उशीर ?

दुर्लभराय:—तर मग मी आतांच जातों. त्यांची भेट घ्यायला तुह्मीं इथेंच असा. विनोदबाबू तितक्यांत सुटले तर त्यानांहि बरोबर घेऊन येतों. आपल्या बेतांपैकीं गोवर्धनाला एक अवाक्षरहि कळूं न देता बाईसाहेबानांहि अशोकपुराहून येथें लवकरच आणवूं.

त्याच दिवशीं सायंकाळीं विनोदाला सोडण्याविषयींचा लेखी परवाना घेऊन दुर्लभचंद्र वेड्याच्या इस्पितळांत गेला. त्याजबरोबर कमिशनरनें आपला एक गोरा ऑफिसरहि दिला होता. त्या ठिकाणीं जाऊन हॉस्पिटलवरील अधिकाऱ्यास तो परवाना दाखवितांच त्यानें आपला एक सार्जंट बरोबर देऊन त्यास आंत पाठविलें. आंत शिरतांच बाजूच्या खोल्यांतून असलेले अनेक वेडे त्यांच्या नजरेस पडले. त्यांच्यापैकीं एकजण दुर्लभराय व तो गोरा ऑफिसर यांना पाहून मोठ्यानें हांसून ह्मणाला "Good mornig Mr. mouse" त्याचा मोठा आवाज व हास्यध्वनि ऐकून दुसरेहि कांहीं वेडे बहेर आले व ह्या दोघांकडे पाहून मोठमोठ्यानें "Good morning Mr. mouse," "Good morning Mr. mouse" असें ओरडूं लागले. दुसरा एक ह्यानां पाहून मोठ्यानें टाळ्या बाजवून हांसूं लागला. त्याचें अनुकरण सर्वांनींच केलें व चोहोंकडे टाळ्यांनां व हंशाला ऊत आला. दुसऱ्या एकानें त्या गोऱ्याच्या तोंडाकडे पाहिलें व आपल्या डाव्या हाताचीं बोटें कपाळावर ठेवून व अंगठ्यानें नाक वर करून तोंड वासलें व त्यास वेडावूं लागला. एक दुर्लभरायाकडे पाहून 'धर धर—मार मार' असें ओरडला, त्याबरोबर बाकीच्या सर्वांनींहि 'धर'—'मार' असें ओरडण्यास सुरुवात केली व हातापायांतील बिड्यांच्या आवाजानें तेथें एकच गलगा झाला. मात्र त्यांच्यांवर नेहमीं देखरेख करणाऱ्या एका अमलदारानें येऊन त्यानां दरडावतांच सर्व गप्प झाले! इतके-

शेवटीं बरोबर आलेला सार्जेंट त्यानां एका बाजूस असलेल्या एका खोलींत घेऊन गेला. त्याठिकाणीं—त्या गजाच्या खोलींत—एक मुलगा हातावर गाल टेंकून खिन्नमुद्रेनें जमिनीवर बसला होता. त्याच्या डोळ्यांतून अश्रु वहात होते ! एक हिंदु व त्याबरोबर दोन गोरे आंत आलेले पहातांच तो उठून उभा राहिला. दुर्लभरायानें त्याला उद्देशून ह्मटलें, " विनोदबाबू, मला ओळखलेंत का ? "

विनोदः—होय ओळखलें. आतां मला आणखी कोणीकडे नेण्याकरितां आलां आहां तुह्मीं ? वध्य भूमीकडे ? चला हा मी एका पायावर तयार आहे. तेवढेंच शिल्लक आहे आतां. ह्याच्या अगोदरच कां बरें तुह्मीं मला मारून टाकलेंत नाहीं ? हे जाच मला आतां अगदीं असह्य झाले आहेत !

दुर्लभरायानें पुढें होऊन विनोदाला पोटाशीं धरलें व ह्मणाला, " छे छे ! विनोदबाबू, या पुढें आतां बिलकूल तसें मनांत आणायला नको. आजपासून तूं येथून मुक्त झालास बरें ! अरेरे, ह्या कोमल देहाला आजपर्यंत किती कष्ट सहन करावे लागले ! चल, बाळ आतां आपण तुमच्या घरीं जाऊं ! "

विनोदः—कोणीकडे घेऊन जातां मला ?

दुर्लभरायः—तुमच्या स्वतःच्याच घरीं, तुमचे दादा व वहिनी आहेत त्या ठिकाणीं—

विनोदः—अद्यापहि मजजवळ तुह्मीं बतावणी करतांच आं ? माझे दादा मला टाकून स्वर्गवासी झाल्याला आज कित्येक दिवस लोटले अन् आज तुह्मीं मला त्यानां भेटवणार ! ठार मारून कीं काय ?

दुर्लभ०:—छे. छे; विनोदबाबू, आतां तसें अगदीं मनांत आणूं नका. मी अगदीं खरें सांगतों. तुमचे दादा जिवंत आहेत. ते इतके दिवस दूर देशीं गेले होते. आतां परत आले आहेत. चला.

एका कवीनें झटलें आहे कीं–

बालः पायसे दग्धः दधिअपि फूत्कृत्य भक्षयति ॥

" उष्ण दुधानें ओंठ भाजल्यावर बालक दहिं सुद्धां फुंकून खाऊं लागतें" विनोदानें अत्यंत हाल सोसले होते व दुर्लभचंद्राच्या मागील आचरणाची त्यास विस्मृति पडणें शक्य नव्हतें, त्यामुळें त्याच्या सांगण्यावर विनोदाचा एकदम विश्वास बसेना. पण दुर्लभरायानें कालीमातेची शपथ घेतल्यावर विनोदास कांहींशी खात्री वाटून तो त्या त्रिवर्गांबरोबर बाहेर पडला. बरोबर असलेले दोघेहि गोरे अंमलदार आपआपल्या ठिकाणीं निघून गेले, व दुर्लभराय विनोदासहित नीलांबराकडे त्वरेनें निघून आला. नीलांबराची व विनोदाची दृष्टादृष्ट होतांच विनोदानें एकदम धांवत जाऊन नीलांबराच्या कमरेस विळखा घातला. त्याचें रडें त्याला मुळींच आवरेनासें झालें ! नीलांबरानें त्याला आपल्या पोटाशीं आवळून धरिलें व त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले. प्रेमपूर्वक विनोदाच्या तोंडावरून हात फिरवून नीलांबर झणाला, " बाळ विनोद, मी आलों ना; आतां कशाला रडतोस ?"

विनोद झणाला, " दादा, कुठें हो इतके दिवस टाकून गेला होतां मला तुह्मीं ? इतके आमच्यावर रागवायला असा अपराध तरी काय घडला होता आमच्याकडून ? माझ्या वहिनीला अन् मला किती कष्ट सहन करावे लागले ! दादा, वहिनी कुठें आहे ? कशी आहे ? चला तिच्याकडे आत्तां"

नीलांबरानें उत्तर केलें, "खुशाल आहे बरं ती. मी आज अशोकपुरास जाऊन इकडेच घेऊन येतो तिला. "

प्रकरण ४ थें.

पुनर्मिलन.

श्लोक (स्रग्धरा).

बाष्पानें कंठ दाटे सकल तनुवरी क्षिप्र रोमांच थाटे ॥
शोकाचा सिंधु आटे त्वरित परम तद्दर्शनीं लोभ वाटे ॥

(मोरोपंत–कृष्णविजय.)

भाद्रपद महिन्यांतील एक रात्र होती. सर्व आकाश अभ्राच्छादित झालें होतें. चोहोंकडे डोळ्यांत बोट घातलें तरी दिसणार नाहीं असा काळोख पडला होता. मधेंच एखादवेळ वीज चमकून डोळे दिपत, परंतु त्यामुळें अंधार पूर्वी पेक्षांहि अधिक भासे. गार व किंचित् सोंसाव्याचा वारा वहात होता व मध्यें मध्यें झिम् झिम् पाऊसहि पडत होता. अशोकपुरांत यावेळीं सर्वत्र अगदीं सामसूम झालें होतें, व सर्व लोक गाढ झोंपेंत होते. बोसांच्या वाड्यांत अनङ्गमोहिनीच्या खोलींत दिव्याचा मंद प्रकाश पडला होता. अनङ्गमोहिनी आपल्या पलंगाजवळ जमिनीवरच निजली होती. ती निजली होती असें ह्मणण्यापेक्षां नुसती पडली होती असें ह्मट-ल्यास विशेष शोभेल. दुष्ट गोवर्धनाच्या औषधानें तिची बहुतेक वेड्यासारखीच अवस्था झाली होती. वामेकडून दुर्लभरायानें तें औषध तिच्या पोटांत अधिक न जाण्याची वेळींच गुप्तपणें व्यवस्था केली होती व त्याचें मारक औषधहि देवविलें होतें तरीहि जें कांहीं अगोदर गेलें होतें तितक्यानेंच तिची ही स्थिति झाली होती! ती मधून मधून आपल्या-शींच कांहीं बडबडत होती.तिच्या पायाशीं तिची दासी वामा ही बसल्या बसल्याच मागील भिंतीला टेंकून डुलक्या घेत होती. ती एकाएकीं जागी झाली तों दरवाजावर कोणी तरी थाप मारून हांक मारलेली

तिला ऐकूं आली. तो मधुर व गंभीर आवाज इतक्या दिवसांनीं सुद्धां वामेनें ओळखला. तिनें ताबडतोब उठून दिवा मोठा केला व खोलीचें दार उघडलें. बाहेर नीलांबरास पाहतांच तिनें त्यास ओळखलें, परंतु त्याला पाहून तिला फार आश्चर्य वाटलें. नीलांबरानें गंभीर स्वरानें वामेला विचारिलें, "वामे, अनङ्ग कोठें आहे ?"

वामेनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. तिनें धांवतच अनङ्गमोहिनी जवळ जाऊन ह्मटलें, "उठा उठा, बाईसाहेब लवकर! पर्वा देवीनें स्वप्नांत दिलेला दृष्टांत खरा झाला! हे पहा धनीसाहेब आले आहेत!"

अनङ्गमोहिनी कांहींच उत्तर न देतां वामेकडे फक्त डोळे उघडून पाहूं लागली. ती कांहींच बोलत नाहीं असें पाहून वामेनें तिचे दोन्ही हात धरून तिला उठविलें व पलंगावर बसवून ह्मणाली, "बोलत कां नाहीं आपण ? समोर पहा तर खरं कोण आलं आहे तें ?"

यावर अनङ्गमोहिनी त्रासानें ह्मणाली, "कोण ग तूं ? कां मला उगीच हांका मारून त्रास देतेस ? कोण, वामे ? जळं तुझं तोंड तें; मरेनास का तिकडे बाहेर जाऊन!"

नीलांबर इतक्यांत पुढें आला. वामा खोलीबाहेर निघून गेली. नीलांबरानें अनङ्गमोहिनीला हलकेंच ह्मटलें, "अनङ्ग—"

अनङ्गमोहिनी ह्मणाली, "अनङ्ग ? कोणाला, मला ह्मणतां ? मला अनङ्ग ह्मणणार तुह्मी कोण ? मी कोण आहे तुह्मांला ठाऊक नाहीं ? मी कोणाची स्त्री आहे ? कोणाची सून आहे ? माझे मामंजी स्वर्गाचे राजे आहेत! माझे पति स्वर्गांत महेन्द्राच्या सिंहासनावर विराजमान् झालेले आहेत! अन् तुह्मी मला 'अनङ्ग' ह्मणून हांक मारतां ? हाय! किती ही शरमेची गोष्ट! केवळ एका साधारण मनुष्यानें येऊन मला अनङ्ग ह्मणावें! त्यांनीच फक्त

मला तसें ह्मटलें तर मला गोड वाटेल. मला ह्या नांवानें हांक मारण्याला तुमचा जीव धजला तरी कसा ? ”

नीलांबरः—अनङ्ग प्रिये, मला तूं अद्याप ओळखलें नाहींस का ?

अनङ्ग (किंचित् त्रासून):—कोण तुह्मी ? मी तुह्माला काय ह्मणून ओळखावं ? माझ्याकडे पाठवलं तरी कुणी तुह्माला ? अन् हें तिकडच्यासारखं गोड आवाजानं मला ‘ अनङ्ग ’ म्हणायला तरी कुणाकडून शिकलांत ? मी वेडी तर झाल्येंच आहे, पण मला आणखी वेड लावायला कुणी पाठवलं तुह्माला इथं ?

नीलांबरः—अरेरे, अनङ्ग, माझी अझूनहि तुला ओळख पटत नाहीं अं ? मी नीलांबर आहें ! मीच तुझा पति नीलांबर !

अनङ्गः—माझे पति ! माझे पति तर स्वर्गांत ! ते तर इथून किती तरी दूर आहेत ! स्वर्गांत गेलेलं माणूस का कुठं पृथ्वीवर परत येत असतं ?—पाहूं ?

अनङ्गमोहिनी उठून नीलांबराच्या तोंडाकडे निरखून पाहूं लागली व म्हणाली, “ माझे पति ! छेः खोटी गोष्ट ! तुम्ही माझे पति असतां तर इतका वेळ असे दूर राहिलांच नसतां. अन् तसं असतं तर तुम्ही आपल्या त्या कोमल हातांनीं मला केव्हांच आपल्याजवळ घेऊन आलिंगन दिलं असतं ! छेः खोटी गोष्ट ! ”

नीलांबर हळुहळु पुढें आला व शांत चित्तानें परमेश्वरस्मरण करून अनङ्गमोहिनीच्या मस्तकाला त्यानें स्पर्श केला. विजेचा स्पर्श होतांच जशी सर्वांगांत एक प्रकारची चेतना उत्पन्न होते व धक्का बसतो तद्वतच अनङ्गमोहिनीला झालें. तिनें पुन्हां एकवार नीलांबराकडे निरखून पाहिलें व ह्मटलें, “ काय ? मी हें स्वप्न तर पहात नाहीं !”

नीलांबरानें आपले दोन्ही हात तिच्या मानेभोंवती टाकिले व तिला जवळ घेऊन प्रेमपूर्वक आलिंगून त्यानें तिचें मुखचुंबन

केलें. अनङ्गमोहिनीचें सर्वांग रोमांचित झालें. आपल्या पतीच्या पवित्र हस्तस्पर्शानें तिची बुद्धी पुन्हां ठिकाणावर आली. तिला समजून चुकलें कीं आपला पति खरोखरच परत आला आहे व या वेळीं त्याच्याच बाहूंमध्यें आपण प्रेमपुरःसर बद्ध आहों! तिच्या अंगांत नवीनच चैतन्याचा प्रादुर्भाव झाला!

अनङ्गमोहिनीनें पुनः एकवार नीलांबराकडे प्रेमपूर्ण दृष्टीनें पाहिलें व नंतर तिनें त्याच्या बाहूंतून आपणास बळेंच सोडवून घेऊन व दूर उभें राहून किंचित् रोषानें ह्मटलें, "आपण किती बरें निष्ठुर! मी असा आपला अपराध तरी काय केला होता? या हृदयांतील रक्तानें मी आजपर्यंत आपली पूजा केली! त्याचीच फेड का हीं? आपण जिवंत असून, ह्या जगावरच असून अन् या चार वर्षांत इकडची आठवण सुद्धां झाली नाहीं आं? आतां मला स्पर्श सुद्धां करूं नका, अन् मला अनङ्ग असं सुद्धां ह्मणूं नका! मी आजपर्यन्त आपली एकाद्या देवतेप्रमाणें पूजा करीत आल्यें पण मला ठाऊक नव्हतं कीं आपण इतके निर्दय असाल! माझी एक गोष्ट राहूं द्या, मी तर अभागीच आहें. परंतु आपल्या भावाची तरी,—आईबापांविरहित लहान पोरक्या भावाची तरी,—आठवण ठेवायची होती! त्याचा तरी असा काय अपराध घडला होता कीं, आपण त्याला त्या दुष्ट वाघाच्या जबड्यांत सोडून चालतं व्हावं. आतां चार वर्षांनीं हीं भगवीं वस्त्रं परिधान करून कशाला यायचं इथं? धिक् तुमचें संसारवैराग्य व संन्यास धर्म!"

नीलांबरः—बरें आतां काय त्याचें. झालें तें झालें. तीं सर्व हकीगत तुला समजली म्हणजे ते सर्व अपराध माझे नव्हते हें तुला कळून येईल.

इतकें बोलून नीलांबर आपले बाहू पसरून अनङ्गमोहिनीला आलिंगन देण्याकरितां पुढें झाला. तों तिनें दूर होऊन म्हटलें,

"दूर व्हायचं; आतां मला स्पर्श करण्याचा आपला अधिकार उरला नाहीं! आपण संन्यासी, संसारत्यागी भगवीं वस्त्रें परिधान करणारे तपस्वी; अन् मी राजराजेश्वरी, राजकुलवधू! खरं ना? मग आतां मीहि पण आपल्यासारखी तपस्विनी होऊं का? नाहीं तरी इतके दिवस तसेच काढले तर काय? आपण जिवंत असूनहि मला हीं गेलीं चार वर्षे एकाद्या विधवेसारखीं काढावीं लागलीं त्याचं कांहींतरी मेलं मनाला वाटायचं होतं!"

असो, याप्रमाणें आणखी बराच वेळ त्या फारां दिवसांनीं भेटलेल्या प्रणयी दांपत्याचें संभाषण झालें, व नंतर नीलांबरानें अनङ्गमोहिनीला सविस्तर हकीगत सांगून ह्मटलें, "आतां मी जातों. त्या नीच गोवर्धनाची सर्व व्यवस्था करून एक दोन दिवसांतच तुला कैलासभुवनांत घेऊन जाईन. तोंपर्यंत तूं दम धरला पाहिजेस." नंतर तिची परवानगी घेऊन नीलांबर परत आपल्या ठिकाणीं निघून गेला.

प्रकरण ५ वें.

विनयकृष्णाची मुक्तता.

साकीः—होतिस सखये! विश्वासाची गृहिणी चतुर हुषार,
संकटकालीं दिलीस मसलत मजला हितकर फार ॥ १ ॥
भेटशील तूं पुन्हा कदाचित् ऐसी होती आस
आजि प्राणेश्वरि! परि गेली समूल ती विलयास ॥ २ ॥
(पद्यमंजरी)

दुर्लभचंद्रराय याचा स्वभाव पापभीरु होता असें मागें सांगितलेंच आहे. दुष्ट गोवर्धनाच्या संगतीनें व धनलोभानें त्याची

पापाकडे कांहींशी प्रवृत्ति झाली होती खरी, परंतु आपल्या उपकारकर्त्या निर्मलेविषयीं त्याच्या हातून घडलेलें पातक त्यास कळून येतांच त्यास फार दुःख वाटलें, व त्याच्या मनास उपरति झाली! पुढील हकीगत वाचकांस ठाऊक आहेच. दुर्लभराय व नीलांबर कलकत्यास आल्यानंतर दोन दिवसांतच विनोदाची सुटका झाली. विनयकृष्णाच्या मुक्ततेविषयीं व गोवर्धनाच्या पुढील व्यवस्थेविषयीं खटपट चालू होती. असत्कृति करणाऱ्यांच्या मनांस आंतून कशी कांचणी लागलेली असते व सत्कृत्य करतांना मनास शांति व आनंद यांचा लाभ कसा होतो हें आतां दुर्लभरायाच्या चांगलें ध्यानीं आलें होतें. आतां सर्व गोष्टी सुरळीत जमवून आणण्यास आपण अविश्रांत खटपट करूं तरच आपण पूर्वीच्या पापांतून कांहींसे मुक्त होऊं असें त्याच्या मनानें घेतलें होतें.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें नीलांबर अशोकपुरास जाऊन परत येईपर्यंत दुर्लभरायानें पुन्हा एकदां त्या दयाळू कमिशनरची भेट घेतली. विनयकृष्णाच्या मुक्ततेविषयीं परवाना मिळाला होता व आजच त्याची सुटका होणार होती. नीलांबर बाबू परत आल्यावर दुर्लभरायानें सर्व हकीगत त्यांस सांगितली. दुरात्मा गोवर्धन घोषाल सध्यां दिनाजपुरास कांहीं कामाकरितां गेला होता. त्याचा काल सध्यां फिरला असल्यामुळें जमिनीसंबंधी एक खटला उत्पन्न होऊन त्यांत त्याचें फार नुकसान होईलसें दिसूं लागलें. हा खटला आपल्या बाजूचा व्हावा म्हणून दिनाजपूरच्या न्यायाधिकारी वगैरे लोकांजवळ कांहीं द्रव्यप्रयोग करण्याच्या खटपटींत गोवर्धन गुंतला होता. गोवर्धन ज्याकडे उतरला होता तो दुर्लभरायाचा परम मित्र होता. त्याच्याकडून दुर्लभरायास सर्व हकीगती कळत. दुर्लभरायानें आपल्या मित्रास गोवर्धनाच्या हालचालीवर नजर ठेवण्यास लिहिलें होतें व कमिशनर-

कडून गुप्त पोलीसांनां या बाबतींत हुकूम देवविला होता. आतां गोवर्धनाविषयीं असें ठरलें होतें कीं, नीलांबर वगैरे मंडळींनीं एकदम अशोकपुरास जावें व तेथून गोवर्धनास पकडण्यासाठीं ताबडतोब हुकूम पाठविण्याची व्यवस्था करावी. तोंपर्यंत गोवर्धनास या बाबतींत कांहींही न कळूं देण्याची चोख व्यवस्था दुर्लभरायानें करविली होती. कैलासभवनांत व अशोकपुरास गोवर्धनानें आपले पुष्कळ हस्तक करून ठेवले होते; पण ते सर्व द्रव्यानें वश केलेले, गुणानें नव्हते. सर्व संपत्तीचा मालक नीलांबर परत आला असतां व गोवर्धनाचा आतां काल फिरला हें स्पष्ट दिसत असतां, गोवर्धनास साह्य करील असा त्यांत कोणी नव्हता. गोवर्धनास अचानक पकडून आणल्यानंतर कैलासभवनांत स्पेशल दरबार भरवून पोलीस कमिशनर ल्यांबर्ट्साहेब यांच्यासमोर त्याची चौकशी व्हावी असें ठरलें होतें. नीलांबरास हें पसंत नव्हतें. पोलीसांनीं गोवर्धनास पकडल्यांनंतर साक्षीपुरावे होऊन कोर्टांत जें काय होईल तें त्यास होवो असें त्याचें मत होतें. पण 'योगिवर' ह्मणून अशोकपुरांत मिरवणाऱ्या गोवर्धनाचें सत्य स्वरूप लोकांस स्पष्टपणें समजावें ह्मणून तर दुर्लभरायानें वरील सर्व व्यवस्था करविली होती, आणि दुर्लभरायाच्या मदतीनेंच बहुतेक गोष्टी होत असल्यामुळें मग नीलांबरानेंहि वरील व्यवस्था मान्य केली.

आज विनयकृष्ण सुटून येणार होते; त्यांस आणण्यासाठीं दुर्लभराय बंदरावर जाण्यास निघाला होता, पण इतक्यांत त्यास मागील हकीगतीचें स्मरण झालें, व विनयकृष्णाचा आतां आपणावर विश्वास बसणार नाहीं हें जाणून त्यानें नरेंद्रदत्त ह्मणून आपल्या एका विश्वासू स्नेह्यास नीलांबराच्या वतीनें बंदरावर पाठविलें. त्याजबरोबर विनयकृष्णासाठीं नवे कपडे वगैरेहि दिले होते.

नीलांबर बाबू व इतर मंडळी आतां विनयकृष्ण व नरेंद्र यांच्या येण्याची एकसारखीं मार्गप्रतिक्षा करीत होती. कांहीं वेळानें नरेंद्रदत्त एकटाच परत आला व सांगूं लागला कीं, विनयकृष्ण आजच्या आगबोटीनें आले आहेत. त्यांच्याकरितां नेलेले कपडे वगैरे मी त्यांना दिले, परंतु इकडे येण्याला ते मुळींच कबूल झाले नाहींत मी त्यानां पुष्कळ प्रकारें समजावून सांगितलें व सरतेशेवटीं त्यांची विनंतीहि केली परंतु त्यांनीं कांहीं ऐकलें नाहीं. त्यांचें म्हणणें एकच कीं, 'पहिल्या प्रथम मी अशोकपुरीं घरीं जातो' आणि ते एकटेच तिकडे गेलेही."

नीलांबरः—अरेरे, खरोखरच गेले कीं काय ? आत्तां एकाद्या मनुष्यास पाठविलें तर त्यांची मध्यें कुठें भेट होईल कीं नाहीं ?

नरेंद्रः—छे, मला नाहीं वाटत. ते अगोदर तिकडे जाण्याला पराकाष्ठेचे उताविळ झाले होते.

नीलांबरः—तर मग आतां कसें करायचें !

दुर्लभरायः—मला असें वाटतें कीं, आपण आतां अशोकपुरास न जातां निर्मलाबाईनां व अनङ्गमोहिनीबाईनां कैलासभवनासच आणवावें. मी दिनाजपुरास जाऊन तेथील पोलीसांच्या मदतीनें पूर्वी ठरल्याप्रमाणें सर्व व्यवस्था करून एका दिवसाच्या आंतच तिकडे येतों. कोणातरी एका विश्वासू मनुष्याबरोबर निरोप पाठवावा ह्मणजे विनयकृष्ण बाबूही परस्पर तिकडेच येतील. असो. वर ठरल्याप्रमाणें दुर्लभराय दिनाजपुरास व नीलांबर मंडळीस बरोबर घेऊन कैलासभवनास त्याच दिवशीं निघून गेले.

इकडे संध्याकाळचे सुमारास विनयकृष्ण अशोकपुरास आपल्या जुन्या वाड्यासमोर येऊन पोहोंचला. तेथें येतांच त्यास आपलें घर अगदीं रिकामें भणभणीत व शद्बशून्य असें दिसलें. संध्याकाळ होत

चालल्यामुळें त्या मोठ्या वाड्यांत सर्वत्र काळीख पसरूं लागला होता व त्यामुळें तो जनशून्यवाडा अधिक भयाण भासूं लागला. विनयकृष्णानें सर्वत्र फिरून पाहिलें परंतु कुठेंच कुणाचाहि पत्ता नाहीं. त्यानें 'निर्मले' 'निर्मले' अशा मोठ्यानें हांका मारून पाहिल्या, पण स्वतःच्याच प्रतिध्वनीशिवाय त्याला दुसरें कोणतेंच उत्तर मिळालें नाहीं. त्यानें आंतील खोलीच्या लाविलेल्या दरवाजावर थाप मारली त्यामुळें तो एकदम उघडला गेला. विनयकृष्ण मनांत विचार करूं लागला 'आं? हें काय? घरांत कोणीच कसें दिसत नाहीं?' त्यानें आणखी थोडें पुढें होऊन पहिल्यापेक्षां मोठ्यानें 'निर्मले' अशी हांक मारली, परंतु त्याचा फक्त प्रतिध्वनि मात्र त्याला चारी दिशांकडून ऐकूं आला. आतां मात्र विनयकृष्णाचें अंतःकरण गडबडूं लागलें, तो संशयित मनानें व कंपित हृदयानें कसा तरी झरझर समोर असलेला मोठा जिना चढून माडीवरील आपल्या निजण्याच्या खोलींत गेला. त्या खोलीमध्येंहि या वेळीं पूर्ण अंधार पसरला होता! त्यानें सर्व खिडक्या वगैरे उघडून टाकल्या व एका ठिकाणीं एक काड्याची पेटी हातीं लागली तींतील काडी पेटवून एकवार त्यानें खोलींत सर्वत्र नजर फेंकली. तेथें फक्त एक मोडकी चौरंग व त्याजवळच एक अर्धी जळकी मेणबत्ती पडलेली होती. तेथून जड अंतःकरणानें विनयकृष्ण बाहेरील सज्जावर गेला, व मनांत ह्मणूं लागला, 'हें काय, माझी निर्मला सुमती गेल्या कुठें? आणि हें घर असें शून्य कां?' पुन्हां एकदां निराशा पूर्ण स्वरानें त्यानें हांक मारली "निर्मले, बाळ कुठें आहेस तूं?"

विनयकृष्णाच्या वाड्याला लागूनच गंगाधर भट्ट या नांवाचे एक गृहस्थ रहात असत. त्यांची स्त्री याच वेळीं आपल्या दोन वर्षाच्या लहान मुलाला कडेवर घेऊन व बाहेर येऊन भुताचें भय दाखवून

गप्प करीत होती. ती ह्मणाली, "ऐक, ऐक; तें बघ दत्तांच्या सज्जावर भूत बोलत आहे।"

तें मूल ताबडतोब रडण्याचें थांबलें व त्यानें भीतीनें आपलें तोंड आईच्या पदरांत घातलें. भट्टाचार्य आंत होते. यांचें नुकतेंच जेवण झालें होतें व ते तंबाखू चघळण्याच्या विचारांत होते. इतक्यांत त्यांची बायको आंत आली व ह्मणाली, "ऐकलं कां? दत्तांच्या वाडयांत कुणीसं निर्मलेच्या नांवानं हांक मारताहे. आवाजावरून मला वाटतं विनयकृष्ण बाबूच असावेत, पाहयचं जरा कोण आहे तें बाहेर येऊन—"

भट्टाचार्यः—अग कसलं कोण आलं आहे तिथं! घरांत ये तूं आपली. तुला झाला आहे भ्रम. विनयकृष्ण गेले आहेत सात वर्षांच्या कैदेंत. ते कसचे येतात इथें आतां?

स्त्रीः—छे हो. मी आतां तीन वेळां त्यांचा स्वर ऐकला. विनयकृष्णच असावेत ते.

इतक्यांत विनयकृष्णानें पुन्हां एकवार अगदीं करुण स्वरानें हांक मारली—"निर्मले, अग निर्मले, अरेरे, मला टाकून तुह्मी सर्व गेलांत तरी कुठें?"

स्त्रीः—हें ध्या, ऐका! आतां तर कांहीं संशय नाहीं ना?

भट्टाचार्यः—कांहीं नाहीं; काय तुला वेड लागलंय? आज शनिवार, त्यांत अमावास्येची रात्रं! अशा वेळीं भूत पिशाचांचा संचार चोहोंकडे असणार? तूं आपली घरांत ये आणि तो दरवाजा लावून घे कशी!

स्त्रीः—अहाहा! दिवे ओंवाळा तोंडावरून दिवे! पुरुष माणूस होऊन अन् इतकी भीती? ह्याला एवढा जरा सांभाळा; मीच जाऊन पाहून येतें.

स्त्रीचे असे हे तिरस्काराचे शब्द ऐकून भट्टाचार्यांस मनांतल्या मनांत शरम वाटली. ते ह्मणाले, " हं ? वाः ! पण तुझें मन पाहण्याकरतां ही सारी मी थट्टा केली तुझी. एवढें देखील तुला समजलें नाहीं का ? बरें चल, मीच जातों. काठी कुठें आहे माझी ?"

भट्टाचार्य काठी हातांत घेऊन कांपत कांपत एकदांचे सज्जावर बाहेर आले व तेथून मोठा हिय्या करून किंचित् कापऱ्या स्वरानें ह्मणाले—" कोण आहे तिकडे ? विनयबाबू हो—?"

विनयकृष्णानें तिकडून ह्मटलें, " ओ; भट्टाचार्य महाशय, अहो निर्मला वगैरे आमची मंडळी कुठें आहे ? "

भट्टाचार्यः—तुमच्या वाड्यांत हल्लीं कोणी नाहीं. इकडे आमच्या येथें या.

विनय०:—तर मग ही मंडळी गेली तरी कुठें.

भट्टाचार्यः—आपण इकडे तर या अगोदर मी तुह्माला सर्व कांहीं सांगतों. या, मी पुढचा दरवाजा उघडतों.

विनयकृष्ण माडीवरून खालीं उतरला व बाहेर येऊन भट्टाचार्यांच्या घरांत आला व ह्मणाला, " हं; सांगा सांगा लवकर आहेत कुठें त्या दोघी ही ? "

भट्टाचार्यः—गोवर्धनमहाशयानीं आपल्या मालमत्तेवर सरकारांतून डिक्री आणली व ती सर्व दाखल करून घेतली आहे, आपली मुलगी क्षेमङ्करीबरोबर काशीला निघून गेली आहे.

विनय०:—आणि माझी स्त्री !

भट्टाचार्यः—काय सांगूं आतां बाबूसाहेब ! आपल्या शिक्षेची हकीगत त्यानां समजतांच त्या एकदम मूर्छीत पडल्या व त्या आघातानेंच. त्यांचा—

" काल झाला ? "

भट्टाचार्यः—भगवंताची इच्छा! समजलं कीं नाहीं! आतां आपण ती गोष्ट मनांत आणूं नये. झाली गोष्ट होऊन गेली. आज आतां आपण आमच्या येथेंच रहा. वाटेच्या श्रमानें बराच थकवा आला असेल. जेवून वगैरे घ्या व विश्रांती घ्या.

विनयकृष्णानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यानें एकवार दुःखपूर्णदृष्टीनें आकाशाकडे नजर फेंकली व तो खालीं मान घालून बसला. भट्टाचार्यांनीं त्याला बऱ्याच समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. नंतर त्यानें आंत जाऊन आपल्या बायकोला जेवण वगैरे करण्याची सूचना दिली. कांहीं वेळानें जेवण तयार झालें. भट्टाचार्यांनी विनयकृष्णांना पुष्कळ आग्रह करून थोडेसें जेवूं घातलें व नंतर सर्व झोंपी गेले. बिचाऱ्या विनयकृष्णाला कुठली झोंप! होतां होतां पहांट झाली. विनयकृष्ण सकाळींच उठून भट्टाचार्यांस नमस्कार करून म्हणाला,—"बाबूसाहेब परवानगी असावी आतां मी काशीस निर्मलेकडे जातों."

भट्टाचार्यः—अहो इतक्या सकाळींच कां? स्नान फराळ करून मग जा.

विनयः—फराळाची आतां विशेष जरूरी नाहीं.

इतक्यांत कोणी अपरिचित मनुष्य तेथें आला व त्यानें विचारलें, येथें कोणी विनयकृष्ण या नांवाचे गृहस्थ आले आहेत काय?

विनयः—कोण आहां तुम्हीं? माझेंच नांव विनयकृष्ण.

अपरिचितः—आपणच का? चला तर मग माझ्याबरोबर. घांटावर नौका तयार आहे.

विनयः—कुठें चलायचें!

मनुष्यः—कैलास भवनांत. आपली मुलगी निर्मला व दासी क्षेमङ्करी ह्या तिथेंच आहेत, व दुसरीहि कांहीं मंडळी आपली वाट पहात आहेत, तेथें गेल्यावर आपणांला सर्व कांहीं कळून येईल.

विनयकृष्ण भट्टाचार्याचा निरोप घेऊन तावडतोब निघाला. लौकरच विनयकृष्णाची निर्मलेची व आणखी कांहीं मंडळींची कैलासभवनांत भेट झाली, व तेथें विनयकृष्ण सुमतीच्या चिर-वियोगाचें दुःख क्षणमात्र विसरून गेला.

प्रकरण ६ वें.

चौकशी.

(अनुष्टुप्):—यथा धेनु सहस्रेषु वत्सो विंदति मातरम्
तथा पूर्वकृतं पापं कर्तारमनुगच्छति॥

(सुभाषित)

दिवसा अकरांचा सुमार झाला होता. अशोकपुरांत आज ह्या वेळीं जरा विशेष गडबड दिसून येत होती. सर्व आबालवृद्ध थवेच्या थवे करून बोसांच्या वाड्याकडे चालले होते. आपले जुने मित्र योगीवर गोवर्धन घोषाल, ज्यांनां एक आठवड्यापूर्वीं पिंवळी पगडीवाल्यांनीं दिनाजपुरास एकाएकीं पकडलें होतें, त्यांची आज चौकशी होणार होती. बोसांच्या वाड्या समोरील भव्य पटांगणांत एक मोठें थोरलें लांकडी स्टेज तयार केलें होतें. त्याजवर हारीनें अनेक लहान मोठ्या खुर्च्या ठेविल्या होत्या. मध्यभागीं तीन मोठाल्या खुर्च्या ठेविल्या असून त्यां समोर एक मोठें थोरलें टेबल ठेविलें होतें. त्यावर उंची प्रतीचें टेबलक्लॉथ घातलें असून टांक, दौत कागद वगैरे लिहिण्याचें सामानहि तयार ठेविलें होतें. डाव्या बाजूस जवळच एका टेबलापाशीं दुसऱ्या दोन खुर्च्या मांडल्या होत्या. त्यांपैकीं एकीवर एका वर्तमानपत्राचा बातमीदार व दुसरीवर सर-कारचा जबानी लिहून घेणारा कारकून यांस बसण्यास जागा केली

होती. तेथेंहि लिहिण्याची सर्व कांहीं तयारी होती. त्याच्याच पलीकडे कांहीं अंतरावर कैद्याला उभें रहाण्याकरितां पिंजरा ठेविला होता. ही सर्व चौकशी वगैरे वास्तविक दिनाजपुरास कोर्टांत व्हावयाची, परंतु दुर्लभरायाच्या आटोकाट श्रमांमुळें व नीलांबराच्या वजनानेंच ही सर्व व्यवस्था येथें ठरून आली होती. थोड्याच वेळांत स्टेजवरील सर्व खुर्च्या भरून गेल्या. पटांगणांत तर अगोदरपासून अतोनात गर्दी झालीच होती. आणखी थोडा वेळ गेला; पोलिसांनीं एकच आरडाओरड केली व कमिशनर साहेबांच्या आगमनाची सूचना दिली. पौलीस कमिशनर मिस्टर (Lambert) ल्यांबर्ट संन्यासी वेषधारी नीलांबराच्या हातांत हात घालून विनयकृष्णासह तेथें हजर झाले. त्यांच्या मागोमाग दुर्लभरायहि तेथें आला. कमिशनर साहेबांनीं कैद्यास तेथें आणण्याचा हुकूम केला व विनयकृष्ण-बावूंस सरकारतर्फे चौकशीस आरंभ करण्यास सांगितलें. पोलीसांनीं तात्काळ शृंखलाबद्ध गोवर्धनमहाशयांना आणून पिंजऱ्यांत उभें केलें. ल्यांबर्ट यांस बंगाली भाषा चांगलीशी येत नव्हती. त्यांनीं चौकशीच्या सुरुवातीस अर्धवट हिंदींत अर्धवट बंगालींत ह्मटलें कीं, मी गव्हर्मेंटच्या हुकुमाप्रमाणें आरोपी गोवर्धन घोषाल याची येथें चौकशी करतों, व जर त्याचा अपराध तसाच प्रमाणसिद्ध भयंकर ठरला तर हा खटला सेशन्स कमिट करण्यांत येईल.

इतक्यांत गोवर्धनानें म्हटलें, साहेब, आपण जर चौकशीकरतां आलां आहां तर हा विनयकृष्ण मधें कशाला?

साहेबः--Hold your tongue, you brute! हामकू तोकी भासा आच्छे तरफसे नहिं आती, वास्ते वोई सब बंगालीमें पूछेंगा और लिखेंगा. Go on Binoy Krishna Babu. (कागद पुढें

घेऊन) The first witness is this old Chap.-Durlabh Chander Roy.

दुर्लभराय विनयकृष्णाच्या समोर येऊन उभा राहिला. औपचारिक प्रश्नोत्तरें झाल्यानंतर विनयबाबूंनीं त्यास विचारिलें, "स्वर्गवासी बाबू घनश्याम बोस यांनीं मरण्यापूर्वी जें मृत्युपत्र केलें होतें तें कुठें आहे?"

दुर्लभरायानें आपल्या खिशांतून मृत्युपत्र काढून विनयकृष्णाच्या हातीं देऊन ह्मटलें, हें पहा, हेंच तें मृत्युपत्र."

विनय:—हें आपणाजवळ कोठून आलें?

दुर्लभराय:—गोवर्धनानें हें तेथून चोरी करून आणलें होतें. त्याच्याजवळून मी घेतलं.

विनयः—गोवर्धनानें तें कोठून व कसें चोरी करून आणलें व तें त्यापासून आपण कशासाठीं व कशाप्रकारें मिळविलेंत?

दुर्लभः—स्वर्गवासी बाबू महाशय घनश्याम बोस ह्यांनीं मरणापूर्वी कलकत्याचे ॲटर्नी हॅरिसन् साहेब यांस बोलावून त्यांच्या सल्ल्यानें तें मृत्युपत्र केलें होतें. त्यामध्यें गोवर्धन एक साक्षी या नात्यानें होता. पहा, त्यावर गोवर्धनाच्या हातची सही आहे; आणि तें जर तो नाकबूल करीत असला तर त्याचीं कित्येक हस्तलिखित पत्रें मजजवळ आहेत तीं पहा, म्हणजे मी ह्मणतों त्याविषयीं आपली सहज खात्री होईल. मृत्युपत्र लिहून होतांच घनश्याम बाबूंनीं तें ॲटर्नी हॅरिसन साहेब यांच्याच स्वाधीन केलें. नंतर तीन दिवसांनीं बाबू महाशय मरण पावले त्या वेळेस गोवर्धन त्यांच्याजवळ होता. मी त्या वेळीं दिनाजपुर येथें वकिली करीत होतों. मला निरनिराळीं हस्ताक्षरें उत्तम काढतां येतात, हें गोवर्धनाला ठाऊक होतें. तो एके दिवशीं मजकडे येऊन

म्हणूं लागला कीं, आपणाला हरतऱ्हा करून घनश्याम बोसांचें अस्सल मृत्युपत्र नाहींसें करून त्याच्या जागीं खोटें मृत्युपत्र करून ठेवायचें आहे! मी प्रथम त्याच्या बोलण्यास नाकबूल झालों, परंतु त्यानें मला पैशाचा फारच लोभ दाखवून सरतेशेवटीं वश करून घेतलें. मला त्यावेळेस तेथेंच त्यानें नगद रक्कम पुष्कळ दिली व पुढें दरसाल पांच हजार देण्याचें कबूल केलें. मी पैशाच्या लोभानें त्याच्या ह्मणण्याला कबूल झालों. परंतु त्याच्याजवळून अशी एक कबुलायत करून घेतली कीं एक जामीन या नात्यानें तें अस्सल मृत्युपत्र मजजवळच रहावें. नंतर आह्मीं दोघेहि हॅरिसन साहेबांचे हेड क्लार्क उद्धव बाबू यांजकडे गलों. तो सुद्धां माझ्याच प्रमाणें पैशाच्या लोभाला बळी पडला. गोवर्धनानें त्याची मूठ पांच हजारांनीं दाबली. तेव्हां त्यानें हॅरिसन साहेबांच्या पेटींतून अस्सल मृत्युपत्र चोरून आणून आमच्या स्वाधीन केलें. नंतर आम्हीं दोघांनीं त्याबरहुकूम हस्ताक्षर काढून एक खोटें मृत्युपत्र तयार केलें. त्याचीहि एक नक्कल आमच्याजवळ ठेवून तें उद्धव बाबूजवळ दिलें त्यानें साहेबाच्या पेटींत पूर्ववत् अस्सलाच्या जागीं नक्कल ठेवून दिलं.

विनयः—परंतु इतका घोंटाळा करून अस्सल मृत्युपत्र चोरून व त्याच्या जागीं नक्कल ठेवून गोवर्धनानें काय मिळविलें?

दुर्लभः—वाः! अस्सल मृत्युपत्रांत व खोट्या मृत्युपत्रांत पुष्कळच फर होता. ही पहा खोट्या मृत्युपत्राची नक्कल. ही त्या अस्सल मृत्युपत्राशीं ताडून पहा ह्मणजे फरक सहज ध्यानांत येईल.

विनयः—काय फरक आहे? आपणच वाचून दाखवा.

दुर्लभः—हें पहा. अस्सलांत असें लिहिलें आहे कीं, "माझ्या मृत्यूनंतर माझा विश्वासू कारभारी बिनयकृष्ण दत्त यानेंच माझा पुत्र नीलांबर यास वीस वर्षें होत तोंपर्यंत माझ्या सर्व संपत्तीची व्यवस्था

पहावी." इत्यादि. खोट्या मृत्युपत्रांत हें सर्व आहे; फक्त नांवाचाच फरक आहे. विनयकृष्ण दत्तांच्या ऐवजीं 'गोवर्धन घोषाल' असें घातलें आहे. आणि खालींहि जेथें जेथें 'उपरि निर्दिष्ट विनयकृष्ण दत्त' असें आहे तेथें 'उपरि निर्दिष्ट गोवर्धन घोषाल' असें लिहिलें आहे.

विनयः—या दोहोंपैकीं खरी कोणती ह्मणतां येईल व खोटी कोणती ह्मणतां येईल.

दुर्लभः—हॅरिसन साहेबांनीं घनश्यामबोसांच्या मृत्यूनंतर दुसऱ्या दिवशीं हें पहा या सर्व कागदांवर १८२१ च्या माघ महिन्यांतील अष्टमीच्या दिवशीं मृत्यू झाला असें लिहिलें आहे. कलकत्याच्या सब रजिष्ट्रारच्या ऑफिसांत जाऊन अस्सल मृत्युपत्राची एक नक्कल व त्याचा इंग्रजींत तर्जुमा करून घेऊन तें रजिस्टर केलें आहे. ही गोष्ट आह्मांला अथवा उद्धवबाबूंनाहि त्यावेळीं कळली नाहीं. हॅरिसनसाहेबांच्या मृत्यूनंतर नुकतेंच मागील सर्व कागदपत्र चाळीत असतां ह्याविषयीं साहेबानें लिहून ठेवलेलें उद्धव बाबूंच्या पाहण्यांत आलें व त्यांनीं गोवर्धनास तसें कळविलें. कलकत्याच्या सबरजिष्ट्रारच्या ऑफिसांतील कागदपत्र मागविले असतां खरें मृत्युपत्र कोणतें आहे हें स्पष्ट कळून येईल.

विनय०:—उद्धव बाबू हल्लीं कोठें आहेत?

दुर्लभ०:—ते हल्लीं तुरुंगांत आहेत. गोवर्धनमहाशयाचे इष्ट गुरु प्रेतोद्धार परमहंस यांना देखील वॉरन्ट गेलेलें आहे. (तोंड फिरवून) दोघेहि गुरुशिष्य एका माळेचे मणि आहेत.

गोवर्धन हा वेळपर्यंत अगदीं स्तब्ध होता. तो ह्मणाला,—"आपणहि कांहीं या चौकशींतून सुटणार नाहीं. खोटें मृत्युपत्र मूळ लिहिलें कोणी? लिहिणारे तर तुह्मीच!"

दुर्लभराय यावर ह्मणाला, " त्याबद्दल तुह्माला काळजी नको. मला सरकारांतून केव्हांच क्षमा होऊन सरकारतर्फेचा साक्षीदार नेमण्यांत आलें आहे. आतां तुह्मीच आपली तजवीज पहा. "

कमिशनर साहेब हांसून ह्मणाले, Rendered pardon already. Yes, now go on ! "

विनय०:—अॅटर्नी हॅरिसन साहेबांचा मृत्यु झाल्याला हल्लीं बरेच दिवस झाले. त्यांनीं मरणाच्या पूर्वीच तें मृत्युपत्र विनय कृष्णाच्या—ह्मणजे माझ्या—स्वाधीन कां केलें नाहीं ?

दुर्लभ:—ते असें समजत होते कीं, मृत्युपत्रांतील सर्व हकीगत आपणांस माहीत आहे. याशिवाय मृत्युपत्राची नकल व त्यासंबंधीं त्यांनीं आपल्या नांवावर वेळोवेळीं पाठविलेले कागदपत्र गोवर्धनाच्या चलाखीनें आपणांस न पोंहोचतां मधल्यामधेंच गडप झाले. मरणांपूर्वीं कांहीं दिवस सर्व खरा प्रकार हॅरिसनसाहेबांच्या लक्ष्यांत आला. व त्यांनीं तुम्हांला "मृत्युपत्र चोरीस गेलें आहे, लवकर निघून यावें," अशा आशयाची तारहि केली होती. ती तुमच्यापासून हरवली होती, ती ही पहा. तुम्हांला आठवत असेलच कीं, ती गोवर्धनानें थाप देऊन तुमच्यापासून उपटली होती. नंतर गोवर्धनानें तुह्मांला कलकत्त्यास नेलें, तेथें जाऊन उद्धवबाबूंची भेट घेतली, अस्सल मृत्युपत्राची कॉपी तुमच्याजवळ दिली, खोटें मृत्युपत्रच खरें आहे अशाबद्दल पैसे चारून खोटे साक्षी तयार केले व कोर्टांत तुमच्या विरुद्ध खटला करून तुम्हांस सात वर्षांची द्वीपांतराची सजा देवविली. याच शोकानें तुमची पत्नी सुमती इचा अपघात मृत्यु झाला. त्यांच्यापूर्वीं तुमच्या मुलीचा विवाह विनोदबाबूंशीं व्हावा अशी आपली इच्छा दर्शवून गोवर्धनानें तुह्माला दिनाजपुरास आपल्याबरोबर नेलें. तेथें गेल्यावर त्यानें विवाहाच्या खर्चाबद्दल आठ हजार रुपये तुह्मांस द्यावे व तुमचें जमीदाराचें

गांव आणि रहातें घर गहाण ठेवावें असें ठरवून त्याबद्दल एक रोखा तयार केला. त्याजवर वास्तविक मुदतीच्या चार वर्षे अगोदरची तारीख वगैरे घालून गोवर्धनानें तो रजिस्टर करून घेतला. तुम्ही त्या बाबतींत त्यावर फारच भरंवसा टाकिल्यानें व आपल्यासारख्या पूर्वापार श्रीमंत घराण्यांतील मनुष्यास आपलें घर, व गांव गहाण टाकावें लागत आहे असें वाटून मन उदास झालें असल्यामुळें, त्या तारखेकडे तुमचें विशेष लक्ष गेलें नाहीं. नंतर तुम्हांला शिक्षा झाल्यावर व तुमची पत्नीहि मृत्यु पावल्यावर गोवर्धनानें रोख्यांत लिहिलेली तारीख येतांच गहाणवट जमीनीवर व घरावर डिक्री बजाविली व तुमच्या मुलीस अगदींच अनाथ करून टाकलें!

विनयः—गोवर्धनानें नीलांबरबाबूंना कां व कशा रीतीनें संन्यास घेववून दूर देशीं पाठविलें हें आपणास ठाऊक असल्यास थोडक्यांत सांगा.

दुर्लभः—त्यांत मुख्य हेतू त्यांचा प्राणनाश करणें हाच होता. कलकत्त्यासारख्या शहरीं ती गोष्ट झाल्यास त्याचा बभ्रा होईल, ह्मणून गोवर्धनानें आपला इष्ट गुरु प्रेतोद्धार परमहंस याच्या सांनिध्यांत नीलांबर बाबूंस रहावयास सांगितलें. प्रेतोद्धार परमहंस हेहि आपल्या कामांत शिष्यापेक्षां सवाई होतेच. ते गोवर्धनाच्या सूचनेप्रमाणें बाबू महाशयांस नेहमीं संसाराच्या असारतेविषयीं उपदेश करीत. अशा स्थितींत कांहीं दिवसांनीं गोवर्धनानें अनङ्गमोहिनीबाईच्या मृत्यूविषयीं नीलांबरबाबूंना एक खोटेंच पत्र पाठविल्यामुळें विरक्त होऊन त्यांनीं संन्यास घेण्याची इच्छा दर्शविली, प्रेतोद्धार त्यांस हिमालयाच्या बाजूकडील एका भयंकर अरण्यांत घेऊन गेले. ज्या मनुष्याबरोबर कलकत्त्यास पत्र पाठविलें होतें त्यानें गोवर्धनाच्या सूचनेप्रमाणें तें पत्र इतर कोणासहि न दिसूं देतां फक्त बाबू महाशयांनाच दाखवून युक्तीनें पळवून आणलें.

असो. पुढें सुमारें तीन वर्षांनीं गोवर्धनानें गुप्तपणें दोन मारेकरी नीलांबर बाबूंच खून करण्याकरितां त्यांच्या निवासस्थानीं पाठविले. ते सर्व आज या ठिकाणीं हजर आहेत. त्यांचीहि साक्ष घेण्यांत यावी.

विनयः—गोवर्धनानें पाठविलेल्या मारेकऱ्यांनीं आपलें काम कां केलें नाहीं ?

दुर्लभः—मी त्यांचें मन वळविलें व गोवर्धनानें देऊं केलेली रकमहि त्यांस दिली.

विनयः—आपल्याच साहाय्यानें गोवर्धनानें बरींच कामें केलीं. मग आपलें व त्यांचें न पटण्यास पुढें काय कारण झालें.

दुर्लभः—मला मनापासून पापकर्माचा तिटकारा होता पण प्रथमतः द्रव्यलोभानें माझ्या मनावर फार पगडा बसविल्यामुळें मी गोवर्धनास साह्य करीत गेलों. पुढें पुढें त्याचीं विलक्षण कर्में पाहून माझ्या मनाची चलबिचल होऊं लागली. एकदां गोवर्धनाच्या तर्फे आपल्या (म्हणजे विनयकृष्णाच्या) घरावर डिक्री बजावण्याकरितां गेलों असतां त्यांची मुलगी निर्मला माझ्या दृष्टीस पडली. याच मुलीनें एकदां माझे प्राण वांचविले होते. अशा आपल्या उपकार-कर्त्या माणसांचा किती नाश होण्यास आपण न कळत कारण झालों हें ध्यानीं येतांच माझें मन फिरलें व तेव्हांपासून गोवर्धनाचे पापी बेत हाणून पाडण्याचा मी प्रयत्न करूं लागलों.

विनयः—गोवर्धनाविषयीं आतां आपणास आणखी कांहीं सांगा-वयाचें आहे काय ?

दुर्लभः—होय. आणखी दोन महत्वाच्या गोष्टी आहेत. नीलांबर बाबूंप्रमाणेंच त्यांचा धाकटा बंधू त्रिनोद व पत्नी अनङ्गम-हिनी यांचीहि वाट लावण्याचा प्रयत्न गोवर्धनानें केला. उच्च शिक्षण देवविण्याच्या मिषानें त्यानें विनोदास कलकत्त्यास नेलें व तेथें एक

दोन डॉक्टरांस पैसे चारून विनोद वेडा झाल्याचें ठरविलें व त्यास तेथील वेड्याच्या इस्पितळांत घालविलें. इकडे अनंगमोहिनी बाईची प्रकृती बरी नाहीं असें ठरवून औषधाच्या मिषानें पिण्याच्या दुधांतून दिवसेंदिवस देह क्षीण करणारी व शेवटीं मरण आणवणारी एक विषारी पूड देण्याचा उपक्रम चालविला. हें दूध अनङ्गमोहीनीबाईंनीं घेऊं नये ह्मणून मी पुढें तजवीज केली; परंतु जो थोडा भाग त्यांच्या पोटांत गेला होता त्यामुळें भ्रमिष्ट बनून गल्या होत्या.

विनयः—आपण जें सांगत आहां त्याबद्दल कांहीं पुरावा आहे काय ?

दुर्लभः—पुरावा? विनोदबाबूंविषयीं पाहिलें असतां त्यांस मुळींच वेड लागलें नव्हतें हें सहज सिद्ध करतां येईल. अनंगमोहिनीबाई-विषयीं जें सांगितलें त्याविषयीं तेथें दूध घालणाऱ्या गवळणीची साक्ष घेण्यांत यावी, ह्मणजे गोवर्धनानें काय सांगितलें होतें तें कळेल.

ही वरील सर्व हकीगत दुर्लभरायाच्या तोंडून येत असलेली ऐकत असतां क्षणोक्षणीं गोवर्धन अधिकाधिक काळा ठिक्कर पडत चालला होता. तो आतां हात जोडून रडक्या आवाजानें कांपत कांपत नीलांबरबाबूकडे पाहून बोलूं लागला, " नीलांबरबाबू, आपणाला तर ठाऊक आहेच कीं, मी योगाभ्यासाशिवाय दुसऱ्या कशांतहि मन घालीत नाहीं. आणखी माझ्याकडून जीं कांहीं गैरकामें झालीं आहेत तीं सर्व मी योगाभ्यासांत विशेष लक्ष घालून संसारांत दुर्लक्ष केल्यामुळेंच झालीं आहेत ! मला एकवार क्षमा व्हावी. मी आपलीं यापुढें लोकवस्तीचा त्याग करून जंगलांत योगसाधन करीत बसेन."

नीलांबरानें कांहीं एक न बोलतां त्याच्याकडे पाहून किंचित् हास्य केलें व कमिशनरकडे पाहिलें.

दुर्लभराय हंसून ह्मणाला, " ओहो ! योगिवर गोवर्धन घोषाल, खरोखरच तुह्मांला अद्यापि योगाभ्यास करण्याची इच्छा आहे काय ? आपणांसारख्या योगिराजांकरितां सरकारानें अति उत्तम व निर्जन अशा योगशाळा पुष्कळ ठिकाणीं निर्माण करून ठेविल्या आहेत. त्यानां इंग्रेजींत solitary cell असें ह्मणतात. त्या ठिकाणीं तुह्मी अगदीं खुशाल दिवसरात्र योगाभ्यासच करीत रहा."

त्यानंतर कमिशनर साहेबांनीं वामनदास, गण्या, रुस्तम, क्षेमंङ्करी वगैरे अनेक साक्षीदारांच्या साक्षी घेतल्या व खटला सेशन्स कमिट केला. लवकरच गोवर्धन घोषालांना दुर्लभरायानें वर्णन केल्याप्रमाणेंच एका सरकारी योगशाळेंत दहा वर्षें योगसाधन करण्याकरितां जावें लागलें.

हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं ॥

(मोरोपंत.)

प्रकरण ७ वें.

कथानकाची परिसमाप्ति.

श्लोक (मालिनी):--फलमधुकुसुमांनीं वृक्ष पूजोत सारे
स्फुटकमलसुगंधी मंद वाहोत वारे;
मधुरतर करावा शब्द येथें शकुंतीं,
फिरुनि सहज आला राम कीं या वनांतीं ॥ १ ॥

(उत्तररामचरित्र).

पौर्णिमेची रात्र होती. पूर्णशशांक पूर्ण उल्हासानें व हास्यवंदन करून पूर्व दिशेला पूर्णोदय पावला होता. पूर्णानंदांत निमग्न असलेल्या कैलासभवनाच्या समोरील उद्यानांतील एकूणएक पुष्प-

वाटिका पूर्णपणें फुलल्या होत्या. विविधपुष्पगुच्छांवरून मंद गतीनें वहात येणारा वायु मृदु देहाला परिमलानें पूर्ण करीत होता व पूर्ण रजनिनाथ आपल्या शुभ्र किरणांच्या द्वारें अखिल सृष्टीवर जणों सुधावर्षाव करीत होता. चंचल प्रवाही त्रिस्रोता नदी पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राला आपल्या हृदयांत धारण करून पूर्णवेगानें तरङ्गरङ्ग करीत वाहत होती.

अशा आनंदकारकसमयीं कैलास भवनांतील आपली कथानायकादिक मंडळी तरी कां असुखांत असेल? त्यांच्याहि दुर्दिनांची आज परिसमाप्ति होऊन, व त्यांच्या हृदयाकाशावरील दुःखतिमिर लय पावून, तेथे आज आनंदरूपी चंद्राचा पूर्ण उदय झाला होता.

यावेळीं कैलासभवनांतील एका सज्जावर विनोद व निर्मला नुकत्याच उगवलेल्या चंद्रबिंबाकडे उल्हासानें पहात उभीं होतीं. विनोद शुभ्र चंद्रकिरणांकडे पहात हास्यमुख करून व निर्मलेचा कोमल हात आपल्या हातांत घेऊन तिला ह्मणाला, "निर्मले, इतके दिवसपर्यंत माझ्याबद्दल तुझ्या मनांत काय येत होतें? मला सांग पाहूं?"

निर्मला हळूच ह्मणाली, "इश्श, इतकं मोठ्यानं काय बोलायचं तें? कुणी ऐकलं तर काय ह्मणेल? आपल्या मनांत अगोदर सांगायचं, ह्मणजे मग मी सांगेन."

विनोदः—हं; काय ह्मणेल कुणी ऐकलं तर? ह्मणेल आतां लवकरच लग्न होणार आहे; बोलताहेत कांहीं तरी. बरं, कसं ह्मणतेस? मीच सांगू अगोदर? ठीक आहे. मी कलकत्त्यास वेड्याच्या इस्पितळांत असतांना तेथें असलेल्या असंख्य वेड्यांचें मोठमोठ्यानें ओरडणें, उंगी-

चच्याउमीच हांसणें, मारामारी करणें व इतरहि नानातऱ्हेचे वेडेंवेडे चार करणें हें पाहून मला तर असेंच वाटूं लागलें होतें कीं, आणखी कांहीं दिवस इथें राहिलों तर मीहि खास यांच्यासारखाच वेडा होणार! परंतु इतक्यांत तुझी आठवण झाली म्हणजे असें वाटे कीं,–छे; मी वेडा होऊं म्हटल्यानेंहि मला होतां येणें शक्य नाहीं. आणखी असेंहि मनांत येई कीं, मला वेड लागलें तर मग निर्मला काय करील? आणि म्हणूनच मी तरी आजपर्यंत वेडा झालों नाहीं! खरोखर तुला वेडा नवरा मिळेल म्हणूनच मी वेडा झालों नाहीं. हां, चल सांग पाहूं आतां तुझ्या मनांत काय आलें तें.!

निर्मला:—माझ्या मनांत का? आपण कलकत्त्यास गेलां त्याच्या नंतर थोड्याच दिवसांनीं आमच्या बाबांना शिक्षा झाल्याची हकीगत आम्हांला कळली. तेव्हां ते तर आम्हांला सोडून गेलेच, शिवाय माझी आई तर ती हकीगत ऐकतांक्षणींच बेशुद्ध होऊन पडली अन् तशीच आम्हांला अगदीं कायमची सोडून चालती झाली! अन् त्याच सुमारास त्या मेल्या दुष्टानं आमच्या सर्व घरादारावर सरकारांतून डिक्री का फिक्री कायसं म्हणतात तें आणलं. मग मात्र मला अगदीं माझ्या जिवाचा सुद्धां विट्ट आला, व वाटलं कीं विष खावं अन् जावं या यातनांतून सुटून एकदाचं! परंतु इतक्यांत आपली आठवण झाली म्हणजे असं वाटे कीं—छेः तसं करूं नये. जरी मी मेल्यें असते तरी आपलं कांहीं लग्न व्हायचं राहिलं नसतं. तें दुसऱ्या कुणाबरोबर तरी झालंच असतं म्हणा; परंतु त्या दुसऱ्या कुणाबरोबर तरी आपलं लग्न होईल म्हणूनच तर मी मेल्यें नाहीं! समजलं का?"

दोघेहि जणें हंसूं लागलीं. इतक्यांत मागाहून कोणीस म्हटलें, "अन् आतां सुद्धां जर मी माझ्या विनोदाला दुसरीच एकांदी केली तर?"

दोघांनींहि एकदम मागें वळून पाहिलें तों अनङ्गमोहिनी पाठीं-शींच उभी! अनङ्गमोहिनींनीं चट्कर निर्मलेचा हात धरिला व आतां विनोदाचाहि धरणार तोंच तो दूर निसटून गेला. निर्मला अनङ्ग-मोहिनीच्या पाठीशीं उभी राहिली. अनङ्गमोहिनीनें तिजकडे तोंड कर-तांच ती फिरून तिच्या पाठीकडे जाऊन उभी राहिली. अनङ्गमोहि-नीनें मधेंच चपलता करून निर्मलेस धरिलें व मुखचुंबन करून ह्मणाली, "निर्मले, मजजवळ ग कशाला इतकं लाजायला हवं? हं; सांग पाहूं मला विनोदाजवळ काय ह्मणत होतीस तूं! सांग सांग; लाजूं नकोस. अझून नाहीं सांगत? पहा बरं मग; जा तर नको सांगूं. आह्मीं आमच्या विनोदाला दुसरी एकादी सुंदरशी मुलगी पाहून देऊं. आमचं न ऐकणारी तुझ्यासारखी मुलगी नकोच मुळीं आह्मांला." अनङ्गमोहिनीनें तिचा हात सोडून दिला. निर्मला तेथून तावतोब दुसरीकडे पळून गेली. सज्जाच्या खालच्या बाजूस नीलांबर आपल्या खोलींत पलंगावर कांहीं पुस्तक वाचीत पडला होता. त्याला उद्देशून अनङ्गमोहिनी ह्मणाली, "इकडे वर यायचं जरा."

नीलांबर सज्जावर येऊन ह्मणाला, "काय ह्मणतेस अनङ्ग!"

अनङ्ग०:--आतां थोडयावेळापूर्वी इथं विनोदभावजींच अन् निर्मलेचं काहींस हळुहळू बोलणं चाललं होतं. इतक्यांत मी हळूच त्यांच्यामागें येऊन उभी राहिल्यें. निर्मला भावजींनां ह्मणत होती. "आपल्याबरोबर दुसऱ्या कोणाचा विवाह होईल या भीतीनेंच मी आजपर्यंत मेल्यें नाहीं." मला पाहून भावजी केव्हांच निसटून गेले अन् निर्मला दडून राहिली. तेव्हां माझंहि आपल्याला एवढंचं सांगणं आहे कीं, 'आतां ह्यांच्या लग्नाला उशीर करूं नये.

नीलांबरः—ठीक आहे. ज्या दिवशीं व्हावें अशी तुझी इच्छा असेल, त्या दिवशीं करूं. मग झालें कीं नाहीं !

* * * *

उपसंहार.

प्रिय वाचक हो ! झालें. आमच्या कथानकाची येथें परिसमाप्ति झाली.

यथावकाश सुमुहूर्तावर विनोद व निर्मला यांचा मोठ्या थाटात विवाह होऊन विनयकृष्ण अनङ्गमोहिनी वगैरेंचा फार दिवसांचा हेतू पूर्ण झाला. हा विवाह पाहण्यास निर्मलेची माता सुमति नसल्यामुळें मात्र सर्वांस खेद वाटला, परंतु तिच्या ऐवजीं निर्मलेचें मातेप्रमाणें पालन करणाऱ्या क्षेमङ्करीनें मात्र विनोदास सासूचा अभाव वाटूं दिला नाहीं.

हा आनंदी आनंद होण्यास आपण आतां तरी अंशतः कारण झालों असें वाटून दुर्लभचंद्र राय यांच्या मनास समाधान वाटलें.

नीलांबरानें पुढें जहागिरीची सर्व व्यवस्था विनयकृष्ण दत्त यांजवरच सोंपविली व आपण धर्मग्रंथांच्या अवलोकनांत विशेष काल घालवूं लागला.

विनोद कॉलेजांत जाऊन उल्हासानं उच्च शिक्षणाचा लाभ घेऊं लागला.

अनङ्गमोहिनी व निर्मला या जरी आतां जावाजावा झाल्या होत्या तरी त्या एकमेकांशीं इतक्या प्रेमानें वागत असत कीं, त्या सख्या बहीणीच असाव्यात असें लोकांस वाटे. आपल्या दीरावरहि पूर्वीपासूनच अनङ्गमोहिनीचें बंधुप्रमाणें प्रेम असे हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

योगिवर गोवर्धनाचे इष्टगुरु प्रेतोद्धार परमहंस यांसहि दैवदुर्विलासानें 'कर्मांचा परिपाक चाखण्या' चे दिवस आल्यामुळें कलकत्त्यास सरकारी बिनभाडयाचें घर पहाण्याचा योग लवकरच आला.

* * * *

प्रिय वाचकांनो, हें कथानक येथें संपलें. इतर कथानकाप्रमाणें नायक नायिकेस एकादें सुंदरसें कन्या अथवा पुत्ररत्न होऊन तें त्यांच्या मृदु अंकांवर खेळूं लागण्याइतका आपणास अवकाश नसल्यामुळें आपण येथेंच विराम पावूं या.

समाप्त.